

# माझी घडण

अण्णासाहेब सहस्रबुद्धे

REFBK-0009541

रचनात्मक क्रांतीच्या
मार्गावर

# माझी घडण

२२८३५ विभाग
क्रमांक ७८५ नों. दि. २८/१०/५८

अ. वा. सहस्रबुद्धे

दा. क्र. ७५०२

REFBK-0009541

साधना प्रकाशन
३७४ शनिवार पेठ : पुणें २

किंमत ७५ नये पैसे

श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या षष्ठ्यब्दपूर्तीच्या वेळीं त्यांची ही आत्मकथा मराठी वाचकांना सादर करण्याची संधि साधना प्रकाशनाला मिळाली, हें आम्हांला महद्-भाग्य वाटतें.

ह्याचा फार मोठा वांटा सौ. कुसुम पटवर्धन यांच्याकडे जातो. ही आत्मकथा शब्दबद्ध करण्याचें श्रेय त्यांचें आहे. या कामासाठीं वेळांत वेळ काढून त्या ओरिसांत कोरापुटला अण्णासाहेबांकडे जाऊन राहिल्या होत्या.

अण्णांची ही छोटेखानी आत्मकथा तरुणांना उद्बोधक, मार्गदर्शक आणि स्फूर्तिदायक वाटेल अशी खात्री आहे.

अण्णांच्या षष्ठ्यब्दपूर्तीनिमित्त विनोबाजींनीं आपल्या शुभसंदेशांत म्हटल्याप्रमाणें, 'अण्णांनीं शंभर वर्षें जगण्याची इच्छा धरावी' हीच प्रार्थना.

प्रकाशक : **यदुनाथ दत्तात्रय थत्ते**, साधना प्रकाशन, ३७४ शनिवार पेठ, पुणें २
मुद्रक : **चिंतामण गणेश वझे**, साधना प्रेस, ३७४ शनिवार पेठ, पुणें २

नों: दि:

# १ : विद्यार्थिजीवन

७ ऑक्टोबर १८९७ ही माझी जन्मतारीख. आश्विन शुद्ध द्वादशी. पुण्याला शनवार पेठेंत गुपचुपांचा वाडा आहे, तेथें माझें आजोळ. माझ्या आईचें माहेर गोवित्रीकरांकडचें. त्या घराची माडी रस्त्याच्या बाजूला आहे, अशी कांहीं पुसटशी लहानपणींची एकुलती एक आठवण मला आहे.

माझे वडील वऱ्हाडमध्यें उमरावती जिल्ह्यांत प्राथमिक शाळत शिक्षक होते. दर्यापूर, एलिचपूर, करंजगांव अशा अनेक ठिकाणीं आमच्या बदल्या होत. बदली म्हटली कीं सामानाची आवराआवर, बांधाबांध, त्यांत आमची लुडबुड आणि धांदल व बैलगाडीचा प्रवास, असे अनंत प्रसंग मला स्मरत आहेत. मोठ्या माणसांना व विशेषतः आईला या बिऱ्हाडें बदलण्याचा त्रासच होत असेल; पण मला मात्र उत्सुकतेनें बैलगाडीची वाट पाहिल्याचें आणि आनंदानें प्रवास केल्याचेंच आठवतें.

माझें प्राथमिक शिक्षण असेंच जागोजाग चालू होतें. कोठेंहि पूर्ण एक वर्ष काढल्याचें आठवत नाहीं. एलिचपूरजवळील करंजगांवाला असतांना १९०९ डिसेंबरमध्यें सालीं मी मराठी ६ वी पास झालों. १९१० सालीं मी माझ्या आजोबांकडे म्हणजे सहस्रबुद्धे यांच्याकडे पुण्यांत पुढचें शिक्षण घेण्यासाठीं आलों. तेव्हां आम्ही सात भावंडें होतों. माझ्याहून वडील एक बहीण. मी पहिला मुलगा. आम्हां सर्व भावंडांच्या शिक्षणासाठीं आई आम्हांला सर्वांना घेऊन पुण्यांत रहायला आली. वडील नोकरीच्या निमित्तानें एकटेच वऱ्हाडांत राहूं लागले. पुण्यांतील माझें शालेय आयुष्य सुरू झालें.

मी न्यू इंग्लिश स्कूलमध्यें दाखल झालों. आमचे वर्ग त्या वेळीं होळकर वाड्यांत भरत. श्री. राम गणेश गडकरी त्या वेळीं मला मराठीला शिक्षक होते. श्री. वझे नांवाचेहि आणखी एक शिक्षक होते. श्री. मोडक, आपटे व कुंभारे ही शिक्षक मंडळी मला चांगली आठवतात. इंग्रजी सहावींत श्री. श्री. म. माटे हे माझे शिक्षक होते. वरचे वर्ग नानावाड्यांत भरत.

शालेय आयुष्यांत अभ्यासांत मीं कधीं फारसें लक्ष घातलें नाहीं. प्रत्येक वर्गांत जेमतेम पास होण्यापलीकडे फारशी मजल गेली नाहीं. मला खेळण्याचा व तालमीचा नाद होता. त्यांतल्या त्यांत पळण्याचा शोक फार. पळण्याचा व्यायाम मी भरपूर केला. मात्र अभ्यासांत वा खेळण्यांत,

फार काय पण पळण्यांतहि, आपण पहिला नंबर मिळवावा, अशी इच्छा कधीं मनांत निर्माण झाली नाहीं.

१९१० ते १९१३ हीं चार वर्षें माझीं शनवारांतील सहस्त्रबुद्धे वाड्यांतच गेलीं. त्या वेळीं आमच्या वांट्याचा भाग भाईबंदांतच विकला. १९१२ सालीं माझे आजोबा वारले. तेव्हां-पासून घरच्या वळणांतून एक प्रकारें मुक्तिच मिळाली. आतां भाड्यानें रहायला व पुन्हां अनेक ठिकाणीं बिऱ्हाडें बदलण्याला सुरुवात झाली. त्या वेळचें माझें आयुष्य मन मानेल तसें चालू होतें. घरीं आजोबा वारलेले. वडील नोकरीनिमित्त दूर. आम्हां सर्व भावंडांना सांभाळणें व गरिबीचा संसार हांकणें, यामुळें आईला आमच्यावर लक्ष ठेवण्याला अगर वळण लावायला सवडच नव्हती. वाड्यांत जीं मुलें होतीं, त्यांचीहि परिस्थिति अशाच प्रकारची होती. सर्व वडील माणसांत भाऊबंदकीमुळें अत्यंत वैमनस्य. त्यामुळें सर्व मुलांना कोणी बोलावील, वळण लावील, ही आशाच नव्हती. त्यांच्या भांडणांचे संस्कार मात्र आमच्या मनावर होत होते !

आम्ही मुलें काय करीत होतों, याची कुणाला पर्वा नव्हती. 'एक आणा माला'-सारख्या खालच्या दर्जाचीं डिटेक्टिव्ह पुस्तकें व चटोर कादंबऱ्या वाचणें आणि वाचून त्यांतील 'निवडक' गुण अंगीं बाणवणें हे कार्यक्रम यशस्वीपणें चालत होते ! शाळेतील शिक्षकांचेंहि आमच्याकडे फारसें लक्ष जात नसे. शवटच्या बाकांवर बसणारीं आम्ही मुलं ! आम्हांला शाळेंतहि अभ्यास चुकवून असलें वाचन करण्याला मुक्तद्वार होतें.

माझ्या बाबतींत, मी कधींहि नापास झालों नाहीं, हीच फुशारकी होती. मी व बाकी माझ्या टोळींतील दोस्तांपैकीं आणखी एकच जण —माझा चुलतभाऊ—कॉलेज शिक्षण पुरें करूं शकलों. बाकीचे शिक्षणांत मागें राहिले. याला कारण केवळ दारिद्र्य हेंच नव्हतें. मुलांकडे केलें गेलेलें दुर्लक्ष हेंहि एक मुख्य कारण होतें.

वाड्यांतील वातावरण दूषित होतें. आमच्या वाड्यांतील एक गृहस्थ आपल्या बायकोला मारीत—अगदीं लाकडानें बडवीत व घराबाहेर काढून देत. ती बाई अजून मला आठवते. अशिक्षित होती, पण तिनें मुलांकडून नादानें अक्षरज्ञान करून घेतलें होतें. नेहमीं पोथ्या-पुराणें वाची. पुढें पुढें स्त्रियांना घरांत वा मंदिरांत जमवून ती कीर्तनहि करीत असे. अत्यंत रसाळ व ओघवती तिची भाषा होती. पण घरीं नवऱ्याकडून अशी वागणूक मिळे ! मला या बाईबद्दल फार जिव्हाळा आणि आदर वाटे. तिला बडवणाऱ्या तिच्या नवऱ्याचा आणि तिच्याविरुद्ध असणाऱ्या सर्वच वडील मंडळींचा मला तिटकारा वाटे. घरीं मला कुणीहि मार्गदर्शक नव्हता. अशा 'वडीलधाऱ्यां' बद्दल आमच्या काय भावना असणार ?

शाळेंतहि मी अशा मुलांच्याच कंपूंत होतों. मला आठवतें कीं, एक चांगला श्रीमंत मुलगा माझ्या कंपूंत होता. २०-२५ रुपये त्याला दरमहा खाऊला मिळायचे. मुलांना घेऊन तो अनेक वेळां हॉटेलांत जाई. मात्र या वेळीं माझा अहंकार मोहापेक्षां श्रेष्ठ ठरला ! तो आपल्या-वर खर्च करील, पण तसा खर्च करण्याची आपली ऐपत नाहीं हें मीं ओळखलें होतें. मीं तसें त्याला सांगितलेंहि व अशा हॉटेल इ० नादांपासून निग्रहानें दूर राहिलों.

माझ्या या उनाडक्यांची बातमी अनेकदां वडील सुट्टीला घरीं येत तेव्हां त्यांच्या कानावर जाई. पण शाळेंतील मार्क वरे असत; त्यामुळें ते कधीं फारसे रागावत नसत. कदाचित् वर्षाकांठीं एकादा महिना मुलाबाळांत रहायचें, त्यांत कशाला रागवायचें, असेंहि त्यांना वाटत असावें. माझे वडील अत्यंत शांत स्वभावाचे. ते मॅट्रिक होते. त्या वेळीं हायस्कूलमध्येंहि मॅट्रिक्युलेट् शिक्षक कमीच असत. पण वडलांचा स्वभाव सडेतोड फार. त्यांनीं कधीं अधिकाऱ्यांपुढें नरमाईचें वर्तन ठेवलें नाहीं. कधीं सरबराई केली नाहीं. त्यामुळें सरकारी नोकरींत ते फारसे वर चढले नाहींत. शेवटपर्यंत प्राथमिक शाळेंतच राहिले. विद्यार्थ्याला वर चढवण्याबद्दल कधीं श्रीमान् वा शिष्ट पालकांचे वशिले त्यांनीं मानले नाहींत. या त्यांच्या वृत्तीमुळें ते पालकांतहि कधीं लोकप्रिय झाले नाहींत.

वृत्तीनें मात्र ते समाधानी व उत्तम शिक्षक होते. माझी आई फार सोशिक व शांत. वडलांना पगार प्रथम ४० रुपये व रिटायर झाले तेव्हां ५० रुपये मिळे. घरांत त्यामुळें ओढगस्तच असायची. आम्ही सहासात जणें. सर्वांचें रहाणें, शिक्षण. पैशाची ओढाताण नेहमींचीच. घरांत दुधाचें नांव कधीं नसे. आमच्या कांहीं श्रीमंत नातेवाइकांकडे म्हशी होत्या. तेथून ताक वगैरे कधीं येई. पण या साऱ्या परिस्थितींत आईनें कधीं असंतोष वा असमाधानाचे उद्‌गार काढलेले मला आठवत नाहींत. अर्थात् घरच्या या ओढाताणीचा अर्थ वा कष्ट समजण्याचें माझें वय नव्हतें. माझें आयुष्य मन मानेल तसें चाललें होतें आणि असेंच वेहांवतहि गेलें असतें.

पण त्या वेळीं माझ्या आणि सबंध देशाच्याच दृष्टीनें एक फार मोठी शुभदायी घडामोड झाली. १९१४ नंतर टिळकांचें युग सुरू झालें. त्याआधींहि राजकीय जागृति करण्यांत त्यांनीं पुढाकार घेतलेला होताच, पण १९१४ नंतर ते सुटून आल्यावर मला वाटतें, पुण्यांत एकहि आठवडा असा गेला नाहीं कीं, ज्यांत टिळकांचें व्याख्यान कुठें ना कुठें झालें नाहीं. आणि लो. टिळकांचें एकहि व्याख्यान मीं चुकवलें नाहीं. साराच विद्यार्थी आणि तरुण वर्ग त्या वेळीं भारला गेला होता. राजकीय विषय समजण्याचें आणि त्याची गोडी लागण्याचें तें वयहि होतें. त्याआधीं राजकीय घडामोडी अनेक चालू होत्या. १९०८ सालीं टिळकांना अटक झाली तेव्हांची एक आठवण मला आहे. त्यांच्या घराची झडती चालू होती आणि त्यांच्या घराच्या समोर एका मोठ्या मातीच्या ढिगावर आम्ही दीड–दोन हजार मुलें जमलों होतों. जमावाच्या कांहींतरी न कळणाऱ्या दुःखित भावनेनें मलाहि घेरलें होतें. गर्दी फार झाली म्हणून पोलीस आम्हांला हुसकूं लागले. मग पळापळ, गोंधळ. इंग्रजांविरुद्ध कांहीं लढाई चालू आहे, इतकाच अर्थबोध मला झाला होता.

पण आतां मात्र लो. टिळकांनीं तरुणांना अक्षरशः वेड लावलें होतें. या वेळचे आमचे गुरु व मार्गदर्शक म्हणजे श्री. हरिभाऊ फाटक व श्री. बाबा लिमये. १९१५ मध्यें माझी या दोघांशीं ओळख झाली. विद्यार्थी संघटनेचे त्या वेळीं हरिभाऊ हे सूत्रधार होते. सेवेच्या कामाची गोडी मला श्री. हरिभाऊंनींच लावली. वर्तमानपत्र वाचणें, प्रत्येक विषयाची सांगोपांग

चर्चा करणें आणि प्रत्येक विषयाकडे अभ्यासू वृत्तीनें बघणें हें शिक्षण श्री. बाबा लिमये यांच्याकडून मला मिळालें. विद्यार्थिदशा संपेपर्यंत या दोघांनींच मला घडवलें. लिमयांच्यामुळें अभ्यासाव्यतिरिक्त इतर चांगलें वाचन सुरू झालें. विशेषतः विवेकानंद, रामतीर्थ व तत्सम अनेकांचे आध्यात्मिक विचार त्या वेळीं मीं वाचले. कोणत्याहि विचारानें भारून न जातां त्याची विचक्षणा करणें हें श्री. लिमये यांचें वैशिष्ट्य होतें. भलत्या मार्गाकडे चाललेलें माझें आयुष्य आतां वळणावर आलें.

माझ्या आकांक्षा आतां वाढूं लागल्या होत्या. आपण कॉलेजचें शिक्षण करावें, अशी इच्छा मला वाटूं लागली होती. वडिलांनीं मला एस्. एल्. सी. च्या परीक्षेसाठीं फॉर्म भरण्याला सांगितलें होतें. त्याऐवजीं मीं मॅट्रिकचा व एस्. एल्. सी. चा दोन्ही फॉर्म भरले. अर्थात् पहिले ६ महिने हें वडलांना कळण्याचा कांहींच मार्ग नव्हता. पण ६ महिन्यांनंतरच्या रिपोर्टानें त्यांना तें कळलें. ते जरा रागावलेच, पण मी दोन्ही परीक्षांना बसत आहें, असें सांगून सारवा-सारव केली. त्यांनींहि पुढें विशेष विरोध केला नाहीं. कदाचित् माझ्या पूर्ण बेतांची कल्पना त्यांना नसावी. सरकारी नोकरी करायची नाहीं, असें वेड माझ्या मनांत शिरूं लागलें होतें. दोन्ही परीक्षांत आपण सहज पास होऊं हा अहंकार जोडीला होताच. वडलांचें ऐकलें नाहीं, असें न होतां आपलें साध्य साधेल असेंहि वाटत होतें. शेवटीं मी दोन्ही परीक्षांत पास झालों.

पण मग दुसरीच आपत्ति आली. पास झाल्यावर सर्व म्हणूं लागले, तूं नोकरी कर. वास्तविक घरची परिस्थिति तशीच होती. वडील पेन्शनला आले होते. सर्व लहान भावंडें शिकायचीं होतीं. पण माझी पुढील शिक्षणाची आकांक्षा सुटेना. शेवटीं मे महिन्यांत वडील आल्यावर या प्रश्नाला तोंड लागलें.

माझा आग्रह पाहून शेवटीं वडीलहि तयार झाले. त्यांचें दुःख इतकेंच होतें कीं, कॉलेजचा खर्च कोणत्याहि परिस्थितींत ते करूं शकत नव्हते ! पण खर्चाची जबाबदारी मीं स्वतः घेतली. ते म्हणाले : “ अरे तूं शिकावेंस असेंच मलाहि वाटतें. तुझ्याकडून माझ्या संसाराला लगेच मदत व्हावी, अशी माझी इच्छा नाहीं.”

शिकण्याची व खर्चाची जबाबदारी मीं स्वतः घेतल्यावर मात्र त्यांनीं मोठ्या आनंदानें मला परवानगी दिली, आशीर्वाद दिला.

१९१६ च्या जूनमध्यें मीं कॉलेजांत नांव घातलें. कॉलेजमध्यें असतांनाहि श्री. हरिभाऊ व बाबा लिमये यांच्याशीं संबंध होताच. नीलकंठ फाटक नांवाचे माझे आणखी एक मित्र. ते हल्लीं अमेरिकेंत आहेत. त्या तिघांनीं मला मदत केली. अभ्यासांत माझे मार्क बेताचेच असल्यानें स्कॉलरशिप मिळण्याची आशा नव्हतीच. श्री. हरिभाऊंच्यामुळें मला बेळगांवजवळच्या संकेश्वर येथील कुलकर्णी नांवाच्या मुलाची शिकवणी मिळाली. त्याचा मॅट्रिकचा अभ्यास पहिल्यापासून करून घ्यावयाचा होता. द. म. २० रुपये मला मिळत. दोन–अडीच तास शिकवायचें असे. मीं मेहनत खूप घेतली. ही शिकवणी २ वर्षें मिळाली. त्या मुलाबरोबर माझाहि अभ्यास सुधारला.

मीं प्रामाणिकपणें खूप मेहनत घेतली. तो मुलगाहि पास झाला. असेच आणखी कांहीं पैसे मिळत. कधीं कर्ज करावें लागे. सबंध कॉलेजच्या आयुष्यांत दारिद्र्यानें पाठ सोडली नाहीं. कपडे कधीं मळके, कधीं फाटके ! मला त्याची फारशी खंत नसे. पहिल्या वर्षी एक कोट मीं केला होता. तोंच मला ४ वर्षें पुरला ! पुढें गांधीजींच्या चळवळीनंतर असल्या अनावश्यक कपड्यांची जरूरीच उरली नाहीं ! पुस्तकेंहि दुसऱ्याचींच. त्यांवर अभ्यास करायचा. शिकवण्या व कॉलेज यामुळें खेळणें व व्यायाम बंद पडला होता. इतकें करूनहि शिक्षण पूर्ण झाल्यावर पांच-सहाशें रुपये कर्ज मला झालेंच होतें.

कॉलेजांत मी रमलों होतों. श्री. आर्. डी. रानडे यांचीं व्याख्यानें मला मोहून टाकीत. प्रो. लिमये (इतिहास), प्रो. वा. गो. काळे (अर्थशास्त्र) व प्रो. गुणे (संस्कृत) यांचीं विद्वत्ताप्रचुर भाषणें अजूनहि मला आठवतात. ॲनी बेझंट त्या वेळीं पुण्यांत आल्या होत्या. थिऑसफिकल सोसायटीची माहिती व कांहीं वाङ्मय त्या वेळीं मी वाचलें. शिवाय श्री. लिमये यांच्यामुळें व्यासंग वाढत होता.

१९१४ मध्यें युद्धाची आग भडकत चालली. युद्धाला मदत करण्याची टिळकांची घोषणा होती. त्यानें मी भारला गेलों. १९१७ च्या नोव्हेंबरमधें इंडिया डिफेन्स फोर्स सुरू झाला. मी त्यांत दाखल झालों. वानवडी येथें कॅम्पला गेलों. माझ्याबरोबर त्या वेळीं श्री. काकासाहेब गाडगीळ, अप्पासाहेब पटवर्धन हेहि होते. विश्वविद्यालयाची टर्म मिळणार होतीच. लढाईवर जाण्याची माझी फार इच्छा होती. पण १९१८ सालीं युद्ध थांबलें. मला वानवडीचा कॅम्प चांगलाच मानवला होता. खाणें खूप व व्यायाम खूप. माझें वजन ११२ वरून १३० वर गेलें होतें. मी परत आलों, तेव्हां आईनेंहि मला क्षणभर ओळखलें नाहीं !

बाहेरील राजकीय वातावरण हळूंहळूं तापूं लागलें होतें. मी बी. ए. ला असतांना रौलेट ॲक्टचा निषेध सुरू झाला. त्यांत पंधरावीस दिवस मीं खूप भाग घेतला. पण पुन्हां कॉलेजमध्यें जाऊन परीक्षा दिली. त्या वेळीं श्री. न. चिं. केळकर यांचे चिरंजीव श्री. काशिनाथ यांची व माझी बरीच दोस्ती झाली. मी केळकरांकडे जाऊं-येऊं लागलों. राजकारणांत मला फार गोडी वाटत होती. 'केसरी 'च्या संपादक मंडळांत जाण्याचीं स्वप्नें मला आतां पडूं लागलीं. राजकीय क्षितिजें भराभर वाढत होतीं. घरचें संकुचित जीवन आतां संपलें होतें.

याच वेळीं माझ्या विचारांना व जीवनाला प्रचंड धक्का देणारी एक गोष्ट घडली. श्री. श्री. म. माटे यांनीं अस्पृश्यतानिवारण चळवळीला हात घातला. मांगवाड्यांत रात्रीच्या शाळा व साक्षरतेचे वर्ग चालवण्याला त्यांनीं सुरुवात केली. श्री. माटे हे विद्यार्थ्यांचे खास वर्ग चालवीत व त्यांतून या कामासाठीं अनेक मुलें तयार करीत. मी प्रथमतः कामाला सुरुवात केली ती या रात्रीचे वर्ग चालवण्याचे १० रुपये मिळतील म्हणून. पण मांग कॉलनीमधील जीवन बघून मीं हे पैसे घ्यायचे नाकारले. मांग कॉलनीनें माझ्या आतांपर्यंतच्या आयुष्याला जबर धक्का दिला. दारिद्र्य मला नवीन नव्हतें. पण हें आयुष्य ! मांग स्त्रियांनीं दिवसभर शहरांतील उकिरडे शोधत

त्यांत जें मिळेल तें अन्न घ्यायचें, तरुण मुलांनीं लष्करांत बूट पुसायला जाऊन दारूच्या बाटल्या झोंकायच्या आणि मोठ्या माणसांनीं स्मशानांत खड्डे खोदायचे! हें काय जीवन आहे!

माझ्या सर्व शक्ति खवळून उठल्या होत्या. विचार बधिर झाले होते. पिढ्यान् पिढ्या हेंच जीवन होतें त्यांच्या वांट्याला. इथेंच सुरुवात अन् इथेंच इतिश्री आणि हें जीवन यांना जगायला भाग पाडणारा जो समाज, त्याच समाजाचा मी एक घटक होतों. मांग समाजाच्या दारिद्र्याला सीमा नव्हती. माणुसकीचा कधींच निकाल लागला होता. त्यांना पिळणाऱ्या समाजाचा एक घटक मी—काय केलें म्हणजे ह्या भयंकर पापाचें अंशतः तरी क्षालन होईल?

अभ्यास व शिकवण्यांव्यतिरिक्त सर्व वेळ तिथेंच खर्च होई. त्यांच्या आयुष्याशीं एकजीव होण्याचा माझा निर्धार झाला होता. तेथें मुलांना मी आंघोळी घाली. शाळेंत नेई. दारू प्याल्याबद्दल शिक्षा करी. खटपट करून मीं रस्ता पक्का करवला. नळ आणवला. तेवढ्यांत तेथें कॉलरा सुरू झाला. समाज जितका दरिद्री तितका मंत्रतंत्रांवर आणि भुताखेतांवर विश्वास जबर. माणसें औषध घेत नसत. पण मींहि माझी सर्व शक्ति एकवटली. एका बाजूला अंगाराहि लावायचा. कधीं मंत्र येत असल्याचाहि आव आणायचा आणि बरोबर डॉ. फाटकांचें औषधहि पाजायचें! असा तडाखा मीं चालू केला आणि कॉलऱ्याची एकहि केस दगावली नाहीं. दिवसांतून ४-५ तास माझे तिथें जात. माझ्या आयुष्याला एक निराळा अर्थ प्राप्त झाला होता. या कामांत मला विलक्षण आनंद मिळत होता. एखाद्या मांग मुलीशीं लग्न करावें, अशी ध्येयवादी इच्छाहि माझ्या मनांत निर्माण झाली होती. अर्थात् ही केवळ ध्येयवादी ऊर्मि! दारिद्र्य आणि खेडेगांव हे पुढे माझ्या आयुष्याचे विषय बनले. पण त्यांची खरी सुरुवात या मांग कॉलनीमधील दारिद्र्याच्या अमंगळ दृश्यांत आहे.

श्री. हरिभाऊ फाटक यांनीं एक स्वदेशी संघ काढला होता. स्वदेशीचें व्रत घेण्याला तेथेंच सुरुवात झाली. आपल्या अर्थशास्त्राच्या सिद्धान्तांचा प्रत्यक्ष जीवनाशीं संबंध जोडणें हें तेव्हांच सुरू झालें. अर्थशास्त्र व राजनीति घेऊन मी बी. ए. झालों. पण तिसऱ्या वर्गांत! थर्डक्लास बी. ए.ला केसरींत कोण विचारतो? आतां पुन्हां डोळ्यांसमोर प्रश्नचिन्ह उभें राहिलें. शिक्षण तर झालें, पण पुढें काय?

कॉलेजमधील एका सुट्टींत मी मिलिटरी अकाउंट्समध्यें नोकरी करण्यासाठीं गेलों होतों. तेव्हां तेथें अनेक शिक्षितांची जरूरी होती. मला त्यांनीं विचारलें: "किती दिवस ही नोकरी करणार?" मीं खरें उत्तर देण्याचा मूर्खपणा केला! म्हणालों: "कॉलेज सुरू होईपर्यंत." अर्थातच मला ही नोकरी मिळाली नाहीं. बी. ए. झाल्यावर प्रथम १९२० सालीं मी मुंबईला गेलों. तेथें माझ्या मित्राच्या खोलीवर एक महिना पडून विचार केला. पुढें काय करायचें? सरकारी नोकरींत जायचें नाहीं, हें नक्की झालेलेंच होतें.

तेव्हां आणखीहि एक विचार मनांत असे: लग्न व नोकरी असा सामान्य संसार करायचा तर मग तो परदेशांत करायचा! देश स्वतंत्र होईपर्यंत या देशांत असलें सुखी जीवन जगण्याचा आपल्याला अधिकार नाहीं.

श्री. हरिभाऊ फाटक हे माझे आदर्श. त्यामुळें त्यांच्या ब्रह्मचर्याच्या व्रताचें आकर्षण मला होतेंच. त्यामुळें मी सध्यां लग्न करणार नाहीं व मला सरकारी नोकरीहि नको, असें मीं वडलांना सांगितलें होतें. शेवटीं पुणें येथें ' दुनिया ' नांवाचें एक वर्तमानपत्र निघालें, त्यांत मला नोकरी मिळाली. पण तीनच महिन्यांत त्या पत्राचें दिवाळें निघालें आणि मला वाटतें, तिथल्या कामाचा पगारहि कधीं मला मिळाला नाहीं.

## २ : गांधीजींच्या संपर्कांत

शेवटीं आणखीं पांच–पन्नास रुपये कर्ज करून मीं वऱ्हाडमध्यें उमरखेड येथें ७० रु. पगारावर एका खाजगी शिक्षणसंस्थेंत शिक्षक म्हणून नोकरी धरली. आई, भाऊ सर्वांना तेथें घेऊन गेलों. शिक्षकजीवन सुरू झालें.

माझ्या आयुष्यांतील अत्यंत आनंदाचे व सुखाचे असे हे दिवस होते. तेथें काम भरपूर होतें. मला माझ्या सर्व कल्पना प्रत्यक्षांत आणायला पूर्ण मोकळीक होती. मी मुलांना घेऊन हंगामांत कणसें तोडायला जाई. कापूस वेचायला जाई. असे श्रमाचे अडीचशें रुपये जमवून तेथें एक कुस्तीचा आखाडा मीं बांधला. तेथील हरिजनवस्तींत मीं रात्रीची शाळा सुरू केली. पुण्यांतील मांग कॉलनीच्या उलट अनुभव तेथें आला. हरिजन अत्यंत स्वच्छ व माळकरी होते. दिवाबत्ती, बैठका, पाट्या सर्व ते आणीत. त्यांच्या आयुष्यांत मीं प्रवेश मिळवला होता. तेथील ब्राह्मण मंडळी मात्र माझ्यावर रागावत. शेवटीं समझोता झाला. हरिजन वस्तींतून आल्यावर कोणीतरी पाणी शेंदून रात्रीं ११–११॥ ला मला आंघोळ घालून शुद्ध करून घरांत घेत ! ही शुद्धीकरणाची जबाबदारी त्यांचेवर पडली ! मी रहात होतों त्या घरांत एक कोरडें वसतिगृह ( ड्राय बोर्डिंग )हि काढलें. गांवांतील वीस-पंचवीस मुलें तेथेंच रहात. दोन्ही वेळां जेऊन येत किंवा जेवण घेऊन येत. मी त्यांचेकडून रामदास, तुकाराम यांचें वाङ्मय पाठ करून घेतलें व श्रमाचें कामहि पुष्कळ करून घेतलें.

तेथें एक मठ होता. १-२ लाखांचें त्याचें उत्पन्न होतें. मठाधिकारी चांगले सुशिक्षित होते. माझ्या मनांत आलें, आपण जर येथें मठाधिकारी झालों तर इतक्या पैशांत कितीतरी मुलांचें शिक्षण करूं ! त्या दृष्टीनें प्रयत्न म्हणून मीं मठांतील महाराजांशीं मैत्री जोडायला सुरुवात केली. अशा महत्त्वाकांक्षा माझ्या मनांत निर्माण झाल्या होत्या !

पण सुदैवानें असल्या कोणत्याच विचित्र आकांक्षा भरकटूं देण्यासारखी राजकीय परिस्थिति नव्हती. गांधीजींच्या अलौकिक नेतृत्वाखालीं झपाट्यानें क्रांतीचीं पावलें पडत होतीं.

१९२० च्या सप्टेंबरमध्यें कॉंग्रेसची सभा झाली. त्यांत असहकारितेची हांक गांधीजींनीं दिली. माझेंहि चित्त विचलित झालें होतें.

सर्वांच्या दृष्टीनें मी नुकताच 'मार्गी' लागलों होतों. वडलांना हातभार लावायला नुकताच सरसावलों होतों आणि शिक्षकाच्या आयुष्यांत रमलोंहि होतों. पण मला यांत पूर्णता वाटत नव्हती. नोकरी सोडण्याचे विचार सुरू झाले. नोव्हेंबरमध्यें शेवटीं उमरखेड सोडायचें मीं ठरवलें. मीं चळवळीसाठीं इथून जाणार, ही बातमी कशी कुणास ठाऊक तेथें कळली. विशेषतः हरिजन वार्डांत समजल्यावर तेथें खूपच चलबिचल झाली आणि त्या सर्व माणसांनीं येऊन मला कोंडींत धरलें. रडारडहि सुरू झाली. मलाहि तेथील काम बंद पडणार, या कल्पनेनें दुःख वाटत होतें. तेथें मुलांच्या शाळेनें चांगलें मूळ धरलें होतें. साक्षरतेच्या वर्गांना चांगली हजेरी असे. माझे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते आणि ते तोडतांना मलाहि खंत वाटत होती. पण गांधीजींची हांक जास्त बलवत्तर होती. सोर पाश झुगारून द्यायला लावण्याचें सामर्थ्य तींत होतें. डिसेंबरमध्यें मी नोकरी सोडून पुण्याला आलों.

असहकाराची चळवळ डिसेंबरअखेर सुरू झाली. सर्वत्र राष्ट्रीय शिक्षणाची मूहूर्तमेढ रोवली जात होती. पुण्यांत राष्ट्रीय शाळेंत मला बोलावीत होते. श्री. बाबा लिमये यांनींहि नोकरी सोडली व राष्ट्रीय शाळेंत काम पत्करलें. श्री. बाळुकाका कानिटकर यांनीं मला चिंचवडला बोलावलें. रौलट अॅक्ट सत्याग्रहांत त्यांची व माझी ओळख प्रथम झाली होती. टिळक विद्यापीठाची स्थापना झाली व मुलांना शाळा कशा सोडावयला लावायच्या इ. विचार सुरू झाले. श्री. तात्या देशपांडे यांनीं तेव्हां कॉलेज सोडलें व ते टिळक विद्यापीठाचे वाङ्मयविशारद झाले. मी, तात्या व बाबा लिमये सर्व चिंचवडला गेलों. श्री. काका कारखानीस व श्री. फणसळकर आदींचा संच तेथें जमला होता.

१९२१ च्या १६ एप्रिलला मुळशी पेट्याच्या प्रसिद्ध सत्याग्रहाला सुरुवात झाली. टाटा पॉवर कंपनीचें धरण तेथें व्हायचें होतें. ५२ गांवांची हजारों एकर जमीन पाण्याखालीं जाणार होती. तेथील शेतकरी मावळे मंडळींत प्रचंड संघटना या धरणाला विरोध करण्यासाठीं निर्माण झाली. चिंचवड राष्ट्रीय शाळेचीं ३०--३५ मुलें व २–३ शिक्षक तुरुंगांत गेले. मुळशी पेटा सत्याग्रह सहायक समिति तेव्हां स्थापन झाली होती. तिचा सेक्रेटरी म्हणून मी मात्र तुरुंगाबाहेर राहिलों. ऑफिस, हिशेब या सर्व तंत्रांची प्राथमिक माहिती तेथें मला झाली. सेनापति बापटांचा मला हुकूम होता कीं, तुम्ही शेवटपर्यंत ऑफिसांतच रहायचें आहे.

सत्याग्रह संपला. पुन्हां शाळा सुरू झाली. तेथें आतां अनेक विचारांचें आचारांत रूपांतर करण्याचें माझें व माझ्या सहकाऱ्यांचें काम सुरू झालें. जातिभेद आम्हांला मुलांच्यांतून तरी समूळ नष्ट करायचा होता. वाईचे श्री. नारायणशास्त्री मराठे यांना बोलावून सर्व अब्राह्मण मुलांच्या आम्हीं मुंजी लावल्या! सैंपाकाच्याहि सरळ पाळ्या लावल्या. जातीचा प्रश्न नाहीं, पण या सर्व कृत्यांमुळें आमच्या आर्थिक नाड्या आवळूं लागल्या. राष्ट्रीय शाळेसाठीं पुण्याहून व महाराष्ट्रांतून अनेक मंडळींकडून श्राद्धपक्षानिमित्त देणग्या येत. अशा मनिऑर्डरीं-

मधून २०–२२ हजार रुपये दर वर्षी जमत. पण जातिसंस्थेवर हल्ला चढवल्याचा खूप गवगवा झाला व या सर्व मनिऑर्डरी बंद झाल्या!

लो. टिळकांचे सहकारी व श्री. न. चिं. केळकर प्रथम मुळशी पेटा सत्याग्रहाचे अध्वर्यु होते, पण गांधीजींच्या विचारांशीं त्यांचे असलेले मतभेद हळूंहळूं स्पष्ट होत होते. विद्यार्थ्यांनीं तुरुंगांत जावें, हें त्यांना पसंत नव्हतें. राजकीय पक्षांतहि मतभेद दिसूं लागले. यामुळें केळकरांचीहि कृपा संपली. आम्हीं मात्र या सर्व परिस्थितीला तोंड देऊन शाळा चालवायचीच असें ठरवलें होतें. बुकर टी. वॉशिंग्टनसारखी स्वावलंबी शाळा चालवावी, असें मनांत येत होतें. भातसोंगणीच्या वेळीं कुलाब्यांत हिंडून १००-१५० पोतीं तांदूळ आम्ही गोळा करीत होतों. पण तेवढ्यानें भागेना. या वेळीं गांधीजी आमच्या मदतीला आले.

गांधीजींना मीं प्रथमं पुण्यांत पाहिलें होतें. १९१९ सालीं ते खादी व ग्रामोद्योगांवर बोलले. श्री. शिवरामपंत परांजपे अध्यक्ष होते. मी स्वयंसेवक म्हणून गेलों होतों. भाषणाची टर उडवण्याचीच आमची मनःस्थिति होती. श्री. परांजपे यांनीं तर विडी बांधणें हा मोठा ग्रामोद्योग आहे, त्यावर हिंदुस्थानचें भवितव्य बांधावें, अशा विनोदांत या विचारांची टवाळी केली होती! मी तर त्या वेळीं नुकता लष्करी शिक्षणांतून सुटलों होतों. लष्करांतून सशस्त्र क्रांति करायला निघालों होतों. गांधीजींच्या भाषणावर मीहि फारसा विचार केला नाहीं. श्री.जमनालाल बजाज व गांधीजी यांना पुण्यांत त्यांचे विचार वाढवणारें काम हवें होतें. चिंचवडच्या राष्ट्रीय शाळेसाठीं टिळक राष्ट्रीय फंडांतून गांधीजी दर वर्षी १० हजार रुपये देत. असे ३-४ वर्षें तरी दिले गेले.

स्वावलंबनासाठीं सुतारी, विणाई व म्हशींची डेअरी, शेती व छापखाना असे अनेक उद्योग आम्हीं सुरू केले. यामुळें मुलांना अभ्यासाला वेळ कमी पडूं लागला. बाहेरील चळवळींचें वातावरणहि थंडावत होतें. आमच्या शिक्षणाला सरकारी शिक्का नसल्यामुळें नोकरीच्या दृष्टीनें किंमत शून्यच! या सर्व कारणांनीं शिकायला येणाऱ्या मुलांची संख्या घटूं लागली. शेवटीं अनाथ व नाइलाजानें जेवढीं मुलें येत तेवढींच राहिलीं.

माझी धडपड चालूच होती. शाळेनें शेती करावी, त्यांतून स्वावलंबी बनावें, असें मला फार वाटे. मीं गांधीजींजवळ हे विचार मांडले. पण गांधीजींचें मत असें कीं, शेतीसुधारणा व शेतमालाची किंमत या दोन्ही गोष्टी आपल्या आटोक्याबाहेरील आहेत. यांत नुकसानीची भीतिहि फार आहे. दुसराहि त्यांचा दृष्टिकोन होता. चळवळीच्या जमान्यांत आपल्याला काम करायचें आहे, तेव्हां आपलें बिऱ्हाड पाठीवर ठेवणारा धंदाच योग्य—भांडवली व स्थायी खर्च फार असूं नयेत. पण मीं केलेल्या मागणीसाठीं स्वावलंबन राष्ट्रीय पाठशाळेला त्यांनीं १० हजार रुपये प्रयोगार्थ दिले.

बेलापूर येथें श्री. आगाशे नांवाच्या आमच्या मित्राची मोठी शेती होती. तेथें आम्ही ३ शिक्षक व १० मुलें गेलों आणि शेतींत प्रयोग सुरू केले. श्री. काका कारखानीस, परचुरे शास्त्री व मी आणि श्री. के. ग. देवधर, दिगंबर कदम असे विद्यार्थी. ८ बैल आम्हीं घेतले आणि

हळद, ऊस, बाजरी सर्व पिकें घेतलीं. कोणत्याहि शेतकऱ्यापेक्षां जास्त मेहनत आम्हीं घेतली. मोठ्या हिमतीनें, अभिमानानें आणि ईर्षेनें शेती केली. पण आमच्या नशिबानें २४–२५ सालीं किमती इतक्या उतरल्या कीं, सर्व प्रयोगांत १०० सव्व ८० झालें !

गांधीजींचें म्हणणेंच योग्य ठरलें होतें. १९२६ सालीं गांधीजी पुन्हां चिंचवडला आले. पुन्हां त्यांनीं त्यांचे विचार मांडले व खादींतून स्वावलंबन करा असें सांगितलें. खादीचें शास्त्र तेव्हांच मीं प्रथम ऐकलें. त्यासाठीं नवीन प्रयोग साबरमती येथें चालले होते. खादी शिक्षणासाठीं आम्ही बेलापूरला गेलेले सर्व लोक पुन्हां साबरमती येथें खादी शिक्षणासाठीं गेलों. खादी शिक्षण घेऊन चिंचवडची शाळा स्वावलंबी बनवायची, याच इच्छेनें चिंचवड सोडलें व साबरमतीचा आश्रम गांठला.

अ. भा. चरखा संघातर्फे साबरमतीला खादीचा तांत्रिक शिक्षणक्रम सुरू झाला होता. आमची पहिलीच तुकडी होती. सबंध हिंदुस्थानांतून ७५ लोक आले होते. महाराष्ट्रांतून आम्ही ७ लोक होतों : ३ शिक्षक व ४ विद्यार्थी. २०० वार विणकाम व १० शेर सूतकताई असा कोर्स होता. २॥ वर्षे याला लागतील, असें मानलें जात होतें. कृष्णदास भाई गांधी, बाळकोबा भावे हे शिक्षक होते. मगनलाल गांधी मुख्य होते. आम्हांला द. म. १२ रुपये शिष्यवृत्ति मिळे. १ वर्ष ५ महिन्यांतच माझा कोर्स पूर्ण झाला. यानंतर ६ महिने विक्रीच्या शिक्षणासाठीं मला काळबादेवी खादीभांडारांत पाठवलें. यानंतर उत्पत्ति–केंद्रांत प्रत्यक्ष शिक्षणासाठीं बेळगांव जिल्ह्यांत हुदली येथें मी २ महिने होतों.

या दीड वर्षांच्या माझ्या आश्रमीय आयुष्यांत मला अनेक नवे अनुभव मिळाले. माझी वृत्ति व दृष्टि तोंपर्यंत संकुचित व प्रांतीय होती. सारा त्याग महाराष्ट्रांत आहे, असा कांहींसा वृथाभिमान होता. ज्ञानाचीहि अहंता होती. पण साऱ्या हिंदुस्थानांतून गांधीजींच्या विचारांशीं सहमत होऊन अनेक ज्ञानी, तपस्वी विद्यार्थी तेथें जमले होते. त्यांच्या सहवासांत प्रांतीयता कमी झाली. आश्रमांत सर्व एकसारखे राहत.

आश्रमांत तसें पाहिलें तर आपल्या मध्यमवर्गीय खर्चापेक्षां थोडा खर्च जास्तच असेल. महाराष्ट्रांत त्यावर सर्वत्र टीका व त्या ' त्यागा 'चा उपहासहि होत असे. पण ४-५ लाखांच्या इस्टेटी आणि हजारांचें उत्पन्न असलेले धंदे गांधीजींना अर्पण करून या माणसांनीं १५-२० रुपयांचें जीवन पत्करलें होतें. **त्याग म्हणजे दारिद्र्य नव्हे. ती मनाची एक शक्ति व जीवनाची वृत्ति आहे.** पूर्वीच्या जीवनांत ती किती बदल घडवते, यावर तिची किंमत अवलंबून आहे. केवळ रुपयांत तिची किंमत होत नाहीं. या अखिल भारतांतील त्यागाचें दर्शन मला आश्रमांत झालें. त्याग व ज्ञान फक्त महाराष्ट्रांत नाहीं, सर्व हिंदुस्थानांत आहे, परिस्थितीनुरूप त्यांचें दर्शन आपणांला होत असतें.

अशा अनेकांना घेऊन गांधीजी सामुदायिक जीवनाचे प्रयोग करीत होते. संडाससफाई-पासून युक्ताहारापर्यंत सर्व प्रयोग होत. ४०-५० स्त्रियाहि आश्रमांत होत्या. एकत्र रसोडा सुरू केल्यानें त्यांना फुरसतीचा वेळ मिळूं लागला. बालवाडी सुरू झाली. सर्वांवर गांधीजी संस्कार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि:
क्रमांक ........ नों: दि: ........



करीत होते. जीवनाचें कोणतेंहि अंग कमी अगर जास्त महत्त्वाचें त्यांनीं मानलें नाहीं. सर्वांगीण जीवन सुधारण्याचा, बदलण्याचा तो अभूतपूर्व प्रयोग होता.

सायंकाळच्या प्रार्थनेला गांधीजी असल्यामुळें अत्यंत महत्त्व प्राप्त झालें होतें. एकदां ते असें म्हणाले : “ आपण जें काम करतों त्यांत भगवंताचें दर्शन झालें पाहिजे. धोटा फेकतांनाहि रामनामाचें समाधान मिळालें पाहिजे. कामांतून प्रसन्नता वाढली पाहिजे. ”

मीं त्यांना यावर प्रश्न विचारले. सांगितलें : “ कामांतून असें समाधान मला मिळत नाहीं. मला श्रद्धा वाटत नाहीं. बौद्धिक दृष्ट्या खादीवर माझा विश्वास बसत नाहीं.”

त्यांनीं मला नंतर बोलावून घेतलें व माझा सर्व जीवनेतिहास विचारला. प्रथम मला त्यांनीं सुचवलें कीं, मी सहा महिने एकांतांत कुठेंतरी रहावें. पण ही मला शिक्षाच होती! सहा तासहि एकटें राहणें मला जिवावर येतें! मग त्यांनीं मला सांगितलें : “ विश्वास हा शेवटीं कमांतूनच निर्माण होतो. प्रश्नांचीं उत्तरें मिळवण्याचे दोनच मार्ग आहेत : एक श्रद्धा ठेवणें किंवा दुसरा ज्ञानपूर्वक आचार करीत राहणें. तुझें आयुष्य व तुझ्या मनाची घडण अशी आहे कीं, दुसरा कुणी गुरु तुला मिळणार नाहीं. तुझें तुलाच मार्गदर्शक बनलें पाहिजे. १२ वर्षें हें खादीचें काम तपासारखें तूं कर. तुझ्या कामांतूनच तुझ्या प्रश्नांचीं उत्तर तुला मिळूं लागतील.”

गांधीजींचे हे शब्द आज इतक्या दिवसांनीं मला आठवतात. ‘ गुरु ’ अजूनहि मला भेटला नाहीं, पण गांधीजींच्या जीवनाची खोल छाप माझ्यावर उठली आहे. जी जीवन-धारणा ते मानीत, जे सिद्धान्त सांगत, त्यांवर त्यांचा स्वतःचा पूर्ण विश्वास असे, त्याप्रमाणेंच तंतोतंत त्यांचें आचरण असे. मला आठवतें कीं, त्यांचा एक नातू एकदां खादीकामासाठीं त्यांनीं बिहारमध्यें पाठवला होता. १८–१९ वर्षांचा कोवळा तरुण. तेथें जाऊन तो आजारी पडला व तेथेंच वारला. पण त्याचे आईवडील वा कस्तुरबा कुणालाच गांधीजींनीं त्याच्याकडे जाऊं दिलें नाहीं. “ बिहारमधील माणसेंहि आपलींच आहेत व आपल्याच पोटतिडिकेनें ते शक्य ते सर्व उपचार करतील असं तुम्ही मानतां कीं नाहीं ? ” असें गांधींजींचें म्हणणें होतें. आणि आश्रमांतील रोग्यांची सेवा खरोखरच प्रत्यक्ष आईपेक्षां जास्त मायेनें ते करीत. ‘ वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ’ अशा या लोकोत्तर पुरुषानें हिंदुस्थानांतील गेल्या तीन तपांचा इतिहास घडवला आहे. आणि माझ्यासारख्या अनेकांच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून दिला आहे.

आश्रमाच्या जीवनाला शिस्त असावी लागते. परिवार जितका मोठा तितकी सोशिकता, प्रेम, व्यवस्थितपणा जास्त असावा लागतो. नवसमाज–निर्मितीसाठीं संस्कार देणारी व्यक्तिहि तितकीच तेजस्वी असावी लागते. नाहींतर या आश्रमीय आयुष्यांत धोका तितकाच मोठ — कारण गैरव्यवस्था व परस्परद्वेष हाहि तितक्याच प्रमाणांत वाढूं शकतो. आश्रमीय जीवनाचें केवळ विडंबन बनतें. असहिष्णुता व ‘ त्यागा ’विषयीं अहंकार वाढीस लागतो. अशीं आश्रमाचीं विडंबनें पुष्कळ ठिकाणीं आढळतात. आम्ही आज आश्रम चालवण्याला असमर्थ ठरलों आहोंत.

असल्या आश्रमव्यवस्थेपेक्षां सामान्य माणसाचा नैसर्गिक विकास हा गृहस्थी जीवनांतच होतों, असें मला कधीं कधीं वाटतें.

गांधीजींच्या पुढें आदर्श ग्रामपरिवाराचीं भव्य स्वप्नें होतीं. ग्रामीण जीवनाच्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें शोधण्याचा प्रयत्न त्यांनीं सतत केला. चरखा, तकली व ग्रामोद्योग यांवर सतत प्रयोग तेथें चालू होते. तकलीची गति ८० तारांवरून ३५० तारांपर्यंत विनोबांनीं नेली. पैसा, बुद्धि व सातत्य यांची कोणत्याहि प्रयोगांना जरूर असते. हिंदी ग्रामीण जीवनावर अशा प्रकारचे प्रयोग गांधीजींनींच केले व पैसा आणि शक्ति तेथें ओतली.

सातत्यानें एकादें काम करण्यासाठीं आयुष्य वेंचण्याची प्रवृत्ति आपल्याकडे कमी आहे. ३०-४० वर्षें साधना करीत राहण्यांतूनच शोध लागत असतात. मनुष्याची बुद्धि सामान्यांतून असामान्याकडे, दृष्टांतून अदृष्टाकडे वेध घेत जाते. राष्ट्र सेवा दल वा अन्य संघटनांतून अशी शोधक बुद्धि वाढवण्याचे प्रयत्न करणें जरूर आहे; याच प्रवृत्ति आज आवश्यक आहेत. हीं शोधक माणसें नेहमींच एककली असतात. पण तें अपरिहार्य आहे. एकेका विषयांत रमलेले अनेक लोक तेथें गांधीजींमुळें आले आणि खेड्यांनीं भरलेल्या या देशाचा उद्धार व्हावा म्हणून त्यांनीं आपली सर्व शक्ति पणाला लावली. आश्रमांत राहिल्यानें या साऱ्या गोष्टींचें महत्त्व आणि भव्यत्व माझ्या नजरेसमोर आलें. माझ्या दृष्टीचीं प्रांतीय ढांपणें गळून पडलीं आणि मी पूर्ण अर्थानें हिंदी बनलों.

आज या आश्रमजीवनांतील प्राण गेलेला आहे. आमचे विचार आज अहंकारी बनले आहेत. सारें कर्मकांड उभें झालें आहे. आंधळेपणा आला आहे. हीं परंपरागत कर्में हा एक शापच होऊन बसला आहे. क्रांतीची भाषा पोकळ बनली आहे. मनाची उंची वाढलेली नसली तर बाह्य कर्म हे नेहमींच हास्यास्पद आणि फोल ठरतें. आज लोकांची बदलती मनःस्थिति व परिस्थिति यांचें आकलन करण्याची ताकद जुन्या कार्यकर्त्यांच्यांत उरली नाहीं व तरुण पिढी-पर्यंत त्यामुळ आम्ही पोंचत नाहीं. केवळ सर्वोदयाचा जप व गांधीजी बोललेल्या शब्दांची पोपटपंची आम्ही करीत आहोंत. कोणताहि महान् पुरुष गेला कीं त्याच्या अनुयायांची हीच परिस्थिति होते, असा इतिहासाचा दाखला आहे. कर्मकांड विचारापेक्षां मोठें ठरतें. गांधीजींच्या प्रखर व्यक्तिमत्त्वामुळें तें त्या वेळीं देदीप्यमान भासलें. पण त्यामागील विचार हेंच खरें सामर्थ्य होतें. विचार आकलन करण्याची कुवत न ठेवतां निव्वळ कर्माचें अनुकरण तग धरूं शकणार नाहीं. लहानांच्या हातीं मोठ्यांचें कर्म गेलें कीं निबुर्द्धता व अहंकार दोन्ही वाढतात! तरुण पिढी हें किती दिवस सहन करणार ?

सातत्यानें एकादें काम करीत राहण्याची माझी वृत्ति नव्हती. आजहि तशी चिकाटी माझ्या अंगीं नाहीं. पण करीत असलेल्या कामाशीं पूर्ण एकरूप होण्याची कला मी आश्रमांत शिकलों. काम लहान किंवा मोठें नसतें, तें करण्याच्या कौशल्यावर व वृत्तीवर त्याचें महत्त्व आहे, हाहि पाठ आश्रमांतच मीं गिरवला.

१९२८ च्या जूनमध्यें मी काळबादेवी भांडारांत विक्रयकलेचें शिक्षण घेण्याला आलों. माझा पोषाख म्हणजे खादीचा पंचा व सदरा. जमनालालजींच्या पेढीवर मी राही. तेथें दोन वेळां जेवण मिळे. पण वरखर्चासाठीं अजिबात पैसे नसत. कधीं दाढी वाढलेली असे; केस कापण्याची जरूरी असे. पण तें शक्य नसे. भांडारांत मला लिहितांवाचतां येतें, याचीहि कुणाला कल्पना नव्हती. प्रत्येक जण हमाली मात्र करून घेत होता! तेथील व्यवस्थापक म्हणाले : " तुम्हांला हें शिक्षण पूर्ण करण्याला २–२॥ वर्षें लागतील ! " मी कांहींच बोललों नाहीं. शेवटीं साबरमतीहून ६ महिन्यांनीं पत्र आलें कीं, अमुक गृहस्थ ६ महिन्यांपूर्वी आपल्याकडे पाठवले. त्यांना हिशेबी भागांत घ्यायचें आहे. त्यांचा कोर्स पूर्ण झाला काय ?" तोंवर मी खादीच्या गांसड्या बांधीत होतों ! मग मात्र धांवपळ सुरू झाली. व्यवस्थापकांनीं विचारलें : " तुम्हांला लिहितांवाचतां येतें ? " मीं म्हटलें : " येतें थोडेंसें ! " २॥ वर्षांचा कोर्स पुढील १५ दिवसांतच संपला ! नंतर खादी उत्पत्ति शिक्षणासाठीं हुदलीला ३॥ महिने गेलों.

१९२९ च्या मार्चमध्यें पुण्याला आलों. चरखासंघानें मला पुन्हां परीक्षेला बसायला सांगितलें. त्याला मात्र मीं नकार दिला. कारण विणाई, कताई इ. हस्तकलेची परीक्षा द्यायची तर पुन्हां २ महिने प्रॅक्टिस करणें जरूर होतें. संवय असतांनाच परीक्षा घ्यायला पाहिजे होती, आतां हवी तर केवळ लेखी शास्त्राची परीक्षा घ्या, असें माझें म्हणणें होतें. असें म्हणणें मांडल्यानें त्या भांडणाला थोडें तात्त्विक स्वरूप आलें ! मला त्यांनीं सांगितलें कीं, परीक्षा दिली नाहीं तर आम्ही तुम्हांला नोकरी देणार नाहीं. मीं म्हटलें, ठीक आहे.

चिंचवड शाळेबद्दल पुन्हां विचार सुरू झाला. तेथें नवीन लाख–दोन लाख रुपये घालावे लागले असते; पण ती संस्थेची कुवत नव्हती. शाळा तेथें चालेल कीं नाहीं, याचीहि शाश्वति नव्हती. चळवळीच्या ऐन लाटेंतहि महाराष्ट्रांत लोक ' खादीवादी ' फारसे झाले नाहींत. आतां साध्या वातावरणांत खादीचें काम शिकायला किती मुलें येतील हा प्रश्नच होता. उत्पत्तिकेंद्र चालण्याची शक्यता नव्हतीच, कारण चिंचवड हें एक औद्योगिक केंद्राजवळचें खेडें आहे. त्यामुळें चिंचवडच्या शाळेचीं माझीं स्वप्नें भंगलीं. माझ्या बरोबरचे सहकारी मार्गी लागले होते. कर्नाटक, गुजरात येथें खादी काम सुरू झालें. गुजरात विद्यापीठानें तर चांगलेंच नांव कमावलें होतें. माझ्या बरोबरचे सर्व विद्यार्थी गुजराथ विद्यापीठांत शिक्षक बनले होते. मी एकटाच बेकार राहिलों होतों !

श्री. जमनालालजींनीं मला बोलावून घेतलें व ' महाराष्ट्रांतील खादी काम पाहून या, मी खर्च देईन ' असें सांगितलें. वर्धा येथें मी तेव्हां प्रथम गेलों. तेव्हां महाराष्ट्र चरखा संघाचें मुख्य ऑफिस वर्धा येथें होतें. महाराष्ट्राचें काम श्री. दास्ताने यांच्याकडे होतें. त्यांचें ऑफिस जळगांवजवळ पिंपराळें येथें होतें. श्री. कृष्णदास जाजू हे महाराष्ट्र चरखा संघाचे मंत्री झाले. जाजूजी हे एक मोठे समाजसुधारक होते. ते जमनालालजींचे कायद्याचे सल्लागार. त्यांच्या सोयीसाठीं ऑफिस वर्ध्याला होतें.

श्री. धोत्रेजी हे जमनालालजींचे सेक्रेटरी होते. १९२८ मध्यें त्यांचा व माझा प्रथम संबंध आला. श्री. विनोबांच्या बरोबर १९१८ सालीं ते साबरमतीला आले. १९२१ मध्यें साबरमतीच्या सत्याग्रह आश्रमाची शाखा म्हणून विनोबांनीं वर्धा येथें आश्रम सुरू केला. आपल्या मुलींच्या शिक्षणासाठीं आणि कार्यकर्त्यांच्या मुलींसाठींहि जमनालालजींनीं वर्ध्याला महिलाश्रम सुरू केला. विनोबा व धोत्रेजी दोघे तेथें शिकवीत. सौ. वारूताई दास्ताने या मुलींच्या बोर्डिंगच्या प्रमुख होत्या. मी आल्यावर धोत्रेजींकडे उतरलों. ते त्या वेळीं महाराष्ट्र चरखा संघाच्या शाखेचें काम करीत होते.

मी सावली व मूल येथील खादी–उत्पत्ति–केंद्रें पाहून आलों. तेलंगणाचे कांहीं जिल्हे तेव्हां महाराष्ट्र चरखा संघाच्या क्षेत्रांत होतें व तेथें एकादें केंद्र चालवण्याची कल्पना होती, म्हणून मी, जाजूजी व धोत्रेजी तिघेहि तेथें गेलों व अनेक गांवें पाहिलीं. १५ दिवस त्या भागांत हिंडलों व तेथें खादी–उत्पत्ति–केंद्र सुरू करणें योग्य व शक्य आहे, असा निर्णय केला. तेथें घरोघर चरखे चालतच होते. विणकरहि गांवोगांव होते. ८० टक्के माणसें खादीधारी होतीं. कांहीं प्रमाणांत वस्तुविनिमयाची पद्धतहि चालू होती. कांहीं विणकर जादा हातसूत खरेदी करून विणून आठवडे बाजारांत देत. खादी जितकी जाड, तितकी चांगली मानली जाई. लाखों रुपयांची खादी तेथें बाजारांत येई, विकली जाई. तेथें कामाला सुरुवात करण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली गेली. २० मे १९२९ ला मीं मेटपल्ली येथें काम सुरू केलें.

मी नोकरी सोडून २–२॥ वर्षें शिक्षण केलें तें १२ रुपये स्कॉलरशिपवर. वडिलांनीं पेन्शन घेतलें होतें. ते कांहीं दिवस माझ्याबरोबर चिंचवडच्या शाळेंतहि शिकवीत असत. मी ३० रुपये पगारी शिक्षक आणि वडील ऑनररी शिक्षक! सरकारी चाकोरींतून बाहेर पडून शिक्षणावर मोकळेपणें प्रयोग करायला मिळाले म्हणून त्यांना फार आनंद झाला होता. त्यांच्यांतील जातिवंत शिक्षक जागा झाला होता. जातिभेद मोडणें इत्यादि माझ्या सर्व कामांना त्यांचा वैचारिक पाठिंबा होता. पण मी नोकरी सोडून साबरमतीला आल्यावर घरची चांगलीच ओढगस्त चालू होती. माझा एक चुलतभाऊ द. म. २० रुपये घरीं पाठवी, तेहि फेडायचे होते. बहिणी लग्नाच्या झाल्या होत्या. दोघे भाऊ राष्ट्रीय शाळेंतून मॅट्रिक झाले, ते पायोनिअर डाइंग हाउसमध्यें नोकरीला होते. कर्ज डोईजड होत चाललें होतें. कदाचित् या साऱ्या परिस्थितीची जमनालालजींना कल्पना असावी. तेव्हां त्यांनीं श्री. जाजूजींना सांगितलें कीं, अण्णांच्या पगाराचें तुम्ही ठरवूं नका. तें मी पाहून घेईन. मला त्यांनीं पगाराचें विचारलें तेव्हां मीं ७५ रु. पगार मागितला व तो त्यांनीं कबूल केला. मला केवळ ८–१० रुपये च लागत. बाकीचे सारे पैसे घरीं जाऊं लागले. निदान तेवढी काळजी दूर झाली.

मी मेटपल्लीला तर आलों. तेथें सर्वच दृष्टीनें पूर्ण अज्ञान होतें. लोकांना इतकेंच माहीत होतें कीं, कुणा गांधीचें राज्य आलें आहे–तें अस्पृश्यता मोडायला आलें आहे. त्यांची कंपनी आहे. मी त्या कंपनीचा नोकर, तेव्हां मी हरिजन असणारच, हेंहि ते धरून चालले! प्रथम दोन–अडीच महिने यामुळें मला राहयला घरहि मिळेना. मेटपल्लीला देवळाच्या कट्ट्यावर

झोंपायचें व दिवसभर हिंडायचें. सकाळीं २ पैशांचे तांदूळ, १ पैशाचें तेल व १ पैशाची भाजी असें सारें एकत्र एका भांड्यांत शिजवायचें व नदीकांठीं हें खायचें, असा माझा क्रम सुरू झाला.

तेथें कोमटी व्यापारी होते. त्यांच्यातर्फेंच मीं काम करावें, अशी त्यांची इच्छा. पण प्रत्यक्ष विणकरांशींच संबंध जोडावे, ही माझी इच्छा. मी हरिजन समजला गेल्यानें ब्राह्मणांचा आणि सरळ विणकरांपर्यंत पोंचलों म्हणून कोमट्यांचा विरोध सुरू झाला. मी तेथील भाषेलाहि नवखा. पण शेवटीं मी एक मुसलमान व एक कोमटी असे दोन दुभाषी नोकर मिळवले. आठवड्यांतून ३ दिवस एक व ३ दिवस दुसरा बरोबर राही. कारण रोज ८-१० मैल चालण्याच्या माझ्या कार्यक्रमाला सतत एकच मनुष्य टिकेना. आसपासच्या ९०-१०० खेड्यांत हळूहळू माझे संबंध निर्माण झाले.

पुढें एक जागाहि मला भाड्यानें मिळाली. प्रथम माझ्याकडून नोटाहि माणसें घेत नसत. गांधी राज्याची नोट असली तर ! पण पुढें पुढें विश्वास निर्माण झाला. माझी गांधीबाबाची नोट नसून सुरती रुपयेच आहेत, याची खात्री पटली व माझा खरेदीचा जम चांगलाच बसूं लागला. मला स्वतःला विणकाम चांगलें येत असल्यामुळें मला फसवण्याची विणकरांची प्राज्ञा नव्हती.

मेटपल्ली भागांत दारिद्र्य भयंकर. जवळपास मोठें शहर वा औद्योगिक केंद्र नाहीं. भाग अत्यंत मागासलेला. लोकांना तेथें दुखण्यावर साधें औषधदेखील मिळत नसे. मीं साधें पोटीस बांधणें, शेकणें असे उपाय विशेषतः सडलेल्या जखमा व त्वचारोगांवर सुरू केले. वर्धा येथील एका वैद्याकडून ८-१० औषधें नेलीं व उपचार करूं लागलों. लोक मला तेथें प्रथम 'महाराज' म्हणत. औषधें देण्याचा लगेच फायदा झाला. मुसलमान समाजांत तेथें पडदापद्धत फार, पण औषधें देऊं लागल्यावर मात्र 'महाराजा' पुढें पडदा नाहींसा झाला ! दारू न पिणाऱ्यांचा एक संघहि मीं काढला. मुलांचें एक दल काढलें. बरोबर अंघोळीला तलावावर जाणें इतकाच या दलाचा कार्यक्रम होता ! पण त्यामुळें लहान मुलें खूप ओळखीचीं झालीं. रात्रीं शिकायलाहि येऊं लागलीं. माझें एकटेपण संपलें. रात्रंदिवस मी कामाच्या खुशींत व मस्तींत होतों. हळूहळू धंदा वाढूं लागला. तसे एक-दोन मदतनीसहि चरखा संघानें पाठवले.

माझी कामाची हांव वाढत होती. भात शिजवा, मग खा, इतका तरी वेळ कशाला घालवा, असे विचार मनांत येऊन मीं ठरवलें कीं, नुसतेंच मोड आणून धान्य खाल्लें तर काय हरकत आहे ? पुन्हां खांद्यावरील पडशींत हें 'खाद्य' नेणें व ठेवणेंहि सोपें ! मीं भाज्या, फळें व मोड आणलेलें धान्य खायला सुरुवात केली. पण हा वेळ वांचवायला गेल्याचा प्रयोग अंगाशीं आला. कच्चें खाल्ल्यानें कीं, काय मला एक दिवस खूप ताप भरला. व तो टायफॉइडवर गेला. मी मोठ्या विचारांत पडलों. निदान जरूर पडली तर वर्ध्यापर्यंत संबंध जोडतां आले पाहिजेत. त्या वेळीं तर त्या भागांत दळणवळणाचीं साधनेंहि नव्हतीं. अंगांत शक्ति आहे तोंपर्यंतच निदान रेल्वे लाइनजवळ जावें, असें मला वाटलें व एका बैल-

गार्डीत लिंबारा भरून ३४ मैलांवर मामेडपल्ली नांवाचें एक गांव आहे, तेथें मी आलों. तेथें एक खादीधारी वकील–जमीनदार होते. त्यांचे घरीं–म्हणजे पडवींत–मी येऊन पडलों.

नऊ दिवस माझ्या अंगांत खूप ताप होता. दोन-तीन दिवस वातहि झाला. या साऱ्यावर इलाज म्हणजे एकच–पूर्ण उपास! तेवढा मीं केला. नंतर हळूंहळूं जेवायला सुरुवात केली. पण तेथें अत्यंत विचित्र अनुभव आला. माझें पान गटारीजवळ मांडलें गेलें. माझ्या मनांत आलें कीं, माझें येथील वास्तव्य बहुधा घरांत त्रासदायक झालें असावें!

आयुष्यांत अत्यंत एकाकी व असहाय असें मला तेव्हांच प्रथम वाटलें. आपलें मायेचें माणूस कुणी जवळ असावें, असें त्या वेळीं अत्यंत तीव्रतेनें वाटलें. मला सहसा असें एकाकी वाटत नाहीं. अमूक एक आपलीं माणसें आहेत वा दुसरीं परकीं आहेत, अशी भावनाहि प्रायः नष्ट झालेली आहे. कुठेंहि गेलों तरी आपुलकीनें करणारीं माणसें आहेतच. सर्व समान व जवळचींच आहेत. पण असह्य अशी शारीरिक दुर्बलता आली कीं ही एकाकीपणाची भावना माझ्यावर मात करते. आणि मेटपल्लीला तर मी त्या मानानें अगदीं नवीन होतों. शारीरिक कष्टांनीं मी हार गेलों नसतों, पण शारीरिक दुबळेपणा अपरिचित होता. माझा भार दुसऱ्यावर अनिच्छेनें पडत आहे, असें मला वाटलें व ताप उतरल्यावर दोन-तीन दिवसांतच मी पुन्हां लिंबाचा पाला गार्डीत भरला व ३४ मैलांवरील मेटपल्ली गांठली. मागून मला असा शोध लागला कीं, मला हरिजन समजल्यामुळें माझें पान गटारीजवळ गेलें होतें!

● ● ●

# ३ : माणूस झालों!

१९३० च्या मार्चच्या पहिल्या आठवड्यांत माझे वडील वारले. पत्र ८ मार्चला मला मिळालें व मी सर्व काम सहायकांवर सोंपवून पुण्याला परत आलों. क्रिया उरकून पुन्हां मेटपल्लीला जायचें ही कल्पना माझी होती, पण १९३० चें सत्याग्रह पर्व सुरू होण्याच्या मार्गावर होतें. ६ एप्रिलला मिठाच्या सत्याग्रहाला सुरुवात व्हायची होती. चिंचवड राष्ट्रीय पाठशाळेच्या तुकडीनें विलेपार्लें सत्याग्रह छावणींत दाखल व्हावें असें ठरलें. पुण्याहून चालत विलेपार्लें येथें जायचें आम्हीं ठरवलें. वडील जाऊन १५ दिवसच होत होते, पण घरचे पाश मला आतां बांधूं शकत नव्हते. महाराष्ट्राची पहिली सत्याग्रही तुकडी मी विलेपार्लें येथें नेली.

पुन्हां सत्याग्रहाच्या मोठ्या ऑफिसची जबाबदारी माझ्यावर पडत होती, पण मागील मुळशी सत्याग्रहांत माझा तुरुंगवास राहून गेला होता आणि या वेळीं तुरुंगदर्शन

घ्यायचेंच असें मीं ठरवलें होतें. मी गेलीं २–३ वर्षे इकडे नव्हतों. या सत्याग्रहासाठीं महाराष्ट्रांत एक युद्धसमिति निर्माण झाली होती. शंकरराव देव, जावडेकर, दास्ताने, अप्पासाहेब पटवर्धन ही मंडळी तेव्हां या समितींत होती. श्री. अप्पासाहेब पटवर्धन वेंगुर्लें छावणींत प्रथम पकडले गेले; त्यांच्यानंतर श्री. दास्ताने हे प्रमुख बनले. आणि ते पकडले गेल्यावर छावणीचें काम माझ्यावर आलें. विलेपार्लें येथें जमून नंतर कोंकण किनाऱ्यावर आम्ही पसरलों. तेथून रत्नागिरीला व पुढें मालवणला, आम्ही गेलों. एक महिना ती छावणी मीं चालविली. मालवणच्या नागरिकांनीं कल्पनातीत साहाय्य केलें. गांवांतून रोज २०–२५ स्त्रिया स्वयंपाक करीत. ५०० लोक रोज जेवत. स्वयंसेवकांना न पकडतां फक्त पुढारी धरून सरकारनें कोंडी केली होती. मी रोज संध्याकाळीं समुद्रावर व्याख्यान देई. १०–२० हजार लोक जमत. सरकारी नोकर, मामलेदार सर्वच व्याख्यानास येत. मीं दहा–दहा वीस–वीस लोकांच्या तुकड्या तयार केल्या आणि मालवण–देवगड–वेंगुर्ला हे तालुके अक्षरशः घुसळून काढले.

रत्नागिरींतील कोळीमंडळी (गाबीत) या चळवळीस फार मदत करीत. मासे खारवायला मीठ लागे. तें हातानेंच तयार करून वापरायची मुभा त्यांना सत्याग्रहामुळें मिळणार होती. त्यांच्यांतील अनेक मुलें सत्याग्रहांत आलीं होतीं. केवळ भाषणांनीं धरपकड होईना म्हणून शिरोडें येथील मिठागरावर ३ मे रोजीं मोर्चा नेला. आमचे ७०० सत्याग्रही व तेवढेच पोलीस ! सत्याग्रहाला सहानुभूति अमाप असल्यानें पोलिसांना पाणीहि मिळेना !

यामुळें छावणींत तात्त्विक चर्चा सुरू झाली. शत्रूचें अन्न व पाणी तोडणें अहिंसक युद्धांत बसतें का ? आम्हीं ठरवलें, अन्नपाणी तोडायचें नाहीं. आमच्या छावणींतून कित्येक वेळां पोलिसांना अन्नपाणी आम्हीं पोंचविलें. मग मात्र खरें धर्मयुद्ध सुरू झालें. त्यांचे वरिष्ठ अधिकारी व आमचे पुढारी एकमेकांच्या योजना एकत्र बसून विचारविनिमयानें ठरवीत. धरपकड सुरू झाल्यानंतर पकडलेले लोक ठेवायचे तरी कोठें ? तेहि आमच्याच छावणींत पुन्हां येत ! या संग्रामाला हुतूतूच्या खेळाचें स्वरूप आलें होतें ! नांवें लिहून आउट झालेल्या भिडूंनीं पुन्हा सत्याग्रह करायचा नाहीं ! मात्र गोळीबार शेवटपर्यंत झाला नाहीं. सावंतवाडीहून कांहीं लोकांना सोडून दिलें. नंतर निवडक लोकांची रवानगी जेलमध्यें झाली. मला या वेळीं ६ महिन्यांची शिक्षा झाली. रत्नागिरी जेलमध्यें मी होतों. अप्पासाहेब पटवर्धन, डॉ. आठल्ये, वि. म. भुस्कुटे, आ. जावडेकर, रावसाहेब पटवर्धन, डॉ. लागू, हे सर्व तेव्हां तेथें होते. या वेळीं बी–क्लास मिळाल्यानें बरेचसें वाङ्मय–विशेषतः कम्युनिस्ट वाङ्मय-मला वाचायला मिळालें.

येथून सुटल्यावर पुण्यास मी ५–६ दिवस होतों. पुन्हां रत्नागिरी जिल्ह्यांत मालवण छावणींत कामाला सुरुवात केली. विलायती कापडावर बहिष्कार आणि दारूबंदी या चळवळींना सुरुवात झाली होती. मालवण तालुक्यांत विलायती मालाची पूर्ण नाकेबंदी आम्हीं केली. ताडीचींहि सर्व दुकानें बंद पाडलीं. दारूबंदीच्या माझ्या एका भाषणावर चॅप्टर केस होऊन एक वर्षांची साध्या कैदेची शिक्षा मिळाली. पण गांधी–आयार्विन करारानंतर मी सुटलों

व राजरोसपणें मालवणला येऊन आम्हीं मिठागरें सुरू केलीं. एक कोटी वार सूत गांधीजींना अर्पण करण्याचा कार्यक्रम आम्हीं घेतला व सूतकताईस जोरानें चालना दिली. परंतु या वेळीं मी छावणींत फार राहिलों नाहीं.

कोळी समाजांत माझ्या उत्तम ओळखी झाल्या होत्या. त्यांचेमध्येंच राहून व त्यांच्या बरोबर समुद्रांत पडावांत झोपून त्यांच्या धंद्याच्या संघटनेच्या दृष्टीनें कामाला मीं सुरुवात केली. प्रत्येक जण रोज एक आण्याचें धान्य छावणीस देई. इतर कुटुंबांतून पाळीनें जेवणहि मिळे.

याच वेळीं वादळानें व पावसानें मालवण तालुक्यांत कहर उडाला. अनेक घरें वाहून गेलीं व त्यांचा मदतीचें काम चालू झालें. मदतीसाठीं एक लाख रुपये मुंबईत जमा झाले. श्री. ए. बी. पंडित त्या वेळीं रिलीफ कमिटीचे प्रमुख होते. कोळी लोकांच्या खाण्यापिण्याच्या प्राथमिक सोयी झाल्यानंतर त्यांच्या झोपड्या बांधायला मदत करण्यास मीं सुरुवांत केली. प्रत्येकाच्या घराच्या खर्चाचा अंदाज घेणें, प्लॅन करणें व पैसे वांटणें यांत मी रमलों होतों.

१९३२ च्या जानेवारींत पुन्हां सत्याग्रह सुरू झाला. या मदत कमिटीचे १०–२० हजार रुपये वेगवेगळ्या व्यापाऱ्यांकडे होते. हे सर्व पैसे काढून व वांटून मग आपण सत्याग्रह करायचा असे मीं ठरविलें. पण माझ्यावर वॉरंट निघालें. मला पकडून देणाराला १००० रुपयांचें बक्षीसहि जाहीर झालें. १५–२० दिवसांत मीं हें काम संपविलें. २० पोलिसांची पार्टी मला पडण्याकरितां निघाली होती. मग मात्र मलाहि चेव आला आणि पकडलें न जातां रोज एक व्याख्यान द्यायचा तडाखा मीं लावला. पोलीस धरायला येईपर्यंत सभा पूर्ण होऊन तें गांव मी सोडून गेलेला असें. पण यानंतर मी जिथें उतरे आणि जे मदत करीत त्यांना धरायला पोलिसांनीं सुरुवात केली. ८० लोक पकडले व २०० लोकांवर नोटिसा काढल्या. आपल्यामुळें अनेकांना असा त्रास होणें योग्य नाहीं, असें वाटल्यानें ३० जानेवारी १९३२ रोजीं मी मालवणला समुद्रावर व्याख्यान देणार आहे, असें जाहीर केलें.

मीं मालवणांत येऊं नये, अशी जय्यत तयारी पोलिसांनीं ठेविली होती. पण माझ्या कोळी मित्रांच्यामुळें एक माणसाच्या लहान पडावांतून मालवणला तर मी आलोंच. श्री. मधुकर भांडारकर यांचेकडे एक खाजगी सभा घेतली व सकाळीं ८ वाजतां ठरलेल्या वेळीं जाहीर सभेसाठीं हजर झालों व तिथेंच पोलिसांनीं मला पकडलें. या वेळीं पुन्हा रत्नागिरी तुरुंगांत दोन वर्षें मीं काढलीं. या वेळीं जेलमध्यें माझी प्रकृति फार बिघडली. सहा–आठ तास दळण्यामुळें शरीर आंतून कोरडें पडलें. बद्धकोष्ठतेचा विकार जडला. दृष्टीवरहि परिणाम झाला. लेखन वाचन इ० या वेळीं सी–क्लासमुळें जमलें नाहीं.

१४ जानेवारी १९३४ रोजीं मी सुटलों आणि पुण्याला एक दोन दिवस राहिलों. याच वेळीं बिहारच्या भूकंपानें सारा देश हादरून गेला होता. मलाहि घरीं राह्यची इच्छा नव्हती. म्हणून बिहार भूकंप सहायक समितीतर्फे मुजफ्फरपूरमध्यें बेलसंडाठाणा येथें मी गेलों. अडीच तीन हजार स्वयंसेवक बिहारमध्यें काम करीत होते. मला प्रथम आश्चर्य वाटे. इतकीं माणसें घर-दार सोडून केवळ अन्नावारी काम करीत आहेत, यांच्या घरीं काय होत असेल ? पण

आपल्या व बिहारच्या परिस्थितींत बराच फरक आहे. त्यामुळें दोघेतिघे भाऊ शेतावर राबत आणि एखादा देशभक्तीनिमित्त अगर अन्य कारणानें घराबाहेर पडला, तरी त्याच्या कुटुंबाची जबाबदारी सर्व मिळून सहजीं घेत.

बिहारच्या दारिद्र्याचें भयानक स्वरूप मीं तेथें प्रथम पाहिलें. तेथें अस्पृश्य आहेत. घरांत दोघीतिघी स्त्रिया असल्या तर बाहेर पडण्याजोगा एकच कपडा असे. फाटक्यातुटक्या कपड्यांतून बाकी अर्धनग्न माणसें घरांत राहत. एक पैशाच्या रताळ्यांत सर्वांचें जेवण होई. आणि तेंहि मिळालें नाहीं तर तळ्यांतील शिंपल्यांतून किडे काढून खात व त्यावरच दिवस निघे.

जमीनदारवर्ग तेथें फार मोठा होता. त्यांचीं धान्याचीं कोठारें भरलेलीं असायचीं. दारांत गजान्तलक्ष्मी पांचदहा नोकर पाणी आणण्यासाठीं व अंग रगडण्यासाठीं घरांत राबत. कायम धान्याच्या जमीनदारीपद्धतीनें श्रीमान् असा जमीनदार वर्ग निर्माण झाला. बाकी माणसें केवळ गुलाम म्हणून जगत होतीं. बिहारमध्यें नम्रता नाहीं, आहे ती आगतिकता आहे.

बरेंचसें कम्युनिस्ट वाङ्मय मीं जेलमध्यें वाचलें होतें. परंतु सरंजामशाहीचें हें नागडउघडें दर्शन पुस्तकांपेक्षा जास्त परिणामकारक होतें. माझ्या विधायक वृत्तींना चांगलाच हादरा बसला.

१९२४ सालीं गांधीजींनीं उपवास केला त्या वेळीं त्यांच्याशीं कांहीं चर्चा मीं केली होती. या देशांत जनतेची कांहीं संघटना उभारायची असेल तर ती विधायक कामांतून उभी राहील असा एक विश्वास मला वाटला होता आणि विधायक काम सोडून प्रत्यक्ष राजकीय कामांत पडण्याची जरूर नाहीं, असेंहि मला वाटलें होतें. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं हिंदुस्थानां-तील विविध राजकीय प्रवाहांचें बळ इंग्रजशाहीविरुद्ध एकत्र झालें होतें. स्वातंत्र्य मिळेपर्यंत या शक्ति फुटण्याची शक्यता नव्हती. पण बिहारमधील तीं दृश्यें पाहून पुढील परिस्थितीचें कांहीं आकलन मात्र मला झालें. ही उपाशी जनता आणि काँग्रेसमध्यें वर्चस्व असलेला श्रीमान जमीनदार वर्ग यांचा लढा अटळ आहे, असें मला वाटलें. बिहारमधील कांहीं मित्रांनीं मला विनंती केली कीं मीं बिहारमध्येंच काम करावें. त्या वेळीं मीं त्यांना सांगितलें कीं मीं बिहार-मध्यें राहिलों तर काँग्रेसमध्यें खास रहाणार नाहीं!

७–८ जुलैला मी वर्ध्यास आलों आणि तेथून पुन्हां मेटपल्लीला गेलों. तेथील काम खूपच वाढलें होतें. दरवर्षीं १० लाखांची खादी तेथें निर्माण होऊं लागली होती. श्री. द्वारकानाथ लेले त्या वेळीं तेथें होते. त्यांचें नुकतेंच लग्न झालें होतें. मी, दास्ताने व शंकरराव देव तिघेहि जेवायला लेले यांच्याकडे गेलों. लग्नाचे म्हणून २–४ लाडू खाल्ल्यानंतर मी आतां माझें जेवण झालें आहे, असें सांगितलें. पण त्यांचा आग्रह संपेना. तेव्हां आम्हीं सांगितलें कीं तुम्हीं जितका वेळ वाढाल तितका वेळ आम्ही खाऊं. तुम्हीं दमलांत म्हणजे वाढायचें थांबवा! शेवटीं लाडू संपले. सौ. कमुताई लेले याहि इतक्या लवकर हार जाणार नव्हत्या. त्यांनीं कणीक भिजवून पोळ्या केल्या. त्याहि सपल्या! शेवटीं त्यांनीं हार खाल्ली! कमुताई या प्रभु–कुटुंबांतील आहेत. आमच्या जेवणाचा हा ब्राह्मणी तडाखा त्यांनीं कायमचा लक्षांत ठेवला. आणि अगदीं घनिष्ठ असे संबंध कायमचे निर्माण झाले!

मेटपल्लीचें काम एक लाखावरून दहा लाखांवर गेलें आहे यांत मला मुळींच समाधान नव्हतें. खऱ्या अर्थानें कोणतीहि विधायक दृष्टि त्या कामांत राहिली नाहीं, असें माझें मत होतें. खादीचा व्यापार करण्याकरितां एक ईस्ट इंडिया कंपनीसारखी कंपनी आपण स्थापन केली आहे व आपणहि लोकांची पिळवणूकच करीत आहोंत, असें माझें मत इतरांना सांगितलें.

व्यापार वाढल्यामुळें दोनाऐवजीं चार पैसे लोकांना मिळूं लागले हें खरें, पण त्याबरोबरच दारूच्या गुत्यांची विक्री दरमहा एक हजारावरून आठ हजारांवर गेलेली होती! आम्हीं काम सुरू केलेल्या १५० गांवांची हीच स्थिति होती. मी प्रथम तेथें गेलों तेव्हां ८० टक्के लोक खादीधारी होते. आज रोख पैसे मिळूं लागल्यामुळें स्वस्त अशा गिरणीच्या कापडानें तेथें प्रवेश केला होता. ४० टक्के माणसेंसुद्धां खादीधारी राहिलीं नव्हतीं. शाळा पूर्वीहि नव्हत्या आणि तेव्हांहि निघाल्या नाहींत. ९० टक्के कार्यकर्ते बाहेरचे होते. आणि त्यांचा कार्यक्रम–आठ तास काम आणि बाकी पत्ते कुटणें! स्थानिक कार्यकर्ते निर्माण करण्याची दृष्टि वा कार्यक्रम आपल्याजवळ नाहीं. आपण सेवा करीत आहोंत कीं व्यापार?

स्थानिक जनतेचें कोणत्याहि तऱ्हेनें उत्थान झालेलें मला दिसलें नाहीं. माझे हे विचार पुढें मांडल्यामुळें त्यावर बरीच चर्चा झाली. पिळवणूक, म्हणजे काय, आर्थिकदृष्ट्या पिळवणूक कीं पैशांचा दुरुपयोग मजूर करीत असल्यामुळें होणारी पिळवणूक. अशा पिळवणुकीचें पाप पैसे वांटणारावर किती येते, असे अनेक मुद्दे त्यांतून निघाले. पण माझें समाधान त्यांतून झालें नाहीं.

यानंतर मीं पुन्हां महाराष्ट्रांत आलों. या वेळीं महाराष्ट्र कॉंग्रेसचें पुनःसंघटन चालू होतें. कॉंग्रेसतर्फें विधायक कार्य करण्यासाठीं चार सेक्रेटरींपैकीं एक सेक्रेटरी म्हणून माझी नेमणूक झाली. पुढील सहा महिने या कामासाठीं मी हिंडत होतों. पण विधायक कार्यच करायचें तर महाराष्ट्र चरखा संघातर्फेंच करावें, असा आग्रह श्री. जाजूजी, श्री. धोत्रेजी आणि अनेक मित्रांनीं केल्यामुळें ५ जानेवारी १९३५ ला महाराष्ट्र चरखा संघाचा सेक्रेटरी म्हणून मी वर्ध्यास परत आलों.

आलों तेव्हां श्री. धोत्रे यांच्या घरींच उतरलों. आणि कायम येथें रहायचें तेव्हां घर वगैरे शोधावें असा विचार करूं लागलों. सौ. शरयूताई उर्फ अक्का धोत्रे या मनानें अत्यंत मोकळ्या आणि अत्यंत उदार स्वभावाच्या. दोन तीन दिवसांतच त्यांच्या घरांतील माझा परकेपणा संपला होता. त्या मला म्हणाल्या : "वेगळें घर म्हणजे तुम्ही काय करणार? महिन्यांतून २८ दिवस हिंडणारच ना? तेव्हां आल्यावर एक दिवस खोली साफ करायला व एक दिवस बंद करायला घालवणार. त्यापेक्षां येथेंच कां रहात नाहीं? मी माझा संसार मांडलाच आहे आणि हीं मुलें लहान आहेत तोंपर्यंत संसारापलीकडे दुसरें कांहीं करूंहि शकणार नाहीं. तुम्हीं दोन तीन माणसें संसारांत वाढला तरी तीं मला जड नाहींत. खर्चाचा सर्व हिशेब करून मी सर्व तुमच्या वांट्याचा खर्च सांगेन. जेवायला वेळेवर या किंवा रात्रीं वेळेवर या अशी कोणतीहि अट माझी नाहीं. त्यांतून तुम्हांला संकोच वाटत असेल तर गोष्ट वेगळी."

८५०१



या विनंतीला नकार देणें शक्यच नव्हतें. या अगोदर मी फार विचित्र मनुष्य होतों. विद्यार्थिदशेपासून घर असें फारसें नव्हतेंच. हरिभाऊ फाटकांच्यामुळें ब्रह्मचारी रहायचें असें एक आकर्षण होतें. त्यामुळें स्त्रियांच्या बाबतींत मी अत्यंत संकोचून आणि अलिप्तपणें रहात असें. एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं भाषणें प्राण गेला तरी करूं नयेत, हें रामदासांचें वचन मी कांटेकोरपणें पाळीत असें.

अप्पासाहेब पटवर्धनांबरोबर जेलमध्यें एकदां चर्चा झाली होती. समाजांत ५० टक्के स्त्रिया आहेत. तेव्हां त्यांच्या सेवेचा विचार करणें आवश्यक नाहीं का? हा त्यांचा विचार मला पटला होता. आणि स्त्रियांशीं न बोलण्याचीं वगैरे व्रतें मीं सोडण्याचें ठरविलें होतें. पण हें केवळ विचारांतच. प्रत्यक्षांत माझा संकोच कांहीं मोडला नव्हता. अक्का धोत्रेंनीं मात्र मला एक-दोन महिन्यांतच पूर्ण माणसांत आणलें. रोज आंघोळ करणें, रोज कपडे धुणें, वेळेवर दोन वेळां जेवणें अशा कांहीं सभ्य संवयी त्यांनींच मला लाविल्या. त्यांचीं लहान मुलें माझ्या-बरोबर खेळत. मी गोष्टी सांगाव्यात म्हणून हट्ट करीत. मी धोत्रे परिवारांत पूर्ण रमलों होतों. घराची किंमत तेथें कळली. चांगलें जेवण देणें, प्रत्येकाची आवड निवड लक्षांत ठेवणें, प्रत्येकाची काळजी करणें हे सर्व गुण अक्कांजवळ होते. माझें जेवण दोन्ही पंक्तींत चाले. जेवण म्हणजे गप्पांचा अड्डाच होता. पण माझ्या वागण्यांत नियमितपणाहि पुष्कळ आला. रोज एका वेळीं फक्त तीन पोळ्या खायच्या असा माझा नियम होता. गप्पांच्या नादांत एकदां तीनाऐवजीं सात पोळ्या अक्कांनीं वाढल्या. खाल्ल्यानंतर सर्व हंसूं लागले. मी विचारल्यानंतर अक्का म्हणाल्या: "तुमच्या नियमांची शुद्ध तुम्हांला किती आहे हें पाहिलं! यावरून मी इतकेंच समजलें कीं तुमचे नियमहि मींच पाळले पाहिजेत!"

स्त्रियांशीं बोलण्याचा गुण शिकल्यामुळें माझा एक मोठा फायदा झाला. चरखासंघाच्या कार्यकर्त्यांच्या घरीं माझा संबंध वाढूं लागला. मीं तर पुढें पायंडाच पाडला कीं, कुठेंहि कामा-निमित्त गेलों कीं आपल्या कार्यकर्त्यांच्या घरींच उतरायचें. त्यामुळें प्रत्येकाचें जीवन मला अगदीं जवळून दिसे. त्याच्या घरांतील माणसें, बायको, मुलें-बाळें सर्वांशीं माझी ओळख होई. चरखा संघाचें साम्राज्य तेव्हां मोठें होतें! आणि सामान्य कार्यकर्त्यांशीं इतकी सलगी योग्य नाहीं, असेंहि कांहींचें मत होतें. मी प्रथम आलों तेव्हां धोत्रेजीच माझे सल्लागार होते.

जाजूजी आणि कृष्णदासभाई हे महाराष्ट्र चरखा संघाचे प्रमुख. त्यांच्याशीं आपलें कसें जमणार, अशी थोडी आढी मनांत होतीच. पण धोत्रेजी यांनीं मला असें सांगितलें कीं, एक वर्ष येथील कामाची संपूर्ण कल्पना येईपर्यंत तुम्हीं पुढाकार घेऊन असें कांहींहि करूं नये. सेक्रेटरी असा मी प्रथमच झालों. ऑफिस कामाचीहि मला संवय नव्हती. पुढें हळूहळू त्याची संवय होऊं लागली. खादी हा धंदा म्हणून कसा करावा, यांतील खांचाखोंचा मला कळत नव्हत्या. पण जाजूजी, कृष्णदासभाई गांधी या दोघांचें मत असें होतें कीं, महाराष्ट्रांतील कार्यकर्त्यांशीं संबंध ठेवायचा तर सेक्रेटरी मराठीच पाहिजे. आणि म्हणून मला तेथें कायम करण्याच्या दृष्टीनें त्यांची धडपड होती.

माझ्यापेक्षां आधीं आलेले अनेक मराठी कार्यकर्ते ऑफिसमध्यें होते. त्यांना बाजूला सारून मला प्रमुख केल्यामुळें एकदम विरोध निर्माण झाला. प्रथम कांहीं दिवस माझ्याशीं बराच असहकार ऑफिसमध्यें व अन्य कामांतहि मला जाणवला. परंतु जाजूजी व कृष्णदास-भाई यांची भूमिका खंबीर होती. पहिल्या चार-सहा महिन्यांनंतर विरोध थोडासा निवळला. व्यापार आणि व्यवस्था यांत शिक्षण देण्याचें काम कृष्णदासभाईंनीं केलें. त्या वेळीं तेच माझे गुरुजी होतें. कृष्णदासभाईंचा मोठा गुण असा कीं, त्या वेळीं गुरुजी म्हणून त्यांनीं मला शिकविलें आणि नंतर कित्येक वेळां माझे साहाय्यक म्हणूनहि काम केलें. पण कोणत्याहि कामांत उच्च-नीचता किंवा मानापमानाची भावना त्यांच्या मनांत कधींहि येत नाहीं.

१९३६ मध्यें केशव देवधर माझ्या ऑफिसमध्यें आले. ते गुजराथ विद्यापीठांत स्पिनिंग मास्टर म्हणून होते आणि मिठाच्या सत्याग्रहांत आघाडीवर होते. ३६ मध्यें ते माझे साहाय्यक म्हणून आले. माझा सर्व पत्रव्यवहार तेच पहात. उत्तरेंहि तेच देत, इतकेंच नव्हे तर माझ्याच भाषेंत उत्तरें देत; पण माझे साहाय्यक म्हणूनच राहिले तर त्यांच्या स्वतंत्र कर्तृत्वाला वाव मिळणार नाहीं, असें मला वाटलें. यानंतर ते कृष्णदासभाईंच्याकडे गेले. टेक्निकल लाइनमध्यें त्यांनीं चांगलीच प्रगति केली व अखिल भारत चरखा संघाच्या मुख्य शाळेचे प्राचार्य बनले. माझ्या ऑफिसच्या कामामध्यें त्यामुळें थोडे अडथळे आले, पण कामाच्या विचारांबरोबरच प्रत्येक व्यक्तीचा विचार व विकास कसा होईल, हेंहि पहावें असें मला वाटतें. सर्वच कार्य-कर्त्यांच्या बाबतींत ही दृष्टि मी डोळ्यांपुढें ठेवतों. यासाठीं वैयक्तिक संबंध वाढविला पाहिजे.

• • •

# ४ : खादीकार्य

महाराष्ट्र चरखासंघांत त्या वेळीं सुमारें दोनशें कार्यकर्ते होते. सर्वांच्या जीवनांत मित्र व मार्गदर्शक म्हणून मला प्रवेश मिळाला होता. अशा वागण्यानें व सलगीनें सेक्रेटरी म्हणून आदर कमी होतो, असें अनेकांचें मत होतें. यामुळें संघटना ढिली पडते. कार्यकर्त्याला अवास्तव घसट करूं दिल्यामुळें आणि त्याला मत विचारल्यामुळें सर्व कामांवर अनिष्ट परिणाम होतो, असेंहि बऱ्याच जणांना वाटे. मला मात्र तसें वाटत नाहीं.

दोन-चार लोकांच्या हातीं सर्व सूत्रें ठेवावींत आणि २०–२० वर्षें एकाच माणसानें सर्व अधिकारसूत्रें सांभाळावींत हीसुद्धां एक प्रकारची सरंजामशाहीच आहे. जबाबदारी टाकल्या-शिवाय कार्यकर्त्यांची शक्ति व आत्मविश्वास वाढणार नाहीं. याचा गैरफायदा अनेक लोक घेतात, हा आक्षेप मान्य करूनहि मी असें म्हणेन कीं, हुकूम घेणाऱ्या सांगकाम्यांचें सैन्य निर्माण

करण्यापेक्षां विचारपूर्वक डोळसपणें काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची निर्मिति माझ्या पद्धतीनें होईल. डोळसपणें काम केल्याखेरीज विधायक कामाला केवळ धंदा म्हणून कांहींहि अर्थ नाहीं.

फैजपूर कॉंग्रेसमध्यें महाराष्ट्र चरखा संघाच्या सर्व कार्यकर्त्यांची मीं सभा घेतली. विधायक कार्यकर्त्यांना राजकारण समजलें पाहिजे, राजकारणांत गोडी असली पाहिजे, असें माझें मत आहे. राजकीय मतप्रणालीनुसार समाजनिर्मितीच्या ध्येयाशिवाय निव्वळ विधायक काम हें अर्थशून्य व पोकळ आहे. राजकारण करणारांना जीवनांत कोणत्याहि प्रकारची शाश्वती नाहीं. विधायक कामांत थोडी का होईना शाश्वती होती. विधायक व राजकीय काम हीं एकाच सैन्याचीं दोन पाखीं आहेत, असें मानलें तर इतका फरक या जीवनांत असणें योग्य नाहीं. विधायक कार्यकर्त्यांनींहि दोन-तीन वर्षांनीं एकदां राजकारणांत जावें. जीवनाला बिलकूल स्थैर्य नसतांना जे समाजकार्य करतात, त्यांची व आपली पातळी एक आहे, असें मानलें पाहिजे. आपलें राहणीचें मान हें त्या दर्जाच्यावर कधीं जाऊं देऊं नये; मिळणाऱ्या सर्व पैशांवर आपलाच हक्क आहे असेंहि मानूं नये. राजकीय कार्यकर्ते व विधायक कार्यकर्ते यांच्यामध्यें जर अशी सरमिसळ होऊं लागली तरच विधायक कामाला धार येईल आणि अर्थ निर्माण होईल, नाहींतर विधायक कार्य म्हणजे तागडी-तराजू घेऊन बसण्याची वृत्ति होते ! बाहेरील राजकीय कार्यकर्ते हे समानधर्मी आहेत या जाणिवेंतूनच आपल्या सर्व संस्थांचें काम चाललें पाहिजे. लोकशाही आपण मानतों तर त्याची अंमलबजावणी संस्थांमधूनहि झाली पाहिजे. सेक्रेटरीची जबाबदारी घेण्याची कुवत अनेकांत निर्माण झाली पाहिजे. कार्यकर्त्यांना मतप्रदर्शनाला वाव मिळाला पाहिजे. कार्यकर्त्यांच्या पगारांतील विषमता कमी झाली पाहिजे. १९३६ ची कॉंग्रेस खेड्यांमध्यें भरली. आपलें ऑफिसहि खेड्यांत नेलें पाहिजे, असें मीं ठरविलें.

१९३७ मध्यें वर्ध्याहून मूलला ऑफिस नेलें. गवताच्या झोपड्यांत कामाला सुरुवात झाली. कार्यकर्ते तेथें एकत्र राहूं लागले. तेथें खादी विद्यालयहि सुरू झालें. दोन-तीन वर्षें विद्यालय मीं चालविलें. २००-२५० कार्यकर्ते तयार झाले. या विद्यालयांत मी गांधीवाद या विषयावर बरेंच शिकविलें. त्याचा मुलांना किती फायदा झाला मला माहीत नाहीं, पण गांधीवाद नि अर्थशास्त्र यांवर माझें चिंतन पुष्कळ झालें. गांधीवादाबद्दल एक तात्त्विक निष्ठा तयार होऊं लागली. हृदयापर्यंत ती पोहोंचली असें नाहीं, पूर्ण पटली असेंहि नाहीं, पण हा एक स्वतंत्र विचार आहे व समाजजीवनांत त्याचें एक स्थान आहे, हें मला पटूं लागलें.

एक नियम या सर्व आयुष्यांत मीं पाळला होता. प्रकृति नीट ठेवण्यासाठीं वर्षांतून दीड महिना मी प्रवास टाळीत असें. या वेळीं रोज दोन मैल पळायचें आणि भरपूर व्यायाम करायचा, असा कार्यक्रम होता. इतकी काळजी वर्षभर पुरत असे. मूलला मलेरिया फार. त्यामुळें कार्यकर्ते तक्रार करीत. त्यासाठीं पाणी उकळून पिणें, क्विनाईन घेणें इ. इलाज मीं सुरू केले. पण मलेरियाला भिऊन शहरांत काय म्हणून जायचें ? मूल येथें रहातात तीं माणसेंच नाहींत का ? असा विचार आपले कार्यकर्ते करीत नाहींत. समाजाशीं एकरूप होण्याची आपली वृत्ति नाहीं.

त्यामुळें आपली सेवावृत्ति बेगडी ठरते. आपल्या मुलांना शिक्षण हवें, उत्तम संस्कार हवेत तर बाकीच्यांना कां नकोत? आपल्याला पगार-पेन्शन-सुद्धा हें सर्व हवें, तर इतरांना पगार कमी घ्या, असें आपण सांगू शकूं काय? खादी कार्यकर्त्यांची जर ही मनोवृत्ति तर हे क्रांतीचे वाहक कसे होणार? निदान आपल्या कामाच्या या मर्यादा आपण डोळसपणें ओळखून घेतल्या पाहिजेत. शुष्क विधायक कार्यातून क्रांतीला साह्य होईल, असें मला वाटत नाहीं. त्या वेळीं क्रांतीचा अर्थ केवळ परकी साम्राज्याविरुद्ध लढणें असा होता. यापुढची क्रांति सामाजिक व आर्थिक आहे. कार्यकर्त्यांच्या मनोवृत्तीमुळें दलित वर्गाची क्रांति घडून येईल असा विश्वास मला वाटेना.

चरखा संघाचें काम चार लाखांवरून पंचवीस लाखांपर्यंत गेलें होतें. कागजनगरजवळ रेबना येथें आमचें एक केंद्र चालू होतें. तेथील हरिजन कातणें आणि विणणें दोन्ही कामें करीत. महिन्याला एक रुपयाच्यावर त्यांच्या जेवणाची किंमत होत नसे. दिवसभर जोंधळ्याचें घाटलें पीत राहयचें, हा त्यांचा आहार होता. त्यांना जेवायला घालून त्यांचें काम वाढतें का, असाहि प्रयोग मीं केला. सर्व मुलांबाळांसकट कांहीं कुटुंबांना जेवायला घातलें. वर्षांनुवर्षांची भूक त्यांनीं भागवून घेतली. पहिले कांहीं दिवस तें खाऊन आजारी पडूं नयेत, म्हणून काळजी घ्यावी लागली. पण नंतर मात्र त्यांचें काम वाढलें. दरमहा पंधरा रुपयांवरून पंचवीस रुपयांवर काम गेलें. कांहीं कार्यकर्त्यांवरहि मीं हे प्रयोग केले आहेत. दूध दिल्यामुळें अथवा आहार सुधारल्यामुळें कांहीं कार्यकर्त्यांची स्मरणशक्ति व काम वाढे.

१९४० सालीं खादी कामाच्या दृष्टीनें अत्युच्च शिखर आम्हीं गांठलें होतें. परंतु खादी कामांतहि जीवनवेतन म्हणून कांहीं असावें, असा विचार केला जात नव्हता. आठ तासांचा दीड आणा तेव्हां पडत असे आणि आमची ईर्षा मिलच्या भावांत खादी विकण्याची होती! तेव्हां दिवसाचें वेतन तीन पैशांवर कसें आणतां येईल, असे आम्ही पाहत होतों.

गांधीजींनीं आमचे चांगले डोळे उघडले. ते म्हणत, "स्वयंपूर्ण खेड्यांमध्यें अदला-बदलीच्या व्यवहारांत खादी कितीहि स्वस्त वा महाग झाली तरी पिळवणुकीचा प्रश्न येत नाहीं. परंतु खादीचा व्यापार करून ही खादी आपण शहरांत विकतों तेव्हां आठ तासांचे आठ आणे तरी कामगाराला मिळाले पाहिजेत." या विचारांशीं मी पूर्ण सहमत होतों. म्हणून महाराष्ट्र चरखा संघानें प्रथमच जीवनवेतनाच्या दृष्टीनें पाऊल टाकायचें ठरविलें. आठ तासांचे निदान पांच-सहा आणे पडावेत या दृष्टीनें खादीचे भाव ठरविले.

परिणामतः महाराष्ट्राच्या खादीचे भाव अडीचपटीनें वाढले व खादीचे गठ्ठे सांचून राहूं लागले. विक्री घटली व दोन वर्षांनंतर आम्हांला माघार घ्यावी लागली. इतर प्रांतांनीं गांधीजींच्या आग्रहामुळें भाव थोडे वाढवले व आम्हीं थोडे घटविले आणि खादी काम पुन्हां सुरू केलें. या धडपडींत खादी कामांत दिवसाचे ३ आणे हें जीवनवेतन तेव्हां ठरवलें गेलें.

भाववाढीच्या या प्रयोगाचे अनेक विचित्र अनुभव मला आले. आणि या प्रयोगांतून समाजांतील अनेक प्रश्न माझ्यापुढें उभे राहिले. प्रथम मजुरींत वाढ केली. आणि दोन

आण्यांच्याऐवजीं चार आणे मिळतील, असे भाव लावले. पण प्रत्यक्षांत आठ तासांऐवजीं लोक चारच तास काम करूं लागले! दारिद्र्य होतेंच, तें अंगवळणीं पडलें होतें. त्यांतून बाहेर पडण्याची इच्छा नव्हती. समाजाच्या प्रत्येक थराची विशिष्ट मनोवृत्ति हा केवळ आर्थिक प्रश्न नाहीं. समाजांतील त्याचें स्थान, त्याच्या संवयी, त्याच्या रहाणीचें मान हें सर्व पिढ्यान्-पिढ्या एका चाकोरींत रुळलेलें आहे. केवळ आर्थिक बाजू बदलल्यामुळें त्यांत ताबडतोब फरक पडेलच, असें नाहीं.

चरख्याच्या कामाबद्दलहि माझ्या विचारांना निश्चित स्वरूप आलें. आजच्या भावांत तरी कताई हा पर्यायी धंदा होऊं शकत नाहीं. तो साहाय्यक धंदा म्हणूनच राहूं शकतो. जास्तींत जास्त १० टक्के लोकांना हा पूरक धंदा होतो. खालचा मध्यमवर्ग व थोडी जमीन असलेला शेतकरीवर्ग हाच चरखा चालवतो. पिढ्यान्‌पिढ्या चालू आहे म्हणून कांहीं वरचे वर्गहि चरखा चालवितात. पण कोणत्याहि स्थितींत शेतमजूर चरखा चालवीत नाहीं. याचाच अर्थ असा कीं, चरखा एका विशिष्ट आर्थिक परिस्थितींतच चालू शकतो. ही परिस्थिति बदलली तर चरख्याला कांहीं अर्थ रहाणार नाहीं. जेथें सूतकताईची परंपरा नाहीं, तेथें नव्यानें ती चालू करणें हेंहि कठिण आहे. आणि चरख्यावर मिळणारें उत्पन्न हें जेमतेमच आहे. २५।२५ वर्षें जेथें चरखा चालू आहे, तेथें कातणारांच्यांत आम्ही काय फरक करूं शकत आहोंत?

जीवन-वेतनाचा हा सिद्धान्त खादी अत्यंत महागल्यामुळें अयशस्वी झाला. चरख्याच्या उत्पादनक्षमतेंत सुधारणा केल्याखेरीज तो चालणार नाहीं, अशी माझी खात्री पटली. त्या वेळीं दोन चात्यांचा मगन चरखा मूल येथें आम्हीं सुरू केला. त्यांवर ४ ते ५ आणे रोजीं सहज पडे. त्या वेळच्या मानानें ही मजुरी शेतमजुराला मिळणाऱ्या मजुरीपेक्षां फार अधिक होती. तेव्हां तेथील शेतकरी आमच्याकडे येऊन सांगूं लागले, कीं शेतीच्या हंगामाच्या वेळीं तरी हा चरखा बंद करा, अगर मजुरी कमी करा! अशा तऱ्हेनें थोडा सुधारलेला चरखा जर या देशांत आपण आणला आणि तो योग्य रीतीनें वापरूं शकलों, तर शेतमजुराला पर्याय देऊन शेतीवरील मजुरीवर आपण ताबा ठेवूं शकूं.

आज शेतमजुराच्या मजुरीसाठीं जीवनवेतनाचे कितीहि कायदे केले तरी पर्यायी धंदा असल्याखेरीज ते यशस्वी होऊं शकणार नाहींत. अंबर-चरखा जर आला तर शेतमजुराची शक्ति तो वाढवूं शकेल का? आणि हें शक्य झालें तरी शेती परवडेल का? मला असें वाटत आहे कीं शेती हा मुख्य धंदा धरून बाकी सर्व वस्तूंचे भाव शेतीशीं सुसंबद्ध ठेवले पाहिजेत. शेती हा आज शेवटचा ( receduary ) धंदा आहे. त्याहिपेक्षां कमी उत्पन्न देणारे ग्रामोद्योग अशक्य म्हणून सोडून तरी दिले पाहिजेत किंवा त्या धंद्यांची उत्पादनक्षमता वाढविली पाहिजे.

मूल येथें व इतरहि केन्द्रांत मीं अनेक शाळा काढल्या. वैद्यकीय मदतीचीं उपचारकेंद्रें काढलीं. हेतु असा कीं, कांतणारांना त्याचा थोडा तरी फायदा व्हावा. चरखासंघातर्फें कांतणारांच्या जीवनांत फरक घडवून आणण्याचा फारसा प्रयत्न झाला, असें म्हणतां येणार नाहीं. चरखासंघ हा नांवानें कांतणारांचा संघ असला तरी कातणाऱ्यांचा भाग त्यांत फारच

थोडा होता. कताई व विणाई जाणणाऱ्या निष्णात कार्यकर्त्यांचा व खादी हा धंदा म्हणून यशस्वी करणाऱ्या व्यवस्थापकांचा एक वर्ग यांतून तयार झाला. प्रत्यक्ष कांतणारे व विणणारे आमच्या सार्वजनिक जीवनाशीं व राजकीय चळवळीशीं कधींच समरस झालेले नाहींत. हें कार्य खऱ्या अर्थानें विधायक आहे काय ?

माझ्याकडे शिक्षणासाठीं येणारे कार्यकर्ते अकोला, खामगांव, नागपूर येथील राष्ट्रीय शाळांमधून येत. राष्ट्रीयत्वाचे व राजकीय विचारांचे बरेच संस्कार त्यांच्यावर झालेले होते. पण या खादी कामांत आल्यावर त्यांच्या राजकीय विचारांची धार बोथट होऊन जाई. यंत्रतज्ज्ञ हा भांडवलदारी मनोवृत्तीचाच बने. आचार आणि विचार यांतील तफावत वाढत गेलेली दिसे. समाजांतील अन्याय आणि दुःखें आज आमच्याइतकीं अंगवळणीं पडलीं आहेत कीं, तीं पाहून आमच्या मनांत कोठल्याहि प्रकारची अस्वस्थता निर्माण होत नाहीं.

हरिजनांच्या बाबतींत मीं एकदां एक प्रयोग केला होता. समाज हरिजनांना ज्या सवलती देत नाहीं, त्या आपणहि घ्यायच्या नाहींत, असें मीं ठरविलें, पण हें काटेकोरपणें पाळायचें तर जीवनच अशक्य झालें. दुसराहि एक प्रयोग माझ्या बाबतींत अयशस्वी ठरला. खेडेगांवांत जाऊन श्रमजीवी बनावें, याचें मला फार आकर्षण होतें. पण जेव्हां जेव्हां मीं हा प्रयोग केला तेव्हां ८–१० तासांच्या श्रमानंतर विचारशक्ति क्षीण होते, असा अनुभव मला आला. आदर्श जीवन आणि प्रत्यक्ष जीवन यांत संवादित्व येऊं शकत नाहीं. अशा अनेक प्रयोगांत प्रत्येक वेळीं मीं माघार घेतली.

माझ्या गरजा अत्यंत कमी आहेत. मीं स्वतःचा संसार मांडलेला नाहीं. वैयक्तिकरीत्या कोणाला पोसण्याची जबाबदारी माझ्यावर नाहीं. तरीहि माझी ही स्थिति आहे. खेडेगांवांतील माणसाचें जीवन आणि सर्वसामान्य मध्यमवर्गीयांचें जीवन यांत आज जमीन-अस्मानाचा फरक आहे. या खेडेगांवी जीवनांतून आणि समाजाच्या सर्वांत दरिद्री अशा पातळींतून खरोखरचें असें पुढारीपण कधीं निर्माण होणार आहे का ? कीं कांहीं आर्थिक स्थिति सुधारेपर्यंत असेंच चालायचें ?

आठवड्याला आठ-बारा आणे मजुरी आम्हीं वांटायची असें खादी काम चालू ठेवणें योग्य कीं अयोग्य ? अशा तऱ्हेनें पोट बांधून कताई करीत रहावें लागणें हें आमचें एक दुर्दैव आहे. अशा कांतणारांच्या श्रमांवर आमच्या संस्था चालू राहाणें हें सौभाग्य कीं नष्ट होणें हें सौभाग्य ? ज्याला वेळ आहे त्यानें पूरक धंदा म्हणून कांतलें तर वेगळें. परंतु दुसरा धंदा नाहीं म्हणून आठ तास घाम गाळून चार-सहा आण्यांत माणसानें रहावें, यांत मला आनंद नाहीं. हें खादीकाम कां चालावें ? ही समाजाची प्रकृति कीं विकृति ? असें काम करीत रहाण्यापेक्षां या लोकांनीं बंडच केलें पाहिजे, असें मला वाटतें. या प्रश्नांवर एकसारखा विचार मी करीत आहें. अजूनहि हे प्रश्न मला सुटलेले नाहींत.

१९४० सालीं वैयक्तिक सत्याग्रह सुरू झाला. चरखा संघांतील कार्यकर्त्यांनीं यांत भाग घेऊं नये, असा सामान्य नियम होता. सौ. शरयूताई धोत्रे व दादा धर्माधिकारी यांच्या पत्नी

यांना गांधींजींनीं वैयक्तिक सत्याग्रहाला परवानगी दिली होती. त्यांना गांधीजींनीं सांगितलें कीं, तुम्हीं वर्धा तालुक्यांत हिंडायचें व महिन्यांतून ३ दिवसांपेक्षां जास्त घरीं यायचें नाहीं. ८० दिवस या बायका हिंडत होत्या. त्यांचे अनुभव मला आजहि विचार करायला लावतात. कारण या घरोघर जात व चुलीपर्यंत पोहोंचत. २० वर्षें काम सतत वर्धा तालुक्यांत झालें, पण त्या वीस वर्षांत जी माहिती आम्हांला मिळाली नाहीं ती त्यांनीं २ महिन्यांत मिळविली. समाजांत ५० टक्के असलेल्या स्त्रियांमध्यें पुरुष पोहोंचत नसले तर हें काम करण्यास स्त्रियाच पुढें आल्या पाहिजेत, हा एक विचार विधायक कार्यकर्त्यांपुढें मीं मांडीत असें. कांतणाऱ्या सर्व स्त्रिया आणि सूत घेणारे तेवढे पुरुष यापेक्षां स्त्रियांनींच हें काम कां करूं नये ? अनेक कार्यकर्त्यांच्या स्त्रियांना या दृष्टीनें मीं कामासाठीं उद्युक्त केलें. पण स्वतःच्या संसाराच्या आर्थिक मदतीसाठीं काम करणें हा एक विचार आणि कांतणाऱ्या स्त्रियांशीं एकरूप होणें हा दुसरा विचार. दुसरा बहुधा लुप्तच होई !

• • •

# ५ : बेचाळीसच्या क्रांतींत

४२ च्या चळवळीपूर्वीं असें अनेक विचारांचें मंथन माझ्या डोक्यांत चालू होतें. चळवळीपूर्वीं चरखासंघाची बैठक झाली होती. त्या वेळीं वल्लभभाई म्हणाले होते : " आतांपर्यंत या सर्व संस्था सांभाळून ठेवा, असें मी सांगत होतों, परंतु आतां सर्वस्वाचा होम करा असें मी सांगत आहें. यांतून आपण बाहेर आलों तर संस्था पुन्हां निर्माण होतील. आपली पूर्ण शक्ति पणाला लावूनच हा स्वातंत्र्याचा अखेरचा लढा द्यायचा आहे. " मात्र या चळवळींत नेमकें काय करावें याचें स्पष्ट दर्शन मला झालें नव्हतें. गांधीजी मार्गदर्शन करतील, याच कल्पनेंत आम्ही होतों. पण अचानक धरपकड झाल्यामुळें गांधीजींच्या मनांत काय होतें, ह्याची कल्पना कोणालाच नव्हती. किशोरलालभाईंचा 'हरिजन'मधील लेख आणि अच्युतराव–जयप्रकाश यांच्या विचारांचा पगडा माझ्यावर बसला होता.

'करा किंवा मरा' हा गांधीजींचा निर्वाणीचा संदेश होता. तेव्हां निव्वळ तुरुंगभरती यांत अभिप्रेत नाहीं, हें स्पष्टच होतें. हेंहि सरळ होतें कीं, हें राज्ययंत्र बंद पाडलें पाहिजे. सरकारी कचेऱ्या, पोलीस ठाणीं आणि मुख्यतः युद्धवाहतूक बंद पाडणें हा याचा अर्थ आम्हीं मानला होता. गांधीजींच्या हांकेनें प्रचंड जनशक्ति निर्माण होऊन सरकारी नोकर आपलें काम-काज सोडून जनतेच्या बाजूनें साथ देतील, पोलीस आपली सत्ता सोडून स्वातंत्र्याचे सैनिक बनतील आणि याच जोरामुळें शेवटच्या घटकेला कदाचित् सैन्यहि आपलीं शस्त्रें खालीं ठेवील,

अशी एक आशा निर्माण झाली होती. गांधीजी पकडले गेल्यानंतर अच्युतराव–जयप्रकाश आणि ज्यांच्या हातीं चळवळीचीं सूत्रें होतीं त्या सर्वांची या दिशेनें हालचाल चालू होती. चार सहा महिन्यांमध्येंच हें सर्व होईल, अशी अपेक्षा होती.

ऑक्टोबरपर्यंत मी वर्ध्यांत होतों. गांधीजी पकडले गेल्याबरोबर जनतेनें जीं उग्र निदर्शनें केलीं, त्यांचा फारसा उपयोग आम्ही करून घेऊं शकलों नाहीं आणि राज्ययंत्र बंद पाडण्याच्या दृष्टीनें तयारी झाल्यानंतर जनतेचा पुन्हां इतका जोरदार उठाव करणें आमच्या आवाक्याबाहेरचें होतें. अशा स्थितींत मीं ऑक्टोबरमध्यें मुंबईला येऊन अच्युतरावांशीं संबंध जोडले.

राज्ययंत्राला अडथळे आणण्यासाठीं एक प्रचंड धडपड चालू होती. पण आमच्याजवळ अशा कामाला योग्य अशीं माणसें नव्हतीं. चळवळीला भरपूर सहानुभूति जनतेमध्यें असल्यामुळें घातपाती कृत्यांसाठीं जरूर तो हवा तेवढा माल व पैसा मिळत होता. परंतु तो वापरण्याची ताकत नव्हती. मी त्या वेळीं 'सुंदरलाल' या नांवानें खादी भांडारांत रहात असें व हा स्फोटक माल मिळवणें–सांठवणें अशा जबाबदारीचें काम करीत असें.

खादी भांडारांत मी फारसा कोणाला भेटत नसें. सर्व महत्त्वाच्या माणसांना भेटण्यासाठीं चौपाटीची जागा अत्यंत कमी धोक्याची होती. खादी भांडारांत मी झोंपतहि नसें. केवळ सुंदरलाल यांना निरोप ठेवण्याचा तो पत्ता होता. बरेच दिवस सर्व व्यवस्थित चालू होतें. परंतु पुढें कांहीं फितूर माणसें आमच्या गोटांत सोडण्यांत पोलिसांनीं यश मिळविलें. कसें कोणास ठाऊक पण डेपोचें काम बघत असलेला माझा सहायक एक दिवस पकडला गेला. त्याला पहांटे पकडले आणि एक तासाच्या आंतच त्याला पकडल्याचा मला निरोप आला. हा मुलगा एम्. ए. झालेला असून इंग्लंड रिटर्न्ड होता. स्फोटक वस्तु सांठविण्याची जागा त्याला माहीत होती. तेव्हां पोलिस त्याला त्रास देणार हें उघडच होतें. परंतु तो निदान संध्याकाळ-पर्यंत तरी तग धरील आणि तोंपर्यंत बरेंचसें सामान आपण हलवूं शकूं, असा हिशेब मीं केला.

मीं आणखी एक सहकारी माझ्याबरोबर घेतला. तोहि तरुण मुलगाच होता. आम्ही सकाळीं लवकरच त्या जागेंत गेलों. चाळीस एक हजार रुपयांचा माल तेथें असावा. आम्ही आंत गेलों व पोलिसांनीं दाराला कडी घातली. माझ्याबरोबरचा मुलगा घाबरून रडूं लागला. पण त्याला थोडें सांगायला मला वेळ मिळाला. 'सुंदरलाल' या माणसाचें काल्पनिक वर्णन त्याला मीं सांगितलें. तो अच्युतरावांच्याकडे आपणांला भेटला आणि त्यानें मला येथें येण्यास सांगितलें एवढेंच तूं सांग आणि पोलिसांनीं कांहींहि केलें तरी यापेक्षां मला कांहींच माहिती नाहीं असें सांगायला मीं त्याला पढवलें.

मला पकडल्यानंतर मी माझें नांव अण्णा सहस्रबुद्धे असें सांगितलें. मीहि सुंदरलालचें तंतोतंत तेंच वर्णन केल्यामुळें सुंदरलाल गुलदस्त्यांतच राहिला! मीं माझें खरें नांव सांगितल्या-मुळें असो किंवा मी घाबरत नाहीं असें बघितल्यामुळें असो, मला कोणत्याहि प्रकारची

मारझोड वगैरे झाली नाहीं. डेपोची मला कांहींच कल्पना नाहीं, हें म्हणणें शेवटपर्यंत लावून धरल्यामुळें माझा संबंध प्रत्यक्ष घातपाती कृत्यांशीं जोडणें हें अखेरपर्यंत पोलिसांना जमलें नाहीं. प्रथमतः पोलिसांनीं धमक्या मात्र बऱ्याच दिल्या. फांसावर तुम्हांला चढविण्यांत येईल. मारझोड करून तुम्हांला भयंकर त्रास देणें आमच्या हातीं आहे, अशा धमक्यांनीं मला तर हंसूच येत होतें !

मीं त्यांना सांगितलें, फांसावर द्यायचें तर लवकर द्या आणि २६ जानेवारी सारखा एकादा चांगला मुहूर्त पाहून द्या ! म्हणजे त्यामुळें चळवळीला फायदाच होईल.

माझ्या बरोबरीच्या मुलाचा डेपोशीं संबंध जोडणारा एकच पुरावा होता. तो त्या जागेमध्यें झोपत असे. तेथें त्याच्या लॅंड्रीमार्कचे कांहीं कपडे पोलिसांना प्रथम खोलींत सांपडले होते. पण या मुलाचे वडील चांगल्या मोठ्या हुद्द्यावर होते व कोठेंतरी संधान बांधून त्यानें तेवढे कपडे नष्ट केले. नाहींतर कदाचित् कांहीं आरोप सिद्ध करतां आले असते. 'कॅपिटॉल बॉम्ब केस' व 'महाराष्ट्र कॉन्स्पिरसी' या दोन्हींमध्यें माझें नांव होतें. माझ्यावर बक्षिसें होतीं. चारदोन गाड्या पडल्या त्यांतहि माझें नांव अनेकांनीं घेतलें होतें. पण यांतील कांहींहि सिद्ध झालें नाहीं. आणि डेटेन्यू म्हणूनच मी तुरुंगांत राहिलों. जानेवारी ४३ ते नोव्हेंबर ४५ पर्यंत मी तुरुंगांत होतों.

जानेवारीनंतर चळवळीचा जोर वास्तविक ओसरला होता. आणि सरकारला बारीक चिमटे काढण्यापलीकडे आमची जास्त ताकद नव्हती. सरकारी नोकऱ्या सोडून बाहेर पडलेले लोक आतां बोटांवर मोजण्याइतकेच होते. घातपाती चळवळीला योग्य यंत्रतंत्रविशारद अशीं माणसें आमच्याजवळ नव्हतीं. क्रांतीच्या कल्पनेला भाळून तरुण मुलें मात्र फार मोठ्या प्रमाणांत आकर्षिलीं गेलीं होतीं. परंतु गुप्त चळवळींना योग्य अशी मनोवृत्ति व कणखरपणा हे दोन्ही गुण त्यांच्याजवळ नव्हते. असे कार्यकर्ते तयार करण्याच्या दृष्टीनें फारसा वेळहि मिळाला नव्हता. त्यामुळें चळवळ फसणार हें तेव्हांच निश्चित झालें होतें.

जेलमध्यें असतांना मागच्या माझ्या कामाचा विचार करण्याची पुन्हां एकवार संधि मिळाली. चरखासंघाच्या माझ्या कामाचा मीं पुन्हां एकवार आढावा घेतला. आम्हीं करीत असलेल्या कामांत प्रत्यक्ष जनतेला कार्यप्रवण करण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरले. जनतेची शक्ति जागृत करण्याऐवजीं मध्यमवर्गीय तज्ज्ञ कार्यकर्त्यांचा एक संच केवळ यांतून तयार होतो, असेंच माझें पुन्हा निश्चित मत बनलें. सहकारी चळवळ हा यावर उपाय होऊं शकेल का ? काम करणाऱ्यांमधूनच तज्ज्ञ नेते तयार होऊं शकतील का ? याचा विचार मी करूं लागलों.

येरवडा तुरुंगांत तीन-चार मराठी इयत्ता शिकलेलीं अनेक लहान लहान मुलें आलेलीं होतीं. त्यांच्यावर संस्काराचे कांहीं प्रयोग केले. वर्तमानपत्र वाचायला कसें शिकवावें, याचेंहि एक शास्त्र तयार केलें. नेमके कोणते शब्द अडतात, त्यांची एक जंत्री तयार केली. आज आपल्या वर्तमानपत्रांत अनेक इंग्रजी शब्द किंवा त्याला पर्याय म्हणून काढलेले त्याहिपेक्षां कठिण असे संस्कृतप्रचुर शब्द असतात. अनेक संस्थांचीं नांवें असतात आणि या सर्वांमुळें

वर्तमानपत्रांतील बराचसा मजकूर हा सामान्य खेडूत वाचकाच्या शक्तीपलीकडचा असतो. अशा शब्दांची मीं एक यादी केली आणि एक जगाचा नकाशा मिळवून लढाईच्या सर्व बातम्या समजावून सांगायला सुरुवात केली. वर्तमानपत्र वाचायला शिकवायचा एक कार्यक्रमच ठरवला पाहिजे. खेडूत नेतृत्व तयार करण्याची ही प्राथमिक पायरी मानली पाहिजे.

अशा तऱ्हेचीं शिबिरें चालविण्याबद्दल मी त्या वेळीं विचार करीत होतों. आज आपलीं शिबिरें अगदीं चुकीच्या पद्धतीनें चालू आहेत. शिबिरांत तोंडाला येईल तें बोलणाऱ्या पुढाऱ्यांना वाव मुळींच असतां कामा नये. राजकारणालाहि फारसा वाव देऊं नये. समाजवाद-गांधीवाद- अर्थशास्त्र हे सारे विषय सोप्या रीतीनें व पद्धतशीरपणें शिकविले जावेत. सामुदायिक जीवनाचा पायाहि येथें घातला जावा. स्वच्छता, खेळ यांची आवड आपण निर्माण करूं शकलों पाहिजे. खेडुतांनीं हळूंहळूं वाचूं लागून स्वतःची बुद्धि व ज्ञान स्वतः वाढवण्याची कुवत अंगीं आणावी, हा शिबिरांचा उद्देश आहे. वाचनाची गोडी लावणें व त्याच त्याच लोकांचीं शिबिरें घेऊन योजनाबद्ध अभ्यासक्रम चालवणें हें जरूरीचें आहे.

यापुढें आपण शिबिरेंच चालवावींत आणि एका शैक्षणिक दृष्टीनें स्थानिक नेतृत्व निर्माण करण्याकडे आपली सर्व शक्ति लावावी, असें मीं ठरविलें. राष्ट्र-सेवा दलाशीं माझे संबंध या वेळपर्यंत नव्हते. या माझ्या निश्चयानुसार मी बाहेर पडल्यानंतर सातारा जिल्ह्यांत शिबिरांना सुरुवात केली. अशीं पांच-सहा शिबिरें मीं सात महिन्यांत चालविलीं. याच वेळीं आ. जावडेकर नि आ. भागवत यांच्याशीं माझा निकट संबंध आला. श्री. शंकरराव देव यांच्यापेक्षां वैचारिक दृष्ट्या आ. जावडेकर हे मला अधिक जवळचे वाटत. आमच्या तिघांत एक अलिखित संकेतहि झाला. आ. जावडेकर यांनीं विचारस्पष्टता करावी. विद्वान् व सुशिक्षित मंडळींत त्याचा प्रचार आ. भागवतांनीं करावा व खेडूत मंडळींच्यापर्यंत मीं त्याचें लोण पोहोंचवावें. प्रत्येक शिबिरांत ७५–८० माणसें स्वखर्चानें येत.

परंतु त्याचवेळीं म. प्रॉ. कॉं. कमिटीनें आदेश दिला कीं, त्यांच्या संमतीखेरीज महाराष्ट्रांत कॉंग्रेसवाल्यांकडून कोठेंहि शिबिरें होऊं नयेत ! याच वेळीं राष्ट्र-सेवा-दलाचा विराट् मेळावा सातारा येथें भरला होता. परंतु ही सुद्धां 'शिवशक्ति' आहे कीं नाहीं, अशी शंका कांहींच्या मनांत निर्माण झाल्यामुळें या संघटनेला स्वतंत्रपणें वाढूं द्यावें कीं नाहीं याबद्दल मतभेद झाले. यावेळीं राष्ट्र सेवा-दलाशीं व एस्. एम्., रावसाहेब, भाऊ रानडे यांच्याशीं माझे संबंध वाढले. राष्ट्र-सेवा-दल व कॉंग्रेस यांचा झगडा सुरू झाला. मीं त्या वेळेपासून अपक्ष भूमिका स्वीकारलेली आहे.

पुढाऱ्यांच्यांत अशी रस्सीखेंच सुरू झाल्यामुळें शिबिरांचा जोर ओसरला व राष्ट्रवादी तरुणांची भरभक्कम संघटना उभी करण्याचीं स्वप्नें भंगलीं. सर्वांचीच शिबिरें घेण्याची या वेळीं चढाओढ लागली आणि कुणींहि शिबिरें घेतलीं तरी आपण तेथें जायचेंच असें मीं ठरविलें. एक प्रभावी असा अपक्ष गट तयार होईल, अशी मला आशा होती. परंतु कॉंग्रेसनें 'एक पुढारी व एक पक्ष' अशीं भूमिका घेतली. समाजवादी विचारसरणीचा कॉंग्रेसशीं मूलभूतच विरोध आहे, याची जाणीव स्पष्टतेनें होऊं लागल्यामुळें समाजवादी गटाची पक्षीय भूमिका दिवसें-

दिवस प्रभावी होऊं लागली होती. राष्ट्र-सेवा-दल ही शैक्षणिक संस्था आहे आणि ती पक्षातीत संघटनाच रहावी, म्हणून मी व श्री. रावसाहेब पटवर्धन यांनीं तडजोडीचे अनेक प्रयत्न केले. परंतु ती काँग्रेसच्या अंकितच असावी, अशी काँग्रेसश्रेष्ठींनीं भूमिका घेतल्यानें तेहि प्रयत्न फसले.

१९४७ मध्यें महाराष्ट्र सेवा संघाची स्थापना झाली. अखिल भारत चरखा संघानें गांधींजींच्या सल्ल्यावरून प्रत्येक ठिकाणीं खादीच्या स्थानिक संस्था स्थापन कराव्यात असा निर्णय १९४५ सालीं घेतला होता. त्यानुसार महाराष्ट्रांत जागोजाग जिल्हावार सहकारी खादी भांडारें निर्माण केलीं गेलीं. जागोजागच्या स्थानिक मंडळींनीं जबाबदारी व पुढाकार घ्यावा, हाच यामागें हेतु होता. महाराष्ट्रांतील खादी कार्याला सल्लागार व मार्गदर्शक अशी संस्था म्हणून महाराष्ट्र सेवा संघाची निर्मिति झाली. ५–५० हजार रुपये भांडवल जमा करावें आणि सरकारी योजनांचा फायदा घेऊन जागोजाग ग्रामोद्योगांच्या प्रवृत्तींना प्रोत्साहन द्यावें, अशी मूळ कल्पना होती.

याचवेळीं मुंबईमध्यें प्रॉव्हिन्शियल इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्हची स्थापना होऊन प्रामुख्यानें हातमाग-विणकरांची एक प्रांतव्यापी संघटना निर्माण झाली. तिचा मी सदस्य बनलों आणि महाराष्ट्रांत योग्य ती संघटना उभाण्याचें काम मजवर आलें. याच वेळीं मुंबई प्रांतांत व्हिलेज इंडस्ट्रीज् कमिटी ही एक निमसरकारी संस्था ग्रामोद्योगांचें संघटन करण्यासाठीं निर्माण झाली. त्यांतहि दोन-अडीच वर्षें मीं बरेंच लक्ष घातलें. त्या वेळच्या ग्रामोद्योगांच्या अनेक योजना माझ्या हातच्या आहेत.

या वेळीं चरखा संघांत जाण्यास मीं नकार दिला होता. कारण खादी कामांतून लोक-जागृति होत नाहीं, असें माझें मत बनलें होतें. तरीहि जाजूजींनीं मला असें विचारलें कीं, तुम्हीं आज करीत आहांत तेंहि काम चरखा संघाला पोषक असेंच आहे. तेव्हां चरखा संघांतून जीवन-वेतन घ्यायला काय हरकत आहे ? त्याला मीं नकार दिला. महाराष्ट्रांतील विधायक कार्याला अपक्ष परंतु डोळस असें स्वरूप द्यावें, संशोधनाद्वारें ग्रामोद्योगांना शास्त्रीय व भक्कम पायावर उभें करावें आणि जागजागीं सहकारी संस्थांमार्फत या कामाची उठावणी व्हावी, असें माझें स्वप्न होतें. त्या दृष्टीनें मी महाराष्ट्रांत काम करीत होतों.

अंबरनाथ येथें महाराष्ट्र सेवा संघातर्फे १९४८ च्या एप्रिलमध्यें विधायक कार्यकर्त्यांचें एक संमेलन बोलाविलें होतें. तेथें सर्व पक्षांतील कार्यकर्त्यांनीं जर पक्षातीत भूमिका स्वीकारली असती तर कदाचित् महाराष्ट्रांतील विधायक कामास वेगळें स्वरूप आलें असतें. परंतु तसें न घडल्यामुळें संमेलनाची निष्पत्ति कांहीं न होतां विधायक कार्यकर्त्यांची कुचंबणा मात्र होत राहिली.

दुसऱ्या वर्षीं अकोला–राजूर येथें विधायक कार्यकर्त्यांचें दुसरें संमेलन झालें. त्या वेळीं काँग्रेसमधील अंतर्गत विरोध शिगेला पोंचले होते. महाराष्ट्रांतील सर्व विधायक कामाचीं सूत्रें मीं घ्यावींत असा प्रयत्न झाला. मीं त्या वेळेला माझी भूमिका स्पष्टपणें शंकररावांजवळ मांडली : "मी पक्षनिष्ठ नाहीं. कोणत्याहि निष्ठेचा मनुष्य विधायक कामांत आला तरी मी त्याला मदत करणारच." परंतु शंकररावांच्या नि माझ्या भूमिकेंत फार मोठें अंतर होतें. महाराष्ट्र काँग्रेस

त्यांनीं संघटित केली आणि त्यांनींच लढविली. त्यामुळें ते म्हणाले : "कॉंग्रेस टिकून राहण्यासाठीं माझ्या मनांत जी तिडीक आहे, ती तुम्हांला कशी कळणार ? कारण कॉंग्रेससाठीं तुम्हीं कांहींच केलेलें नाहीं !" त्यांचें हें म्हणणें मीं मान्य केलें. पण कॉंग्रेस कितीहि मोठी असली व त्यासाठीं त्यांनीं कितीहि भगीरथ प्रयत्न केले असले तरी विधायक काम अपक्ष भूमिकेंतूनच चाललें पाहिजे, ही भूमिका मीं सोडली नाहीं. महाराष्ट्रांतील विधायक कार्यकर्त्यांची संघटना या घासाघिशींत वाढली नाहीं. महाराष्ट्र सेवा संघाचें कामहि वाढलें नाहीं.

महाराष्ट्र सेवा संघाच्या कामाबद्दलहि माझ्या व इतर चालक मंडळींच्या दृष्टिकोनांतच फरक होता. महाराष्ट्रभर एक केन्द्रित संस्था उभी करावी--सर्वत्र तिच्या शाखा काढून काम चालवावें, अशा कामांतून दोन-अडीचशें कार्यकर्त्यांची संघटना निर्माण करावी, अशा पद्धतीनें महाराष्ट्रांत काम उभें राहील, असें मला वाटत नाहीं. कारण महाराष्ट्रांतील जागृति ही एका वेगळ्या पातळीवर आहे. स्थानिक जागृति आहे व स्थानिक कार्यकर्तेहि आहेत. खादी उत्पत्ति, सरंजाम कार्यालय व अन्य विधायक प्रवृत्ति जागोजाग लहान लहान संस्था काढूनच त्यांच्यातर्फे चालवल्या जाव्यात. महाराष्ट्र सेवा संघ एक भ्रातृसंघ बनावा असें मला आजहि वाटत आहे. पण या पद्धतीनें मध्यवर्ती संस्थेला पैसा कसा मिळणार ? पण माझे विचार या बाबतींत स्पष्ट आहेत. व्यापारी कामांचें केंद्रीकरण करण्यानें येथें असूया निर्माण होणार आहे, असें मीं सांगितलें. मोठी अशी मध्यवर्ती संस्था हवी कशाला ? एक मोठी संस्था, बाकी सर्व नोकर ही सरंजामशाही महाराष्ट्रांत असूं नये, असें मला वाटतें. जिल्ह्या-जिल्ह्यांत संस्था उभ्या कराव्यात आणि त्यांनींच जागोजाग जबाबदारी उचलावी. अशा संस्था जागोजाग वाढविणें, कार्यकर्त्यांना शिक्षण देणें व अडचणींत मार्गदर्शन करणें, एवढेंच काम मध्यवर्ती संघटनेचें असावें. अशा मध्यवर्ती संस्थेच्या खर्चासाठीं जागोजागच्या संस्था स्वखुशीनें रक्कम देतील. सर्व कामाच्या केंद्रीकरणानें प्रेमाऐवजीं द्वेष निर्माण होतो. परंतु माझ्या या मताशीं तत्त्वतः कुणाचा विरोध नसला तरी कोणीच फारसें सहमत नव्हतें !

● ● ●

# ६ : सहकारी संस्था व ग्रामोद्योग

**प्रॉव्हिन्शियल** इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन या संस्थेच्या कामाबद्दलहि मीं पुष्कळ चिंतन केलें. आपल्याकडील धंदे हे जातिसंस्थेवर आधारलेले असल्यामुळें औद्योगिक सहकारी संस्था या जातिनिष्ठ संस्था बनतात. ग्रामोद्योग हे स्वयंपूर्ण उद्योग आहेत कीं शेतीला पूरक धंदे आहेत, याची स्पष्टता आपण मनाशीं करून घेतली पाहिजे. ते

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना.
अनुक्रम ........ विः ..
क्रमांक ........................ नोंः दिः ................


शेतीला पूरकच असावेत, असें माझें मत आहे. स्वतंत्र धंदे म्हणून त्यांची संघटना करणें याचा अर्थ सर्वसामान्य शेतकऱ्याविरुद्ध त्यांची फळी निर्माण करणें आणि पिळणाऱ्या वर्गाबरोबर त्यांची सांगड घालणें असाच होतो. माझ्या नजरेसमोर हिंदुस्थानच्या आदर्श आर्थिक परिस्थितीचें जें चित्र आहे त्यांत खेडें हें स्वयंपूर्ण आहे. जाती व धंद्यांवर आधारून अशा संघटना उभारणें म्हणजे स्वयंपूर्ण खेडेगांवांचा उभा छेद घेण्यासारखें आहे. युद्धकाळामध्यें नित्योपयोगी वस्तूंचा तुटवडा पडला. कापडाचे भाव भरमसाट भडकले. अशा वेळीं केवळ धान्य स्वस्त द्या आणि बाकी आमच्या वस्तूंना मात्र भरमसाट किंमत मिळाली पाहिजे, असाच संकुचित दृष्टिकोन सर्व सहकारी संस्थांचा आणि त्यांच्या पुढाऱ्यांचा राहिला. शेतीच्या उत्पन्नाच्या मानानें बाकी सर्व धंद्यांचे मजुरीचे भाव आपण होऊन निश्चित करून एक मोठी आणि कायमची संघटना उभारणें, हें तेव्हां शक्य होतें.

श्री. आर्. के. पाटील यांच्या समोरहि मीं हे विचार मांडले. त्यांनीं व मीं अनेक विणकर संस्थांच्या प्रमुखांशीं व काँग्रेसच्या पुढऱ्यांशीं बोलणीं केलीं. परंतु भरमसाट नफ्यामुळें संस्थाचालकांची पुढचा विचार करण्याची तयारी नव्हती. आणि आज हा नफा कमी करण्याच्या दृष्टीनें बोललों तर मतें कशीं मिळतील, ही राजकीय नेत्यांना काळजी लागली होती! समाजाचा विचार करायची तयारी जर नसेल तर सहकार कशासाठीं? समाजाची पिळवणूक करण्यासाठीं? लोकांना लुटणारा असा एक संघटित वर्ग तयार करण्यासाठीं? शेतीच्या भरभराटीमध्येंच देशाची भरभराट आहे आणि शेतीची भरभराट झाली तरच गरजेच्या वस्तु परवडण्याची स्थिति निर्माण होते. हा मूलभूत सिद्धान्त टाळण्याचा प्रयत्न ग्राहक सहकारी व औद्योगिक सहकारी संस्थांतून झाला. ही सहकारी संघटना जर भक्कम बनली असती, तर १० टक्के कारागीर वर्ग कारखानदारांच्या जोडीला जाऊन बसला असता.

परंतु सरकारचा ताबा किमतीवर राहिला नाहीं. भावांच्या चढउतारामुळें सर्व सहकारी संघटना कोलमडून पडल्या. स्थानिक नेतृत्वहि फारसें निर्माण झालें, असें मला वाटत नाहीं. कारण सहकारी सस्थांमध्यें सेक्रेटरी किंवा मॅनेजर हाच प्रमुख राहिला. सर्व अंतिम ध्येयांचे विचार आणि आपण ज्या आर्थिक परिस्थितीसाठीं झगडतो आहोंत त्याची स्पष्ट कल्पना खालच्या प्रत्येक कार्यकर्त्याला येणार नाहीं, हें खरें आहे. परंतु सरकारनें आणि प्रॉव्हिन्शियल असोसिएशनसारख्या मोठ्या संस्थांनीं या अंतिम ध्येयांचा विचार करणें आणि त्यानुसार कार्यक्रम ठरविणें जरूर आहे.

हिंदुस्थानांत सहकारी संघटनेचें स्वरूप हें विविध कार्यकारिणी सहकारी सोसायट्या असें खेड्यांच्या पातळीवर तरी रहावें आणि खेड्यांच्या स्वयंपूर्णतेसाठीं तेथें धंदे उभारावे व जें तेथें तयार होऊं शकत नाहीं, तेवढेंच बाहेरून आणण्यासाठीं आणि ज्या वस्तूंचें उत्पादन जास्त होतें तें बाहेर खपविण्यासाठीं या विविध कार्यकारी सहकारी संस्थांचें तालुका वा जिल्हा येथपर्यंत मोठें संघटन असावें, असें माझें चित्र आहे. परंतु आज ज्या तऱ्हेनें सहकारी संस्थांचें काम चालू आहे त्या तऱ्हेनें तें शेवटीं प्रतिक्रांतिकारक ठरणार आहे, असे माझे विचार बनत चालले.

आदिवासी सहकारी सोसायट्यांबद्दलहि माझें हेंच मत आहे. मुंबई प्रांतांतील आदिवासी सहकारी सोसायट्या या आदर्श मानल्या जातात. लाखों रुपयांचे नफे–आणि तोटेहि–या सोसायट्या करतात. पण आज लाखोंचे फायदे वा नुकसान करून आदिवासींच्यांत काय बदल झाला आहे? त्यांच्या समजशक्तीच्या अनुसार ही सहकारी सोसायटी बनत नाहीं. वास्तविक हिंदुस्थानांतील सर्व जंगल हें सरकारी आहे. त्याचें राष्ट्रीयीकरण झालेलेंच आहे. मग जंगलच्या उत्पन्नामध्यें भावाची चढाओढ करणें याची जरूरी काय? सरकारनें याचें भावनियंत्रण केलें पाहिजे. त्यांतून चढाओढ काढून टाकली पाहिजे आणि आदिवासींना जीवनवेतन दिलें पाहिजे. यामध्यें चढाओढ व भावांतील चढउतार यांचा प्रश्नच येऊं नये. आदिवासींच्या नांवानें जे धंदे होत आहेत, तें सांभाळण्याची त्यांची कुवत नाहीं. लाखों रुपयांचे व्यवहार आदिवासींचे आंगठे घेऊन होत आहेत. सर्व सेक्रेटरी अर्थातच बाहेरचे! सहकारी चळवळीचा गौरव मला तर यांत कोठेंच दिसत नाहीं. मी एकदम फार ध्येयवादी अपेक्षा करतों, असें लोक मला म्हणतात. सर्व गोष्टी एकदम होतील, असें मीहि मानीत नाहीं. पण मूळ विचार हा स्पष्ट झाला पाहिजे आणि कार्यकर्त्यांच्या समोर तो स्पष्टपणें मांडला गेला पाहिजे, असें मात्र मला वाटतें.

१९४८ च्या एप्रिलमध्यें पुण्याजवळ मांजरी येथें सुभाष सामुदायिक सहकारी शेती संघाची स्थापना झाली. शेतीच्या उद्योगावर मीं अनेक दिवस चिंतन केलें आहे. मध्यमवर्गीय जीवनाला आज दरमहा दीडशें रुपयांची आवश्यकता आहे. आज कोरडवाहू शेतजमिनीमध्यें चार आणे रोज व पाण्याखालील जमिनीमध्यें एक रुपया रोजीच्यावर मजुरी जात नाहीं. यापेक्षां जास्त पैसे शेतींत मिळवायचे तर रोखीचीं पिकें घेऊन शेती हा भांडवली धंदा करणें जरूरीचें आहे. मजूर लावून शेती करणें हें तर माझ्या शास्त्रांत बसत नाहीं. परंतु रोखीचीं पिकें घेऊन मजूर न लावतां माणशीं वार्षिक दीड ते दोन हजार रुपयांपर्यंत उत्पन्न आपण कधीं काढूं शकूं काय? हें शक्य झालें तरच सुशिक्षित मध्यमवर्ग शेतीकडे वळेल. मांजरी येथें सहकारी शेतीची स्थापना घुले पाटील यांच्या मदतीनें झाली. प्रथमतः ही जमीन कालव्यांमुळें उपाळली होती १९२६–३३ सालापर्यंत सरकारनें जमिनीच्या आंतून ड्रेन टाकून आणि पाण्याचा निचरा करवून सुधारली. त्यानंतर ती जमीन सरकार वार्षिक लिलांवानें देई. पुण्यांतील कांहीं मंडळी हा लिलांव घेत आणि मांजरी येथील शेतकरी पुन्हां पोटखंडानें घेऊन कशीत!

मांजरी येथील घुले पाटलांच्या मित्रांनीं आणि रामभाऊ तुपे यांच्यासारख्या सेवादलांतील तरुण मुलांनीं आग्रह केल्यानें या सोसायटींत मीं लक्ष घातलें. त्या वेळेला सरकारी अधिकारी सज्जन भेटल्यामुळें सरकारनें लिलांव थांबवून अन्-रजिस्टर्ड सोसायटीला ही जमीन दिली. परंतु पुढें अनेक अडचणी होत्या. मुख्य अडचण पैशांची आणि दुसरी अडचण चांगला सेक्रेटरी मिळविण्याची. स्थानिक भांडणें, राजकारण आणि सोसायटी झाल्यामुळें ज्यांना जमीन मिळाली नाहीं, त्यांचा राग असे अनेक अडथळे होतेच.

३० जानेवारी १९४८ ला गांधीजींची हत्या झाली व ब्राह्मणविरोधी वातावरणाचा फटका तेथें बसला. मांजरीच्या कामासाठीं मला मदत करणारे माझे अनेक मित्रहि त्या वेळीं सोसायटी

मोडून टाकावी, या मताचे बनले. परंतु काम बंद केल्यामुळें ब्राह्मणद्वेष बंद थोडाच होणार होता ? याच वेळीं मायदेवांसारखा अत्यंत मेहनती आणि हुशार कार्यकर्ता सेक्रेटरी म्हणून मला मिळाला. सरकारकडून मॅनेजरच्या पगारासाठीं आणि बेण्यासाठीं थोडेंफार कर्जेहि मिळालें. मायदेवांनीं सोसायटींत लक्ष घातल्यामुळें सोसायटीची गाडी हळूंहळूं रुळावर आली. उधाऱ्या करून एक ट्रॅक्टरहि मिळाला आणि हळूं हळूं शेतीचा नूर पालटला. सभासदांनींहि या वेळेला पुष्कळ कळ सोसली. एक वर्षभर विनावेतन काम चालू होतें. तिसऱ्या वर्षीं पाय जरा जमिनीला लागले. १६ हजारांचें नुकसान भरून काढून ९ हजारांचा फायदा सोसायटीस झाला. मारामाऱ्यांचीं अनेक प्रकरणें पोलिसांपर्यंत गेलीं आणि तेथील गुंडगिरीला आळा बसला. लेव्ही जास्त घातल्यामुळें सरकारांतहि आमचें वजन वाढलें आणि सोसायटीची आर्थिक स्थिति सुधारावी, म्हणून कांहीं प्रमाणांत ऊस लावण्याला शेवटीं परवानगी मिळाली.

योग्य रीतीनें शेती केल्यामुळें आज ही सोसायटी म्हणजे सोन्याची खाण बनलेली आहे. श्री. मायदेव यांच्या कर्तृत्वालाच याचें फार मोठें श्रेय आहे. या सोसायटीच्या निमित्तानें माझे विचार स्पष्ट करीत आहें.

एका माणसामागें भांडवली खर्च किती व्हावा ?—आज बागायती शेतींत सरासरी एक हजार रुपये तो आहे. मांजरीला सरासरी याच्या २–२॥ पट असावा. याहिपेक्षां भांडवली खर्च आपण वाढवीत असलों तर आपली ही एक जॉइंट स्टॉक कंपनीच होईल. सोसायटीचे सभासद खास हक्कदार वर्गापैकीं ( Privileged class ) बनतील. वास्तविक कायम स्त्री मजुरांनाहि तेथें मेंबर्स बनविलें पाहिजे. बोनस हा त्यांच्याहि मजुरीवर वांटला पाहिजे. या सोसायटीला आज नऊ-दहा वर्षें झालीं. उत्तम रीतीनें काम चालविल्यामुळें आज जमीन खरेदी करण्याइतकी शक्ति सोसायटींत निर्माण झाली आहे. परंतु, आजूबाजूंच्या शेतकऱ्यांना सहकाराचें महत्त्व पटवून देण्याची ताकद निर्माण झाली नाहीं. सहकारी खरेदी–विक्रीसारखे सहकार्याचे साधे पर्यायसुद्धां त्यांना आजूबाजूच्या शेतकऱ्यांना पटवितां आले नाहींत.

सहकारी चळवळ ही जर आपल्या आयुष्याची एक जिवंत प्रेरणा असेल तर साऱ्या आजूबाजूच्या जीवनाला तिनें व्यापलें पाहिजे. सहकारी क्षेत्राची लहान लहान डबकीं निर्माण करणें यांत मला समाधान नाहीं. तरुण पिढीला तरी सहकारी तत्त्वाचें साकल्यानें दर्शन झालेंच पाहिजे. एखादी सहकारी सोसायटी यशस्वी करून दाखविणें यांत कर्तृत्व आहे, यांत शंकाच नाहीं, पण तेवढ्यावरच समाधान मानण्याची आपली प्रवृत्ति राहिली तर आपली वैचारिक वाढ थांबली, असें मी म्हणेन.

आजच्या भांडवलशाही समाजरचनेला प्रचंड धक्का मारण्याचें सामर्थ्य आपल्या सहकारी चळवळींतून निर्माण झालें पाहिजे. नाहींतर सहकार म्हणजे भांडवलशाही समाजरचनेवर आधारित एक बांडगूळहि बनूं शकतें. अशी खुरटलेली, अल्पसंतोषी वृत्ति मला पहावत नाहीं. आपल्या सर्व कामांतून आपल्या डोळ्यांसमोरील अपेक्षित क्रांतीचें दृश्य नेहमीं स्पष्ट होत गेलें

पाहिजे आणि त्याजवळ आपण जात आहोंत, असा विश्वास आपणाला वाटला पाहिजे. या सर्व कामांना या क्रांतीच्या संदर्भांतच खरा अर्थ आहे.

९ ऑक्टोबर १९४९ ला मी ठाण्याला सेवादलाच्या सभेकरितां चाललों होतों. दादरच्या स्टेशनावर यायला जरा उशीरच झाला. मी पोंचलों तर गाडी सुटायची वेळ झाली होती. ही गाडी चुकली असती तर एक तास सभेला उशीर झाला असता म्हणून पळत सुटलेल्या गाडींत चढण्याचा मीं प्रयत्न केला. पण यामुळें सेवादलाच्या मिटिंगला जायला एक वर्ष उशीर झाला ! माझा पाय फूटबोर्डावरून सरकला आणि प्लॅटफॉर्म व गाडी यांच्यामध्यें मी पडलों. कसें तें आठवत नाहीं, परंतु चाकाच्या पुढें निघालेली लोकलची लोखंडी दांडी माझ्या हातांत सांपडली. तिला पकडून ठेवल्यामुळें गाडीबरोबर मी फरफटत ओढला जाऊं लागलों. माणसांनीं आरडाओरडा करून गाडी थांबेपर्यंत ती अर्धाअधिक प्लॅटफॉर्मच्या पुढें निघून गेली होती. मात्र मी चांगला सावध होतों. इतकेंच काय, पण हातावर बांधलेल्या घड्याळाचा सेकंद कांटा सरकतांनाहि मला दिसत होता !

गाडी थांबल्यानंतर मीं पडलेलें फाउंटनपेन व चपला शोधायला सुरुवात केली. पाठ रक्तानें न्हाऊन निघाली आहे. याची मला जाणीव नव्हती. कांहीं लोक हंसलेलें मला आठवतात जीव वांचल्याचा आनंद सोडून चार आठ आण्याच्या वस्तूवरील लोभहि सुटत नाहीं, असें त्यांना वाटलें असावें ! माझ्या मात्र मनांत असें होतें कीं, जीव वांचलाच आहे, आतां या वस्तु तरी कशाला सोडा ?

के. ई. एम्. मध्यें मला नेलें. डॉ. वझे हाउस सर्जन होते. डॉ. बालिगांकडे माझी केस होती. मी जनरल वॉर्डमध्येंच होतों. पण वैकुंठभाई, मुरारजीभाई वगैरे पुढाऱ्यांनीं भेटी दिल्यामुळें ट्रिटमेंट फार चांगली मिळाली ! उपचार फार लवकर झाले. जखम अतिशय खोल होती. त्या वेळचें सर्व शारीरिक दुःख सहन करतांना माझी सहनशक्ति तुटेपर्यंत ताणली गेली. अर्थात् सहन करण्यावांचून इलाजच नव्हता. डॉ. बालिगांनीं ग्राफ्टिंग केलें. त्यामुळें जी जखम भरून येण्यास सहा महिने सहज लागले असते ती पावणे दोन महिन्यांत भरून आली. नंतर कांहीं दिवस पन्हाळ्याला कोरगांवकर बंगल्यावर जाऊन राहिलों. हवापालट केल्यामुळें लवकर फायदा झाला आणि दोनचार मैल हिंडण्यापर्यंत माझी प्रगति झाली. त्यानंतर मी वर्ध्यास गेलों.

चरखा संघाचे धोरण मोठाल्या संस्था मोडून स्थानिक संस्था उभ्या करण्याचें झालेलेंच होतें. त्यामुळें चरखा संघाच्या कामाशीं फारसा तात्त्विक विरोध माझा राहिला नव्हता. प्रत्येक ठिकाणीं राजकीय अडथळे आल्यामुळें महाराष्ट्रांतील माझें विधायक काम निष्प्रभ ठरत होतें. माझी अपक्ष भूमिका एका बाजूला कॉंग्रेसश्रेष्ठींना अमान्य होती आणि दुसऱ्या बाजूनें माझ्या तरुण समाजवादी मित्रानांहि अमान्यच होती. यामुळें माझ्या विचारांशीं सहमत म्हणून नाहीं तरी आचारांत सहकार्य म्हणून चरखासंघांतील मंडळीच मला जवळची वाटत होती. सेवाग्राम येथें मार्च १९४८ मध्यें विधायक कार्यकर्त्यांच्या संमेलनांत सर्व सेवा संघाची स्थापना करण्याचें

ठरलें होतें त्याप्रमाणें सर्व सेवा संघाची स्थापना झाली. या वेळेला प्लॅनिंग कमिशनच्या शेती व ग्रामोद्योग सल्लागार मंडळावर सर्व सेवा संघातर्फें मला व डॉ. कुमारअप्पा यांना पाठवण्यांत आलें. शेतीच्या मालाचे भाव जर कांहीं निश्चित होऊं शकले व कांहीं काळ स्थिर राहिले, तरच आजची खेड्यांची आर्थिक परिस्थिति सुधारेल. भावांच्या चढउतारांची रस्सीखेच जर थांबवतां आली तर शेतकऱ्याच्या जीवनाला कांहीं स्थैर्य येईल आणि त्याची क्रयशक्ति वाढेल, अशा निर्णया-वर मी आलों होतों. यासाठीं दिल्लीवाल्यांशीं आपले संबंध राहिले पाहिजेत, असेंहि मला वाटे.

१९५१ च्या जूनमध्यें मुंबई सरकारतर्फें व मध्यवर्ती सरकारतर्फें आम्ही सहा माणसें जपानमधील ग्रामीण उद्योगधंद्यांची पाहणी करण्याकरितां गेलों. मीं जपानला यावें म्हणून प्राणलालभाई कापडिया यांनीं फार खटपट केली. मध्यवर्ती सरकारतर्फें मी जपानला गेलों. जपानमधील हमामात्सु या जिल्ह्याच्या ठिकाणीं प्राणलालभाईंचे एक मित्र विद्युत्मागाचा एक कारखाना चालवितात. त्यांच्या घरींच आम्ही राहिलों. तेथें आम्हीं स्टेशनवॅगन विकत घेतली व खेड्यांत १० हजार मैल प्रवास केला. प्राणलालभाई माहीतगार होतेच. लहानमोठीं शहरें-कारखाने हें तर आम्हीं पाहिलेंच, पण मुख्यतः जपानी खेडेगांवांतील जीवनाचा बारकाईनें अभ्यास केला. तेथील शेतीसंशोधन केन्द्रें, प्रात्यक्षिक केन्द्रें, शेतीच्या पद्धति व पाणीपुरवठा योजना यांचा बारकाईनें आम्हीं अभ्यास केला. आपल्याकडे उपयुक्त ठरतील अशा आठ-दहा ग्रामोद्योगांचाहि अभ्यास केला.

जपान हें एक अत्यंत उद्योगप्रवण व यंत्रप्रगत असें राष्ट्र आहे. त्यांचे उद्योग हे लहान लहान गटांत विभागले गेले असले तरी भांडवलाच्या दृष्टीनें केन्द्रित असेच आहेत. काम विकेंद्रित असलें तरी धंदा वा भांडवल हें केन्द्रितच आहे आणि त्याबरोबर येणारी सत्ता हीहि केंद्रितच आहे. विजेवर चालणारीं यंत्रें प्रत्येक घरांत आहेत. अफाट मनुष्यशक्ति लक्षांत घेऊन विजेनें चालणारी परंतु ज्यावर हातानेंच काम करावें लागतें आणि म्हणून ज्यांतून बेकारी निर्माण होत नाहीं अशीं छोटीं छोटीं यंत्रें चालवून उत्पादन करण्यांत फार मोठें यश जपाननें मिळविलें आहे. हीं यंत्रें इतक्याच कार्यक्षमतेची आहेत कीं मनुष्यहातापेक्षां २-२॥ पट काम यंत्रानें अधिक होतें. जपानी मनुष्य आज हातानें आपल्या चार ते पांच पट अधिक काम करतो. आणि अशा यंत्रांमुळें त्याची कार्यक्षमता आपल्या एकूण दसपट वाढली आहे. कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक गेल्या ५-६ पिढ्यांत त्यांनीं केला आहे. आपल्याकडे हें सारें कितपत यशस्वी होईल, हा खरा प्रश्न आहे.

आपल्या माणसांच्या आजच्या मर्यादा ओळखून यंत्रें तयार केलीं पाहिजेत. आज आपल्या मजुराची काम करण्याची शक्ति इतकी कमी आहे कीं, जपानसारखीं यंत्रें उपयोगी पडणार नाहींत. येथील माणसाच्या कुवतीप्रमाणें येथील यंत्रें बनवावीं लागतील व त्याची कुवत वाढेल, त्याप्रमाणें यंत्रांतहि सुधारणा व्हावी लागेल. या दृष्टीनें प्रयत्न करण्याऐवजीं स्वयंचलित यंत्रांकडे आज आपण झपाट्यानें जात आहोंत. त्यामुळें बेकारी वाढण्यालाच मदत होत आहे. हें देशाचें दुर्दैव आहे !

श्री. आर्. के. पाटील ग्रामोद्योग सल्लागार मंडळाचे अध्यक्ष होते. प्लॅनिंग कमिशनच्या सल्लागार बोर्डाच्या पहिल्या सभेंतच डॉ. कुमारप्पा यांनीं स्वतःचा भिन्न दृष्टिकोन स्पष्टपणें मांडला. ते म्हणाले : "भांडवलनिर्मितीची तुमची विचारसरणी मला मंजूर नाहीं. भांडवलनिर्मिति झाली पाहिजे, म्हणून आहे तें सर्व भांडवल मोठ्या उद्योगधंद्यांत ओतलें पाहिजे, ही तुमच्या योजनेची बैठकच मला अमान्य आहे. हिंदुस्थानांत वीस कोटी लोक आहेत. आहे त्या भांडवलानें त्यांच्या ४० कोटी हातांच्या शक्तीचा उपयोग करून घेणें हाच भांडवलाच्या निर्मितीचा जवळचा आणि निश्चित मार्ग आहे." डॉ. कुमारप्पांची ही विचारसरणी मान्य केली नाहीं, म्हणून पुढें ते प्लॅनिंग कमिशनच्या सभेला हजर राहिले नाहींत.

मी तेथें कांहीं निश्चित विचार बनवून गेलों नव्हतों. हिंदुस्थानांतील अर्थकारण सर्वांत वरच्या पातळीवर कसें चालतें, तिथें माणसें कशा तऱ्हेनें विचार करतात याचा मला अभ्यास करायचा होता. आणि आपला दृष्टिकोन प्रभावी ठरला तर शेती व ग्रामोद्योगांच्या दृष्टीनें पंचवार्षिक योजनेंत कांहीं तरतूद करवून घेतां आली तर पहावें, अशी माझी भावना होती. एक-दीड वर्ष मी या सभासाठीं जात-येत होतों. माझे विचार स्पष्ट व्हायला व योजनेचें स्वरूप पूर्णत्वानें बघण्याला माझें दिल्लीचें हें काम उपयोगी ठरलें. त्या वेळीं ग्रामीण कर्जाच्या प्रश्नावर एक मतभेद उत्पन्न झाला. सहकारी सोसायट्यांतर्फे कर्ज दिलें जावें, असा एक विचार मांडला गेला. मीं असा विचार मांडला कीं "सहकारी सोसायट्यांमार्फत फार तर १० टक्के शेतकरी वर्गाला कर्ज मिळूं शकेल. परंतु ९० टक्के लहान शेतकरी—ज्यांना कायद्यानें आज तुम्ही कर्ज देऊं शकत नाहीं—त्यांच्या कर्जाची व्यवस्था काय? त्यांच्याजवळ जमीन कमी असल्यामुळें त्यांना कर्ज मिळूं शकत नाहीं, हें उत्तर केवळ कायद्याच्या दृष्टीनें बरोबर आहे. पण ही पंचवर्षीय योजना कर्ज घेऊं शकणाऱ्या १० टक्के लोकांसाठीं आहे कीं जे उत्पादनाकरितां राबतात त्या सर्वांसाठीं आहे? राष्ट्रीय उत्पादनवाढीमध्यें जे छोटे शेतकरी प्रत्यक्ष घाम गाळतात, त्यांना कांहींच स्थान नाहीं काय? आणि आज जर स्थान नसेल तर तें मिळवून देण्यासाठीं दुसरा कांहीं कार्यक्रम आहे काय?"

यावर दुसरी बाजू अशी होती : "पहिली पंचवर्षीय योजना ही मुख्यतः उत्पादनवाढीसाठीं आहे आणि उत्पादन वाढण्यासाठीं मोठ्या जमिनीच्या मालकांना आज तावडतोब मदत देणें हेंच आर्थिक दृष्ट्या योग्य आहे." अशा विचारांशीं मी सहमत होऊं शकलों नाहीं. यानंतर रूरल क्रेडिट सर्वे कमिटीची नेमणूक झाली. या प्रश्नाचा सर्वांगीण व सूक्ष्म विचार करून रिपोर्ट लिहिला गेला आहे. कर्ज देणाऱ्या सहकारी संस्था वाढवून त्या जास्तींत जास्त लोकांपर्यंत पोंचतील या तऱ्हेनें सरकार आज पावलें टाकीत आहे. मात्र बाजारभावांवर जोंपर्यंत सरकार ताबा ठेवूं शकत नाहीं व शेतीच्या मालाचे भाव आणि पर्यायानें सर्व बाजारभाव इ. निश्चित व सुसंवादी ठेवण्याच्या दृष्टीनें सरकार हालचाल करीत नाहीं, तोंपर्यंत सहकारी संस्थांचा डोलारा हा डळमळीतच राहणार आहे. देशाचें उद्योगीकरण लवकर व्हावें म्हणून शेतीचा माल व कच्चा माल यांच्या किमती कमी करण्याचा एक विचार-प्रवाह आज प्रभावी

आहे. शेतीचा धंदा हा आज नीचतम पातळीला पोंचल्यामुळें त्यांत कितीहि भांडवल घातलें तरी त्यांतून भांडवलनिर्मिति होणार नाहीं, म्हणून उद्योगधंदेच झपाट्यानें वाढविले पाहिजेत आणि त्यांच्या नफ्यांतून शेती जगविली पाहिजे, हा या विचारसरणीमागील मुख्य मुद्दा आहे.

आज आपल्या देशांत ४८ टक्के उत्पन्न शेतीमधून येते आणि केवळ १७ टक्के कारखानदारी धंद्यांमधून येते. शेतीची सुधारणा व स्थैर्य हेंच आपल्याकडे भांडवलनिर्मितीचें साधन बनेल आणि त्यामुळें शेतीमालाचे भाव निश्चित करणें आणि परवडतील असें ठेवणें हाच पंचवर्षीय योजनेचा पाया होऊं शकेल, असें माझें मत बनलें आहे.

१९४८-५२ या वर्षांत आपण निश्चित काय करावें, हें मला कळत नव्हतें. दिल्ली मिनिस्ट्रीमध्यें ग्रामोद्योगांचें खातें मीं संभाळावें, अशी एक सूचना होती. सरकारमध्यें राहून काम करावें कीं नाहीं, यावर माझें मत ठरत नव्हतें. त्यानंतर सर्वोदयाच्या आमच्या कार्यकर्त्यांचे विचार स्पष्ट होत गेले. सरकारशीं संबंध न ठेवतां अपक्ष भूमिकेवरून काम करणारीं माणसें देशांत असावींत व त्यांनीं जनसंघटनेचें काम केलें पाहिजे, हा विचार दृढ होत होता. याच वेळीं खादी ग्रामोद्योग बोर्डाची स्थापना झाली. त्याचा सेक्रेटरी मीं व्हावें म्हणूनहि फार खटपट झाली. पण हें सर्व मीं नाकारलें. सरकारच्या यंत्रणेशीं पगारी वा ऑनररी कोणताच संबंध ठेवायचा नाहीं, असें मीं ठरवलें आणि १९५२ च्या एप्रिलमध्यें अखिल भारतीय चरखा संघाचा सेक्रेटरी म्हणून मीं काम करण्यास सुरुवात केली.

वर्धा येथें खादीविद्यालय चालविण्याचा विशेष उत्साह मला होता. ग्रामीण जीवनाचा आर्थिक विचार करण्यासाठीं शेतीची जोड आवश्यक होती. तीहि आतां मला मिळाली. महाराष्ट्रांत मांजरीलाच असें विद्यालय चालवावें, असें माझ्या फार मनांत होतें. परंतु ग्रामोद्योगांचें वातावरण भोंवतीं पाहिजे, तें नव्हतें. महाराष्ट्रांत महाराष्ट्र सेवा संघातर्फे आणखीहि २-४ ठिकाणीं अशीं विद्यालयें काढण्याच्या दृष्टीनें मीं प्रयत्न केले होते. पण तें फारसें जमलें नाहीं. वर्धा येथील खादी विद्यालयाला शेती जोडल्यानंतर मीं तेथेंच काम करण्याचें ठरविलें. गांधीजींच्या नंतर चरखासंघ-गोसेवासंघ अशा अखिल भारतीय संस्थांनीं एकत्र आलें पाहिजे, असें मत माझें होतें. इतरांचीहि यासारखीच विचारसरणी असल्यानें अ. भा. चरखा संघ १९५३ मध्यें सर्व सेवा संघांत विलीन करण्यांत आला. हिंदुस्थानी तालीमी संघ व हिंदुस्तानी प्रचार सभा या दोन संस्था आज सर्व सेवा संघाशीं संलग्न आहेत. जेथें स्थानिक संस्था नाहींत, तेथें स्थानिक संस्था निर्माण होईपर्यंतच सर्व सेवा संघानें प्रत्यक्ष उत्पत्तीचें वा धंद्याचें काम करावें. साधारणपणें स्थानिक संस्थांवर उत्पत्ति व व्यापार सोंपववा. सर्व सेवा संघानें शिक्षण संशोधन व विचार-प्रचार करावा, अशी आजची नीति आहे. आज विचारप्रचाराचें काम भूदान चळवळीतर्फे मुख्यतः चालू आहे. आज खादी कमिशनमार्फत मगनवाडीला ग्रामद्योग संशोधन केंद्र चालू आहे. खादी कार्यकर्ते तयार करण्याचें कामहि खादी कमिशनतर्फेंच आज होत आहे.

खादीचें काम हें हळूंहळूं सरकारनेंच घ्यावें, असें गांधीजींचें मत होतें. मद्रासमध्यें १९४७ पासूनच फिरका डेव्हलपमेंट योजनेतर्फे खादीचें काम सरकारी रीत्या होत असे.

आजहि पंचवर्षीय योजनेंत खादी व ग्रामोद्योगांचें स्थान सरकारनें मान्य केलें आहे. आणि कमिशन करून त्याची जबाबदारीहि उचलली आहे. आजच्या बदललेल्या परिस्थितींत हीं कामें सरकारतर्फें आणि विकास योजना, एन्. ई. एस्. वा अन्य निमसरकारी योजनांद्वारें चालणें हेंच व्यवहार्य आणि आवश्यक आहे.

● ● ●

# ७ : नवक्रांतीचें दर्शन

१९४८ ते १९५३ हा काल माझ्या वैचारिक मंथनाचा होताच, परन्तु आत्यंतिक निराशेचाहि होता. स्वातंत्र्य आलें, परन्तु स्वराज्य अजून फार लांब आहे, हें मला उमजूं लागलें. या स्वातंत्र्यांतून भांडवलशाही निर्माण होणार, अशी माझी खात्री पटली. विशेषतः दिल्ली येथील प्लॅनिंग कमिशनमधील माझ्या अनुभवानें मला हें स्पष्ट दिसलें कीं, आपल्याला दिसत असलेलें हिंदुस्थानचें भावी चित्र आणि प्रत्यक्ष घडूं घातलेला हिंदुस्थान यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे !

आज सर्वसाधारण भारतीय अर्थशास्त्रज्ञाची दृष्टि अशी आहे– रशियाचा विकास झाला तो ४–२ कोटी लोकांना तेथील हुकूमशहांनीं अर्धपोटी राबवलें म्हणून. पाश्चिमात्य राष्ट्रांचा विकास साम्राज्यांमुळें झाला, आतां आपला विकास व्हायचा तर येथील ५--६ कोटींना अर्धपोटी--अर्धनग्न असें आणखी कांहीं वर्षें राबावें लागणारच आहे. आपल्या देशांत दारिद्र्य नवीन नाहीं. तेव्हां याबद्दल विशेष खंत करण्याचें काय कारण आहे ? उद्योगीकरणाला त्यागाची किंमत द्यावीच लागते. उघड्या डोळ्यांनीं धाकधपटशा दाखवून कुठें विकास होतो तर कुठें अप्रत्यक्षपणें कच्च्या मालाच्या किमती उतरवून व जनतेची क्रयशक्ति कमी करून करावा लागतो. पण विकासाला ही पायाभरणी आवश्यकच आहे. आणि म्हणून आज जें चालू आहे तें अपरिहार्य आहे. आज प्लॅनिंग कमिशनची हीच विचारसरणी आहे. इतकेंच काय परंतु सोशलिस्टिक पॅटर्न मानणारे सर्व पक्षहि आज थोड्या फार फरकानें हेंच म्हणत आहेत. याचें कारण असें आहे कीं, देशाचें उद्योगीकरण व्हावें, राजकीय दृष्ट्या आपला देश स्वावलंबी बनावा व म्हणून शस्त्रास्त्रें आणि यंत्रोत्पादन इथें व्हावें, हाच सर्वांचा उद्देश आहे. आज पंचवर्षीय योजनेला कोणत्याहि पक्षाचा मूलभूत विरोध नाहीं, याचें कारणहि हेंच आहे.

पण याचाच अर्थ उद्योगधंदे नेहमींच शेतीवर कुरघोडी करणार असा आहे. कारण उद्योगधंद्यांत यंत्रीकरण व शेती बैलशक्तीवर आधारित या समीकरणांत विषमता कायमच रहणार आहे. एकाद्या पिढीनें उपाशीपोटी काम केल्याखेरीज देशाची भरभराट होणार नाहीं,

हें खरेंच आहे. पण उपाशी रहाण्याची हांक देण्याची ताकद कुणामध्यें आहे ? जे आज उपाशी-जनतेच्या उरावर बसून स्वतः सर्व सुखें उपभोगीत आहेत त्यांच्यामध्यें ? आणि स्वार्थत्याग कशासाठीं करायचा ? ही विषमता कायम टिकवून धरण्यासाठीं ? स्वराज्य मिळाल्यावर गरिबांना जें मिळेल असें वाटलें ती स्थिति देशांत लवकर निर्माण होईल, ही आशा साफ फोल ठरली. इतकेंच नव्हे तर इंग्रजी राज्यांत उद्योगधंद्यांना अटकाव होता व बाहेरील स्वस्त वस्तु इथें मिळत होत्या. आज हेंहि सुख हिरावून घेतलें गेलें आहे ! आज उघड्या डोळ्यांनीं भांडवलशाहीचा भरभक्कम पाया घातला जात आहे. असल्या 'त्यागाचें' हें भांडवलशाही प्रमेय मानण्यांत माझ्या मनाला अत्यंत यातना होतात.

दुसऱ्या बाजूला स्वराज्य मिळवतांना जीं सामाजिक मूल्यें गांधीजींनीं निर्माण केलीं तीं स्वराज्यानंतर भराभर नष्ट होत आहेत. पूर्वीं सरकारी नोकरीविषयीं समाजांत तिरस्काराची, कमीपणाची भावना होती. आज तो लोकसेवेचा राजमार्ग बनला आहे ! दोन-तीन तपें ज्यांनीं कांहीं त्याग केला, तेहि आज त्या त्यागाचें भांडवल करून त्याचा उपयोग सत्तेच्या अगर श्रीमंतीच्या जागा पटकावण्यासाठीं करीत आहेत. कोणत्याहि मार्गानें पैसा मिळवणें योग्य आहे, असें मानलें जात आहे. माझे अनेक मित्र असे आहेत कीं, त्यांनीं निष्ठेनें व धडाडीनें सेवाकार्यांत उडी घेतली होती. आदिवासी वा खेडूत मुलांचें जें भवितव्य तेंच माझ्याहि मुलांचें, ते जें शिकतील तेंच माझ्याहि मुलांचें शिक्षण, अशा हिरीरीनें त्यांनीं सुरुवात केली होती. आज त्यांची मजल मुलीला नवरा पहातांना तो आय्. ए. एस्. असावा आणि मुलाला मुलगी पहातांना हुंडा भरपूर देणारें स्थळ मिळावें इथपर्यंत आली आहे. स्वतः गांधीलग्न केलें पण मुलीच्या लग्नाला ४–५ हजारांचा खर्च केला, अशा सारखीं दृश्यें दिसतात. हें सारें पहातांना माझ्या मनांत बेचैनी उत्पन्न होते.

शरीराला जशी जेवणाची संवय, तसें कांहींतरी शारीरिक कर्म म्हणून विधायक कार्य आम्ही करीत आहोंत. यांत कांहीं अर्थ राहिलेला नाहीं. अगदीं निष्प्राण असें हें काम आहे. वास्तविक आपल्या पिढीचें कार्य आतां संपलेलें आहे. आतां जितकें लवकर मृत्यूचें आमंत्रण येईल तेवढें बरें, ही माझी कांहीं दिवस अवस्था होती. पूर्वींची राजकीय धार विधायक कामांतून नाहींशी झाली होती. खादीच्या कामाचें स्वरूप आणि इतर सर्वच ग्रामोद्योगांचें स्वरूप हें एक प्रकारें भिक्षा वांटण्याप्रमाणें मदतरूप आहे, आज सर्वच ग्रामोद्योगांचें स्वरूप एक प्रकारें रिलीफ वर्क बनलें आहे, ही गोष्ट मला स्पष्टपणें दिसत होती. या माझ्या मनः-स्थितीचा परिणाम माझ्या प्रकृतीवरहि झाला असावा. या वेळीं माझें पोट अत्यंत खराब झालें होतें. पायोरियाची सुरुवात झाली होती. ॲनिमिक अशी स्थिति होती.

अशा या निराशेच्या अंधकारांत चांचपडण्याची क्रिया चालू असतांनाच भूदानाच्या चळवळीचा जन्म या देशांत झाला. केवळ जमिनीचे चार तुकडे हस्तांतरित करण्याची ही चळवळ आहे असें जर याचें स्वरूप समजलें तर हाहि एक दयेवर आधारित भिक्षांदेहीचाच मार्ग

आहे, असें मानावें लागेल. परन्तु एक सामाजिक व आर्थिक क्रांतीची भूमिका भूदानाद्वारें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होत आहे, या दृष्टीनें मी भूदान चळवळीकडे पहातों.

१९२० सालीं गांधीजींनीं एका महान् क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. समाजांत जीं रूढ व स्थिर मूल्यें असतील तीं उखडणें ही क्रांतीची प्रथम प्रक्रिया आहे. तेव्हां इंग्रजी भाषा, पोशाख यांचें बंड होतें. वृत्ति गुलामी बनल्या होत्या. त्यावरच गांधीजींनीं प्रथम हल्ला चढवला व भारतीयत्वाला एक मानाचें स्थान अखिल जगांत मिळवून दिलें. पुढें इंग्रजी कायदाहि तोडला. सत्तेच्या प्रत्येक चिन्हावर प्रथम वैचारिक आघातच होत असतो. कोणत्याहि क्रांतीचीं पहिलीं पावलें अशींच असतात. गांधी टोपीनें स्वराज्य येणार नव्हतें, पण त तीमुळेंच आलें.

भूदानाच्या चळवळींत १–२ एकर जमिनीच्या दानाला गांधी टोपी घालण्याइतकेंच महत्त्व आहे. कांहीं सामाजिक कर्तव्य म्हणून जमीन हस्तांतरित करणें, संपत्तिदान देणें हे प्राथमिक उपचार आज मान्यता पावत आहेत. हे स्थूल व लाक्षणीक भाग आहेत. याची मोजदाद् करणें जरूर आहेच, पण तेवढ्यानेंच सर्व क्रांति होत नाहीं. या लाक्षणिक कृत्यांतून मूल्यपरिवर्तनाचा कार्यक्रम विकसित होणें जरूर आहे. त्याशिवाय भूदान हेंहि रिलीफ वर्क होऊन बसेल. आजहि स्थिरावलेली अनेक सामाजिक मूल्यें बदलणें निकडीचें झालें आहे. शासनसंस्था व राज्यकर्ते यांच्याच द्वारें देशांत सर्व होईल ही शिकवण आज सरकार देत आहे. या अभिनिवेशानें आज सरकारी कामें चालू आहेत. पण लोकांची स्थिति यानें बदलेल, हा केवळ भ्रम आहे. कुणालाहि आपली स्थिति सुधारायची तर स्वतःच्या पायावरच उभें रहावें लागतें. जनतेच्या शक्तीलाच आवाहन देणें जरूर आहे. अधिकार घेऊन हें साधणार नाहीं. सत्तेपासून दूर राहूनच जनशक्ति जागृत केली पाहिजे. पुन्हां त्यागाची भूमिका वाढली पाहिजे. पुन्हां समाजाशीं एकरूप झालेले व शरीरश्रमाला जीवनाचा मुख्य आधार मानणारे लाखों कार्यकर्ते या देशांत निर्माण झाले पाहिजेत. सामाजिक भेद मिटले पाहिजेत आणि ' एक गांव एक परिवार ' हा आदर्श निर्माण झाला पाहिजे.

हे सर्व विचार भूदानातर्फे समाजाला नवी भूमिका देण्याचें काम करीत आहेत, नवीन मूल्यें निर्माण करीत आहेत व श्रमाधारित नवीन आचार देत आहेत. म्हणून माझ्यासारख्या विधायक कामाला वाहून घेतलेल्यांना पुन्हां एक आशेचा किरण या चळवळीमुळें दिसूं लागला आहे. भूदानाच्या कामासाठीं आणखी दहा वर्षे तरी जगावें, असें मला वाटूं लागलें आहे.

या कामाची आणि विशेषतः कोरापुट येथील ग्रामदानी गांवांच्या नवनिर्माणकार्याची जबाबदारी मीं घेतली, तेव्हां प्रथम माझी ढांसळलेली प्रकृति माझ्या कामाआड उभी राहिली. पण एक अपूर्व असा मानसिक उत्साह या नव्या जबाबदारीमुळें मला वाटला आणि मीं जगायचें आणि पूर्ण बरें होण्याचें ठरवलें. माझा आहार मीं पूर्ण बदलला. शिजलेलें अन्न सोडून भाज्या, फळें, नारळ असें अन्न घेतलें आणि आसनें शिकलों. आज पुन्हां दिवसाकांठीं ८–१० तास काम करणें वा ८–१० मल चालणें हें माझ्या आवाक्यांत आलें आहे.

१९२० सालीं मीं वर्धा येथें विनोबाजींना प्रथम पाहिलें. त्यांच्या अलौकिक बुद्धीबद्दल ऐकलें होतें खूप, पण आश्रमांत मी विशेष कधीं राहिलों नाहीं. विनोबा हे तेव्हां ' लोकसंग्रही ' नव्हते. उलट अत्यंत एकलकोंडे म्हणून त्यांची ख्याति होती. कुणीं अर्धा तास बडबड केली तर उत्तरादाखल ते एकादा शब्द बोलत.

कुणाला प्रश्न विचारावेत, अशी माझी मनोभूमिका कधींच नव्हती. त्यामुळें माझी त्यांच्याशीं फारशी ओळख कधीं वाढली नाहीं. पण ते अलौकिक शिक्षक आहेत. एकदां महिलाश्रमांत मराठी ४-५ यत्तांतील मुलींना गीताईचे कांहीं पाठ शिकवतांना मीं त्यांचें असामान्य शिक्षणकौशल्य पाहिलें आहे. अत्यंत शास्त्रशुद्ध व गणिती पद्धतीनें ते विचार मांडतात. एकादी सरळ रेषा ओढावी असे कापीव रेखीव त्यांचे मुद्दे असतात. चिंतन व मनन करण्याच्या वृत्तीमुळें एकाद्या द्रष्ट्याप्रमाणें व ऋषीप्रमाणें त्यांची स्थिति आज आहे. व्यवहारांत योग्य तडजोडहि ते करूं शकतात आणि म्हणूनच भूदानाच्या प्रत्यक्ष कामांत नेत्रदीपक यश त्यांना मिळालें आहे. भूदानाच्या चळवळींतील त्यांचा मुख्य भर हा केवळ आर्थिक वा सामाजिक नाहीं तर आध्यात्मिक आहे.

या चळवळीद्वारें एक नवीन अर्थशास्त्र निर्माण होत आहे. हिंदुस्थानांत भूमीची समस्या काय आहे, ती आपण नीट समजून घेतली पाहिजे. भूदानामुळेंच प्रश्न सुटतील, असें मानलें नाहीं तरी भूमिसमस्येचा उकल कसा करावा, याचें पूर्ण चित्र आपण स्पष्ट जाणलें पाहिजे. आज हा प्रश्न केवळ हिंदुस्थानचा नाहीं, सर्वच आशियांतील देशांपुढें हा भूमीचा प्रश्न फार मोठा आहे. लोकसंख्या जास्त आणि जमीन कमी आहे. लोकांना जर पुरेसें खायला मिळालें नाहीं तर शांतता कुठेंच राहणार नाहीं. म्हणून सर्वच देश या प्रश्नावर अनेक तऱ्हेनें उपाययोजना करीत आहेत. कायद्यानें हे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न चालू आहेत. सर्व कायदे याच दृष्टीनें होत आहेत कीं, हळूहळू जमिनीचें हस्तांतर व्हावें. मोठे जमीनदार नष्ट व्हावे व कोणी भूमिहीन राहूं नये. मधले व्यापारी व सावकार यांसारखे अनुत्पादक दुवे नाहींसे व्हावेत. कांहीं देशांत हें करण्यासाठीं रक्तरंजित क्रांति झाली, कांहीं ठिकाणीं कायद्यानें जबरदस्ती झाली.

हिंदुस्थानांत जमीन धारण करणारांपैकीं ७६ टक्के वर्ग असा आहे कीं, त्याचे जमिनीचे तुकडे ५ एकरांहून कमी आहेत. जमिनीचे तुकडे झालेलेच आहेत व प्रत्येक पिढीबरोबर ते आणखी लहान होत जातील. प्रत्येकाला किमान जमीन द्या, हाहि भूसमस्या सोडवण्याचा दुसरा मार्ग होऊं शकतो. हे तुकडे जर अनुत्पादक आहेत असें वाटलें तर लोक पुन्हां एकत्रीकरण व तुकडेबंदीची विचार करूं लागतील. केवळ कायद्यानें मात्र भूदानहि होणार नाहीं वा तुकडेबंदीची योजनाहि यशस्वी होणार नाहीं. ज्या वस्तूची मागणी जास्त व पुरवठा कमी तिचें वांटप तरी करावें लागतें अगर तिचें राष्ट्रीयीकरण तरी करावें लागतें. जीवनावश्यक वस्तूंवर सर्वांचा हक्क आहे, असाच मार्ग त्यांतून काढावा लागतो. जमीन ही अशीच वस्तु आज आहे. भूदानातर्फे तिचें वांटप करा अगर समाजाच्या सामुदायिक मालकीची ती करा, हाच

विचार मांडला जात आहे. जमीन ही जविनावश्यक वस्तु मानून तिचा समाजाच्या हिताच्या दृष्टीनें योग्य व जास्तींत जास्त उपयोग झाला पाहिजे, या निर्णयावर भारतालाच काय पण आशियांतील सर्वच देशांना यावें लागणार आहे.

केवळ भूमि मिळाल्यामुळें आजच्या वाढत्या लोकसंख्येचा आणि वाढत्या बेकारीचा प्रश्न सुटणार नाहीं, जमिनीच्या उत्पादनक्षमतेचा प्रश्नहि सुटणार नाहींच नाहीं. समाज-पोषणाचें तें एक प्राथमिक साधन आहे, असें आपण मानलें तर त्यावरचा खाजगी मालकीचा अट्टाहास सोडलाच पाहिजे. त्याची विक्री, हस्तांतर, आदि क्रिया बंद पडल्या पाहिजेत आणि शास्त्रीय दृष्ट्या उत्पादन वाढवण्याचा भगीरथ प्रयत्न केला पाहिजे. याचे मार्ग अनंत असूं शकतील. कायदा हा एक मार्ग, रक्तक्रांति हा दुसरा मार्ग आणि न्यायबुद्धि व करुणा यांना आवाहन करून माणसाचा हृदयपालट करून हें घडवून आणणें हा तिसरा मार्ग. मार्ग कोणताहि असो– तो परिस्थितीनुसार बदललेहि, पण दिशा अगदीं स्पष्ट आहे. माणसाच्या सदसद्विवेकबुद्धीला आणि डोळस दूरदृष्टीला साद घालणें, हाच संक्रमण काळ कमींत कमी दुःखदायक करण्याचा मार्ग आहे. यांतून वर्गसंघर्ष वा कटुता निर्माण होत नाहीं. मनुष्य मनुष्याचा दुष्मन बनत नाहीं. सामाजिक व आर्थिक क्रांति झाली पाहिजे, असें आपण म्हणतों. त्या दृष्टीनें मूल्य परि-वर्तनाचें काम झालें पाहिजे. भूमीचें स्वखुषीनें दान करणें हाच उत्तम मार्ग आहे. वैयक्तिक मालकी हक्काच्या भावनेची पूर्णाहुति या यज्ञांत पडावी, अशी सर्वांची तीव्र इच्छा आहे. गांधीजींच्या अहिंसक त्यागमय मूल्यांची परंपरा यांत आहे आणि हीच भारतीय परंपराहि आहे. याला धरूनच मालकीहक्कविसर्जनाचा विचार जनतेसमोर ठेवणें जरूर आहे.

हा विचार एका दिवसांत विकासित झाला नाहीं. १९५१ च्या १८ एप्रिलला पहिलें भूदान झालें. व्यक्तीच्या सद्भावना जागृत करून भूमिहीनांना जमीन देण्याचा विचार व प्रयत्न झाला. हजारोंनीं दानें मिळतील, अशी त्या वेळीं कुणाची अपेक्षा नव्हती. त्यागाची भूमिका नष्ट झाली आहे, आतां कायद्यानेंच प्रश्न सोडवले पाहिजेत, असेंच सर्व मानीत होते. पण ही चळवळ म्हणून विकासित झाली. सर्वांनीं आपल्या जमिनीचा सहावा हिस्सा दिला तर सर्व भूहीनांना जमीन मिळेल, हा एके काळीं या विचाराचा मध्यबिंदु होता. पण त्यांतूनहि प्रश्न सुटणार नाहींत, हाच अनुभव आला. विचारांचें आंदोलन आज ग्रामदानाच्या कल्पनेपर्यंत पोंचलें आहे. जमिनीचें समाजीकरण हेंच भूसमस्येचें निर्णायक उत्तर होऊं शकेल, हा विचार आज प्रभावी आहे. भूदानाच्या कल्पनेचें विकासित रूप म्हणजेच ग्रामदान. मात्र सर्व जमीन गांवसमाजाची म्हटलें तरी उत्पादनवाढीचा प्रश्न, उद्योगधंदे वाढवण्याचा प्रश्न, भांडवलाची निकड, सहकारी संघटना, ग्रामसंकल्प हे अनेक नवनिर्माण कार्याचे महत्त्वाचे प्रश्न पुढें उभे रहातात आणि त्यांना उत्तरें देण्याचा प्रयत्न आज सर्व छोटे मोठे कार्यकर्ते आपापल्या कुवतीप्रमाणें करीत आहेत.

विचार करतांना अनेक गुंतागुंतीचे प्रश्न मनासमोर उभे रहातात. सर्व जमीन गांव-समाजाची मानली तरी तिची वहिवाट कशी करावी, हा प्रश्न अनिर्णितच आहे. ग्रामसभा

८५४१

याचा विचार करील व हळूहळू यांतून मार्ग निघेल असें आम्ही सांगतों. जमीन पुन्हां वाटावी कीं सामुदायिक कसावी, असेहि प्रश्न विचारले जातील. अशा प्रश्नांचीं उत्तरें सर्वत्र सारखींच मिळतील, असें मी मानीत नाहीं. परिस्थितीनुसार व कार्यकर्त्यांच्या कुवतीनुसार संस्था बनतील. देशाच्या प्रत्येक भागांत वेगवेगळें उत्तरहि सांपडेल. जागृत जनशक्तींतून कदाचित् नवाहि मार्ग दिसेल.

एका बाजूला जमिनीचें समाजीकरण होत असतांना मांडवली उद्योग खाजगी मालकीचे रहावेत, हें दृश्य सुसंगत नाहीं. सामुदायिक जीवनाचें महत्त्व पटलेल्या गांवसमाजाचे नेते आणि ग्रामपंचायती विकसित झाल्या तर जमिनीबरोबर राजकीय सत्ताहि विकेंद्रित होईल. औद्योगिक कारखान्यांचेंहि राष्ट्रीयीकरण करावें लागेल आणि उद्योग व शेती यांच्यांत राबणाऱ्यांच्या जीवनांत समतोलपणा निर्माण करावा लागेल. शेतकरी आणि खेडीं हींच या चळवळीचीं अध्वर्यु बनतील आणि शेती ही उद्योगांची दासी, हें चित्र कायमचें नष्ट होईल.

क्रांति आर्थिक वा सामाजिक एकाच क्षेत्रांत कधींच होत नाहीं. भले तिचा आविष्कार एकाद्या ठिकाणीं प्रथम होवो; ती सर्व क्षेत्रांना व्यापून टाकील. वैचारिक भूमिका यासाठीं लवकर तयार झाली पाहिजे. मूल्यपरिवर्तन हें झपाट्यानें झालें पाहिजे. संपत्तिदान–बुद्धिदान आदि विचार आज मांडले जात आहेत, पण त्यांचा पूर्ण विकास अजून झालेला नाहीं. क्रांतीच्या या भव्य दर्शनानें भूदान कार्यकर्ते आज भारून गेले आहेत. भूमिसमस्या सुटल्यानें प्रचंड अशी कर्तृत्वशक्ति जागृत होऊन ती आपल्या श्रमशक्तीचें विश्वरूप दाखवते, असे चीनसारख्या शेतीप्रधान देशांतील अनुभव ताजे आहेत. हा आविष्कार आपल्या देशांत कां पहायला मिळत नाहीं, हा विचार मनांत आल्याशिवाय रहात नाहीं. या संबंधांत विचार करतांना आज या चळवळीचें वाहन बनलेल्या तरुण मध्यमवर्गीय कार्यकर्त्यांच्या अपुरेपणाची जाणीव झाल्याशिवाय राहात नाहीं.

या देशांत राजकीय क्रांति झाली. या क्रांतींत मध्यमवर्गीयांनीं मोठ्या संख्येनें भाग घेतला. त्याचें फळ म्हणून आज सत्ताहि त्यांच्याच हातीं आली आहे. यापुढची आर्थिक व सामाजिक क्रांति ही येथल्या दलित व शोषित समाजाची–श्रमजीवींची–क्रांति आहे. भूदानाच्या चळवळींतून ही जनशक्ति जागृत व्हावी व तिनें आपला प्रभाव सार्वजनिक जीवनावर टाकावा ही अपेक्षा आहे. आजचे पुढारी वा मध्यमवर्गीय कार्यकर्ते ही क्रांति करूं शकणार नाहींत. ग्रामसंकल्पाच्या द्वारें सामाजिक व आर्थिक क्रांतीचा विचार आज मांडला जात असला तरी तो विचार श्रमजीवींपर्यंत पोंचवण्याचें कार्य बुद्धिजीवी वर्गच आज करीत आहे. पण तो वर्ग श्रमजीवींशीं एकरूप झाला आहे, असें मात्र म्हणतां येत नाहीं. वैचारिक वा शारीरिक दृष्ट्या तो मध्यमवर्गीयच आहे. ज्या समाजांत क्रांतीची ज्योत पेटावी अशी अपेक्षा आहे, त्याच्याशीं याचें कांहींच साधर्म्य नाहीं. भूदान चळवळीचा सर्वांत कच्चा दुवा हा आहे, असें मला वाटतें. क्रांतीचा प्रभावी विचार हा विकसित होत जातो. पण त्याबरोबर या विचारांचे वाहक बनलेला, नेतृत्वस्थानीं असलेला कार्यकर्तावर्ग जर विकसित झाला नाहीं, तर ही क्रांति यशस्वी होत नाहीं.

विचारांच्या या विकासाबरोबर श्रमजीवींचें नेतृत्व कसें निर्माण होईल, बुद्धिजीवी व श्रमजीवी यांच्यांतील अंतर कसें कमी होईल व आज काम करणारे कार्यकर्ते श्रमनिष्ठ बनून श्रमजीवी समाजाशीं एकरूप कसे बनतील, हा भूदान चळवळीपुढील खरा प्रश्न आहे. आज आपल्याकडे आकर्षित होणारा कार्यकर्तावर्ग मध्यमवर्गीयच आहे आणि त्यागाच्या भावनेनें तो आकर्षिला गेला आहे. त्याच्यावर संस्कार थोडेफार होतात, पण ते ठोकळेबाज आचाराचे होतात. सेवा, त्याग यांचा उगम भावनेंत असला तरी तो स्थायी बनवण्यासाठीं बुद्धिनिष्ठेची आवश्यकता आहे. केवळ शारीरिक रीतीनें श्रमाचें कर्म केल्यामुळें मानसिक दृष्ट्या तो श्रमजीवींशीं एकरूप होईलच, असें नाहीं. उलट ह्या कर्मकांडाचा अन्वयार्थ त्याला लागला नाहीं, क्रांतीचें दर्शन स्पष्ट होत राहिलें नाहीं, तर तो कर्मांना कंटाळून किंवा कर्मांनाच चिकटूनहि, श्रमजीवींशीं मानसिक रीत्या द्रोहच करील. आणि कांहीं दिवसांनीं आपल्या आचारांना, त्यागाला किंमत नाहीं, फळ नाहीं म्हणून निराश होईल. जनतेला खेचण्यासाठीं ताकत फार मोठी असावी लागते. ही तयारी कार्यकर्त्यांची होत राहिली पाहिजे. सामाजिक व आर्थिक प्रश्नांचें आकलन करण्याची त्यांची कुवत वाढली पाहिजे. भूदानाचा प्रचार करायचा तर भूसमस्या व तिचा उकल कसा करायचा, तें समजलें पाहिजे.

ग्रामसेवेच्या आपल्या सर्वच कल्पना पुन्हां पारखून घेण्याची वेळ आली आहे. खेडे-गांवांत जावें, सेवेनें त्यांचा विश्वास संपादन करावा व मग आपण काम सुरू करावें, हासुद्धां एक ' गुरु संप्रदाय ' आहे. मी स्वतः प्रवृत्ति सुरू करणार कीं प्रवृत्ति सुरू व्हाव्यात असे संस्कार करणें हें माझें काम राहणार ? शैक्षणिक कामच आपण करावें, असें मला वाटतें. ग्रामसेवेचें पूर्ण दर्शन होण्याला आर्थिक परिस्थितीचें दर्शन आवश्यक आहे. भुकेकंगाल नंगी जनता अध्यात्माच्या पातळीवर एकदम येणार नाहीं, भाकरी हाच त्यांचा सध्यांतरी देव आहे.

श्री. कुमारप्पा यांनीं वर्ध्यापासून १९ मैलांवर एक ॲग्रेरियन रिसर्च इन्स्टिटयूट काढली होती. भूमीच्या प्रश्नाला स्वराज्यानंतर आणि आतां भूदानाच्या संदर्भात असाधारण महत्त्व प्राप्त झालें आहे. क्षेत्रस्वावलंबनाचा आदर्श आपण मानीत असलों तर युक्ताहाराच्या दृष्टीनें जमिनींत पीकवारी काय घ्यावी, ती या आर्थिक परिस्थितींत कशी टिकवतां येईल, खतें, बेणें, कोळपणें प्रत्येक पिकासाठीं संशोधन आणि प्रत्येक कच्च्या मालापासून पक्का माल बनवण्याच्या क्रिया, उद्योगांची माहिती देणें व संशोधनाचें काम चालू ठेवणें या गोष्टी या संस्थेनें कराव्या. भूदानाच्या अनुषंगानें जमिनीचें फेरवांटप आणि नंतरची वहिवाट, कायद्यांचे प्रश्न आणि सहकारी शेतीसारखे उपाय या विषयांचाहि समावेश तेथील संशोधनांत करावा लागेल. शेतीचें अर्थशास्त्र, कर्जव्यवस्था, शेतीमाल-विक्री आणि शेतमालांच्या किमती अशा अनेक विषयां-वर आपल्या दृष्टीचे तज्ज्ञ तयार व्हावे, असें माझें चित्र आहे. भूदान व ग्रामदानाकडे आकृष्ट होणाऱ्यांसाठीं अशा तऱ्हेच्या संस्थेची स्थापना आज आवश्य होऊन बसली आहे. शक्य झालें तर तिची स्थापना ओरिसांत करावी, असेंहि मला वाटत आहे.

विनोबाजींना या प्रश्नांची व परिस्थितीची पूर्ण कल्पना आहे. केंद्रीय संस्था व नियंत्रण हें त्यांनीं एक वर्षापूर्वी मोडून टाकलें. त्याचें कारण असें आहे कीं, ज्या वेळीं क्रांतीचा विचार एकाच संघटनेद्वारें देशांत मांडला जातो, तेव्हां त्या संघटनेच्या मर्यादाहि त्या चळवळीवर पडतात. अशा वेळीं ही संस्थांचीं बंधनें तोडून तो विचार आम जनतेपर्यंत जाईल, असें करावें लागतें. अशा तऱ्हेचे निर्णय घेण्यांत धोका असतोच. कांहीं काळ चळवळ ओसरल्याची व संपत आल्याचीहि परिस्थिति निर्माण होते. परंतु मूळ विचार प्रभावी असेल आणि तीच जर युगाची मागणी असेल, परिस्थितीवर तोच एकमेव तोडगा असेल, तर हें निश्चित आहे कीं, तो विचार प्रगति केल्याखेरीज रहाणार नाहीं. यावर आपली निष्ठा हवी आणि असे अनेक धोके स्वीकारूनहि पुढ जाण्याची ईर्षा हवी.

आज एक प्रकारें भूदानांत काम करणारांची कोंडी झाली आहे. प्रत्येक जण या चळवळीची स्तुति करीत आहे ! हरेक राजकीय पक्ष याला मान्यता देतो; पण पोटतिडिकेनें कुणीच काम करीत नाहीं. केवळ या चळवळींत काम करणारे कार्यकर्ते किंवा विधायक कार्यकर्तेंच तेवढें हें काम आपलें मानीत आहेत. पण तेहि आज क्रांतिकारक बदल करून घेण्याला तितकेसे तयार नाहींत. यामुळें विचार सर्वमान्य पण कृतिशून्य बनला आहे. भूदान चळवळीला विरोध झाला असता तर कदाचित् तिची धार वाढली असती; पण अहिंसक व शांततेच्या दूरगामी चळवळींत अशी धारहि फारशी उपयोगी पडत नाहीं. आजची ही जी कोंडी आहे, त्याचें विनोबांनीं फार छान वर्णन केलें आहे. ते म्हणतात कीं, " महाभारतांतील कौरवांच्या चक्रव्यूहाप्रमाणें आज एक चक्रव्यूह बनला आहे. अभिमन्यूनें जशी कुणाचीहि पर्वा न करतां या चक्रव्यूहांत प्रवेश केला, त्याप्रमाणें मीं व माझ्या मूठभर साथींनीं त्यांत प्रवेश केला आहे. सर्वच या अभिमन्यूच्या धैर्याची स्तुति करीत आहेत, पण कोणीहि बरोबर प्रवेश करून यांतून पलिकडे गेलेच पाहिजे असें म्हणत नाहीं. बाकीचे बाहेरूनच लढाई पहात आहेत ! संभव आहे कीं, अभिमन्यूचें जें झालें तेंच आमचेंहि होईल. आणि देश नुसताच स्तिमित होऊन पहात राहील आणि पुढें धैर्याची स्तुति अखंड चालेल ! " सर्वांनीं स्वविचार सक्रिय प्रकट करावे, असें त्यांना म्हणायचें आहे. भूदान क्रांतीच्या द्वारें सामाजिक व आर्थिक क्रांतिच अभिप्रेत आहे. लाखोंनीं यांत भाग घेऊन व श्रमजीवी समाजाशीं एकरूप बनून या चळवळीचें नेतृत्व करावें व त्या द्वारें जनशक्ति संघटित रीत्या प्रकट व्हावी, यावरच या क्रांतीचें भवितव्य अवलंबून आहे. यांत आमची पिढी नाहींशी होणार आहे. ही क्रांति पूर्ण करण्याची धुरा नवीन पिढीच घेईल. काळाची जी मागणी आहे ती पूर्ण होईल, अशी श्रद्धा व निष्ठा माझ्या अंतःकरणांत आहे. हजारोंच्या अंतःकरणांत आज नवीन निष्ठा जागृत होत आहे. पुन्हां त्यागाकडे समाजाला नेण्याचें काम भूदानाची चळवळच अल्प प्रमाणांत का होईना पण करीत आहे. नवीन क्रांति या देशांत वाटचाल करीत आहे, ही मनाला अत्यंत स्फूर्ति देणारी गोष्ट आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ... . वि:
क्रमांक ... ....... .. ... नों: दि: ...

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ६५७७
६५०७

## साधना साप्ताहिक

**संस्थापक : साने गुरुजी**

● महाशाळांतील विद्यार्थी, सार्वजनिक वाचनालयें, आणि सुसंस्कृत अभ्यासू नागरिक यांच्यासाठीं उपयुक्त असें साप्ताहिक.

● साने गुरुजी पहिल्या निवेदनांत म्हणतात : " महाराष्ट्रांत उदार विचार सर्वत्र नेण्यासाठीं साधना आहे. समाजवादी तिची दृष्टि आहे. जेथें जेथें चांगला विचार दिसतो तेथून साधना घेते. नवयुगाला अनुरूप अशी विचारसंपदा देणारी साधना आहे. "

... ...

● प्रचलित जागतिक घडामोडींची सर्वांगीण माहिती
● विधायक कार्यांचा परिचय ● थोर व्यक्तींचे परिचय
● समाजाच्या अज्ञात आधारांची ओळख ● आंतरभारती
● साहित्यपरिचय ● समाजोन्नतीच्या विविध घडपडी
● प्रचलित आंदोलन ● मुलांच्या मेळाव्यांत इ. इ.

**वार्षिक वर्गणी १२ रुपये, सहामाही वर्गणी ६ रुपये**

## शेतक ... शन

## पिकें ... स्त्र

REFBK-0009541

लेखक : **टी. आर्. खाडीलकर,** बी. एजी., एम्. एस्सी. (यू. एस्. ए.)

सर्वसामान्य सुशिक्षित शेतकऱ्याला एकरीं पीक वाढविण्याची गुरुकिल्ली सोप्या भाषेंत सांगणारा अत्यंत उपयुक्त ग्रंथ

**किंमत २ रुपये ● पृष्ठें ११२**

**प्रमुख विक्रेते**

**साधना प्रकाशन, ३७४ शनिवार पेठ, पुणें २.**